
ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. १८३२



REFBK-0011983

# रवीन्द्र काव्यदर्शन

श्रीकांत गोगटे

नो. क्र. २९४४६
क्रमांक — १५३२
दिनांक- १३/१०/६९

# रवीन्द्र-काव्य-दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वक्रमत.
अनुक्रम 37774 वि: ३/८०५
क्रमांक 2832 नों दि: 9.3.1969

श्रीकान्त गोगटे

REFBK-0011983
REFBK-0011983

सरस्वती प्रकाशन,

पुणें २.

प्रकाशक :
सौ. सिंधु वझे
सरस्वती प्रकाशन,
४१४ सदाशिव, पुणें २

★

© श्रीकान्त गोगटे

★

प्रथमावृत्ति : १० मे १९६१

★

मूल्य रु. २-५०

★

मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस,
४३०–३१ शनिवार, पुणें २.

: ६ :
सरस्वती

# निवेदन

दुसऱ्या महायुद्धाचा काळ. हजारों मैल दूर परदेशांत युद्धाच्या धामधुमींत रवींद्रकाव्याचा रसास्वाद घेणारे व रवींद्रसंगीत गाणारे बंगाली पाहून मला विस्मय वाटत असे. त्यांपैकीं कांहीं माझे मित्र बनले. त्यांनीं मला बंगाली शिकवलें. त्यांच्या सहवासांत मी रवींद्रकाव्याकडे कायमचा आकर्षित झालों.

आनंद मूलतः प्रसरणशील असतो. दुसऱ्यांना त्याचा वांटा दिला कीं, आपोआप त्याची वाढ होऊं लागते. मला लाभणाऱ्या काव्यानंदांत वाचकांनीं सहभागी व्हावें म्हणून हे लेख लिहिले गेले. यांपैकीं निम्मेअधिक लेख 'साधना' साप्ताहिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झाले आहेत. हे आतां पुस्तकरूपानें वाचकांच्या हातीं देतांना मला विशेष समाधान वाटत आहे.

रवींद्रकाव्याचा रसास्वाद घेतांना कविमानसाचें जें उदात्त दर्शन घडलें त्याचे कांहीं पैलू वाचकांच्या पुढें यथामति ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. रवींद्रकाव्य इतकें विपुल व वैचित्र्यपूर्ण आहे कीं, त्याच्या सरस, सुंदर पैलूंचें यथार्थ दर्शन लहान लहान लेखांतून घडवणें प्रायः अशक्य आहे. कांहीं पैलूंचा अल्पसा परिचय करून देण्याचा प्रयत्न मीं या लेखांत केला आहे. गीतांजलि व बलाका या श्रेष्ठ काव्यांविषयींचे लेखहि परिचयात्मक आहेत. हे लेख वाचकांना मूळ रवींद्रकाव्याकडे जाण्याची प्रेरणा देऊं शकले तरच यांचें चीज झालें असें म्हणतां येईल.

'साधना' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा समावेश करण्यास अनुमति दिल्याबद्दल साधनेच्या चालकांचे आभार मानणें आवश्यक आहे. रवींद्रशताब्दीच्या उत्सवप्रसंगीं हें पुस्तक काढण्याची सर्व जबाबदारी मित्रवर्य श्री. वझे यांनीं आपुलकीनें उचलली, याबद्दल त्यांचा मीं अत्यंत ऋणी आहें. त्यांच्या साह्याचें ऋण न फिटणारें आहे. तें चिरकाल वाहण्यास मला आनंदच वाटेल.

दि. २९-४-१९६१. श्रीकान्त गोगटे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | काव्यांतील गतिवैचित्र्य | ५ |
| २ | जीवनदेवता | ११ |
| ३ | वर्षागान | १९ |
| ४ | मेघदूत | २४ |
| ५ | रवीन्द्रसंगीत | ३० |
| ६ | आदर्श स्त्री | ३६ |
| ७ | शिशुकाव्य | ४१ |
| ८ | देशभक्ति | ४७ |
| ९ | ‘ गीताञ्जली ’ चें सूत्र | ५२ |
| १० | ‘ गीताञ्जलि ’ | ५९ |
| ११ | ‘ बलाका ’ | ६८ |
| १२ | मानवप्रीति | ७६ |
| १३ | अंतिम काव्यधारा | ८३ |
| १४ | कांहीं आक्षेप | ९० |
| १५ | विश्वकवि रवींन्द्रनाथ | ९७ |


★ ★

अनु. क्र. ३२२०४ वि: ८९१८५ ९४३२ नों. दि: २३/१०/८९

# काव्यांतील गतिवैचित्र्य

विश्वकवि रवींद्रनाथ जीवनधर्मी कवि. त्यांच्या विपुल काव्य-संगीतांत विकासशील जीवनाचा अग्रगामी प्रवाह वैचित्र्यपूर्ण छंदानें वाहत असलेला दिसतो. रवींद्रकाव्य जसें मुख्यतः गीतधर्मी आहे, तसें तें गतिधर्मीहि आहे. या गतीला छंदाबरोबरच स्वरांचीहि जोड मिळाल्यामुळें त्यांच्या काव्यसाधनेला परिपूर्णता लाभली आहे. रवींद्रकाव्याच्या ओळींओळींत जाणवणाऱ्या जीवनाच्या गतिमानतेंत गतकाळच्या महान् स्मृति, वर्तमानकाळच्या आकांक्षा व भावी काळाची विपुल संभाव्यता यांचें प्रभावी दर्शन घडतें.

रवींद्रकाव्यांतील या गतिमानतेचा आलेख रेखाटतांना वारंवार असें जाणवतें कीं, कवीच्या जीवनसाधनेच्या जोमदारपणानें ती जागोजागीं नियंत्रित झाली आहे. एवढेंच नव्हे, तर रवींद्रनाथांच्या जीवनसाधनेचीं वैशिष्ट्येंहि तिच्यांत उतरलीं आहेत. रवींद्रनाथ विकासोन्मुख जीवनमार्गावरचे चिरप्रवासी. त्यांच्या जोमदार जीवनसाधनेच्या मुळाशीं सृष्टीच्या अविरत प्रवाही गतिमानतेची सर्जनशील अनुभूति आढळते. सृष्टींतील प्राणशक्तीच्या विपुल गतिमान् प्रवाहांतच चैतन्यरूप स्रष्ट्याचें दर्शन घडत असतें. हा गतिमान प्रवाह देशकालाच्या कोणत्याहि बंधनानें अडविला जात नाहीं. सृष्टींतील गतिमानतेच्या व्यापक अनुभूतीमुळें रवींद्रांच्या जीवनाला अग्रगति लाभली आहे. परिवर्तनशील, विकासशील जीवनाच्या अखंड अग्रगतींतच त्यांच्या कविजीवनाची सार्थकता, कोणत्याहि विशिष्ट भावनावेगांत किंवा चिंतनांत दीर्घ काळ अडकून न राहतां, अडथळा निर्माण करणारीं बंधनें तोडीत व संकुचितपणा निर्माण करणाऱ्या सीमांचें उल्लंघन करीत ते नूतनत्वाच्या आकांक्षेनें अग्रेसर होत असलेले दिसतात. नूतनत्वाच्या या जोमदार आकांक्षेमुळेंच त्यांची काव्यप्रतिभा विपुल रूपवैचित्र्यांत व व्यापक भाववैचित्र्यांत अखेरपर्यंत विलसतांना दिसते.

बाविसाव्या वर्षीं रचलेल्या ‘ प्रभातसंगीत ’ या काव्यग्रंथापासूनच रवींद्र-काव्यांतील जोमदार गतिमानतेचें प्रभावी दर्शन होतें. तरल कल्पना व अकारण आवेग यांच्या कारागृहांत बंदिस्त झालेल्या तरुण कवीची मुक्तीसाठीं

चाललेली जी धडपड ‘ संध्यासंगीत ’ काव्यग्रंथांत आढळते, तिचीच स्वाभाविक परिणति नंतरच्या ‘ प्रभातसंगीत ’ काव्यग्रंथांत दिसून येते. या दृष्टीनें ‘ निर्झरेर स्वप्नभंग ’ ( निर्झराचा स्वप्नभंग ) ही सुंदर कविता विशेष महत्त्वाची आहे.

झरा पर्वताच्या गुहेंत बंदिस्त झाला होता. वैचित्र्यहीन, विकासहीन जीवनांत तो तंद्राजडित होऊन पडला होता. बाहेरच्या विपुल, विशाल जीवनाची त्याला कांहींच कल्पना नव्हती. पण एके दिवशीं प्रभात काळीं सूर्याचे किरण व पक्ष्यांचें कूजन यांनीं गुहेंत अकस्मात् प्रवेश करतांच झऱ्याच्या मनांत अपूर्व चांचल्य निर्माण झालें. तंद्राजडित स्वप्न भंगून दुर्दम्य लहरी उसळूं लागल्या :

जागिया उठेछे प्राण,
ओरे उथलि उठेछे बारि,
ओरे प्राणेर वेदना, प्राणेर आवेग रुधिया राखिते नारि...
भांग रे हृदय, भांग रे बांधन,
साध रे आजिके प्राणेर साधन,
लहरीर परे लहरी तुलिया
आघातेर परे आघात कर।...
आमि ढालिबो करुणाधारा
आमि भांगिबो पाषाणकारा
आमि जगत् प्लाविया बेडाबो गाहिया
आकुल पागल पारा।...
की जानि की होलो आजि, जागिया उठिलो प्राण
दूर हते शुनि जॅनो महासागरेर गान।

( अरे, आतां हृदय जागृत झालें आहे, पाणी उफाळत आहे. ह्या हृदयांतील वेदना व आवेग आतां मला अनावर झाले आहेत. अरे, आतां हें हृदय भग्न कर. हें बंधन तोडून फोडून टाक. जीवनसाधना साध्य कर. लाटांमागून लाटा उसळीत तूं एकामागून एक आघात कर. मी करुणाधारा ओतीन. पाषाणाचें कारागृह फोडून सारें जग व्यापीत मी चंचल वेड्याप्रमाणें

सर्वत्र गाणें गात फिरेन... आज मला काय झालें आहे न कळे. हृदय जागृत होऊन, दुरून मला जणूं महासागराचें गीत ऐकूं येत आहे.)

प्रवाही व्यक्तित्वाच्या योगानें बंधनमुक्त कवीचें निसर्ग व मानव यांच्याशीं होणारें वैचित्र्यपूर्ण मीलन नंतरच्या 'छवि ओ गान', 'कड़ि ओ कोमल' या काव्यग्रंथांत आढळतें. निसर्गसौंदर्य व मानवप्रेम यांच्या सर्वांगीण स्पर्शासाठीं आतुर झाल्यामुळें कवीचा जीवन-प्रवाह असंख्य लहरींनीं उफाळत चाललेला दिसतो. त्या उपभोग-प्रधान जीवनाबद्दल संशय निर्माण झाल्यामुळें मंद होणारी जीवन-प्रवाहाची गति 'मानसी' काव्यग्रंथांत जाणवते. कवीच्या संशयित मनःस्थितीचें सुंदर चित्रण 'निष्फल कामना', 'भैरवी गान' वगैरे कवितांत आढळतें. १८८७ सालाच्या सुमारास जमीनदारीची व्यवस्था पाहण्यासाठीं वास्तव जीवनांत उतरावें लागल्यामुळें उपभोगप्रधान, आत्मनिष्ठ जीवनाची व्यर्थता कवीला वारंवार जाणवूं लागली. निसर्ग व मानव यांच्या अंतर्निहित सौंदर्याचें अधिष्ठान कल्पनासृष्टींत नसून त्या सौंदर्याची सत्यानुभूति वास्तव जीवनाच्या व्यापक सर्जनशीलतेंतच लाभूं शकते, या सत्याची कवीला झालेली जाणीव 'शोनार तरी' (स्वर्णनौका) व 'चित्रा' या काव्यग्रंथांत जागोजागीं आढळते. सर्जनशील जीवनदेवतेचें आपणांला प्रभावी दर्शन घडतें. सर्वानुभूतीसाठीं आसुसलेले रवींद्रनाथ 'विश्वनृत्य' कवितेंत म्हणतात :

हृदय आमार क्रंदन करे
मानव-हृदये मिशिते।
निखिलेर शाथे महाराजपथे
चलिते दिवस निशिथे।
आजन्म काल पडे आछि मृत
जडतार माझे हये पराजित,
ॲकटि बिंदु जीवन-अमृत
के गो दिबे एइ तृषिते॥

(मानवहृदयाच्या व्यापक मीलनासाठीं माझें हृदय आक्रंदत आहे. विस्तृत राजपथावर अखंड जगताच्या सहवासांत रात्रंदिवस अग्रेसर होण्यासाठीं

तें तळमळत आहे. जन्म झाल्यापासून जडतेमध्यें पराजित होऊन मी मृतवत् पडून आहें. जीवनामृताचा एखादा थेंब या तृषिताच्या मुखांत कोण घालील बरें ? )

सौंदर्याची व प्रेमाची जी निबिड, व्यापक अनुभूति ' चित्रा ' काव्य-ग्रंथांत आढळते, तिचीच अंतिम परिणति ' चैतालि ' काव्यग्रंथांत व्यक्त झाली आहे. या जगांत क्षुद्र, टाकाऊ असें कांहींच नाहीं; सारेंच सुंदर, मधुर व अमृतमय आहे, अशी व्यापक अनुभूति लाभल्यामुळें कवीला जीवनाचें व जगाचें सत्यदर्शन घडत आहे. क्षुद्र सुखदुःखमय मानवी जीवनांत कवीला महान् आशय गवसला आहे. सत्यासाठीं, न्यायासाठीं स्वार्थत्याग करणाऱ्या माणसांचें उदात्त दर्शन, नंतरच्या ' कथा ' व ' काहिनी ' या काव्यग्रंथांत घडतें. कवीच्या भावप्रवाहाची गति या ठिकाणीं मंदावली असली तरी तिला सर्वानुभूतीची व्यापकता लाभली आहे. सत्य, धर्मनिष्ठा यांसारख्या शाश्वत जीवन-मूल्यांकडे कवींद्रांचें मन आकर्षित झालें असून त्यांची जीवनसाधना आध्यात्मिकतेकडे वळत असलेली दिसते. १९०० सालाच्या सुमारास रचलेल्या ' कल्पना ' या काव्यग्रंथांतील बऱ्याच कवितांत कवीची आध्यात्मिक आकांक्षा व्यक्त झाली आहे. क्षुद्रतेचा व ग्लानीचा नाश करणाऱ्या वादळाला आवाहन करतांना रवींद्रनाथ ' वर्षशेष ' कवितेंत आपला निर्धार व्यक्त करतात :

चाबोना पश्चाते मोरा, मानिबो ना बंधन क्रंदन,
हेरिबो ना दिक्,
गणिबो ना दिनक्षण, करिबो ना वितर्क विचार,
उद्दाम पथिक ।
मुहूर्तें करिबो पान मृत्युर फेनिल उन्मत्तता
उपकंठ भरि,
खिन्न शीर्ण जीवनेर शतलक्ष धिक्कार लांछना
उत्सर्जन करि ।

( आम्ही मागें पाहणार नाहीं, बंधनाला किंवा क्रंदनाला जुमानणार नाहीं. आम्ही उद्दाम प्रवासी दिक्कालाचा विचार करणार नाहीं, तर्ककुतर्कहि उपस्थित

करणार नाहीं. खिन्न, शीर्ण जीवनाच्या असंख्य धिक्कार-लांछनांचा त्याग करून आम्ही एका क्षणांत मृत्यूची फेसाळ उन्मत्तता यथेच्छ प्राशन करूं.)

वर्षअखेरीच्या या भयानक वादळानंतरच नववर्षरूपी नवजीवन प्रकट होईल, असा विश्वास कवीला वाटत आहे.

'नैवेद्य' (१९०१) पासून 'गीतालि' (१९१४) काव्यग्रंथापर्यंतचा दीर्घ कालखंड आध्यात्मिक साधनेचें पर्व म्हणून ओळखला जातो. 'गीतांजलि', 'गीतिमाल्य' हे महत्त्वाचे काव्यग्रंथ याच कालखंडांत रचले गेले. लीलामय, रहस्यमय ईश्वराच्या मीलनासाठीं आसुसलेल्या व वारंवार व्याकुळ होणाऱ्या रवींद्रनाथांची काव्यप्रतिभा या कालखंडांत स्वरवैचित्र्याचे सुंदर साज लेवून लीलायित छंदानें प्रवाहित झाली आहे.

'बलाका' काव्यग्रंथापासून रवींद्रनाथांच्या काव्यप्रतिभेच्या प्रवाहाला निराळेंच वळण, वेगळीच गति लाभली. प्रेमिकाची किंवा भक्ताची भूमिका संपून रवींद्रनाथांनीं तत्त्वज्ञाची भूमिका घेतल्याचें दिसून येतें. विश्वांतील सर्जनात्मक प्राणशक्तीमुळें जीवनाला लाभणाऱ्या व्यापक अग्रगतीचा ते 'बलाका' काव्यग्रंथांत शोध घेतांना दिसतात. या काव्यग्रंथांतील 'चंचला' ही कविता तर विश्वान्तर्गत प्राणशक्तीचें प्रत्यक्ष काव्यरूपच म्हणतां येईल. प्राणशक्तीच्या नदी-प्रवाहाला उद्देशून रवींद्रनाथ म्हणतात :

स्पन्दने शिहरे शून्य तव रुद्र कायाहीन वेगे
वस्तुहीन प्रवाहेर प्रचंड आघात लेगे
पुंज पुंज वस्तुफेना उठे जेगे,
आलोकेर तीव्रच्छटा विच्छुरिया ओठे वर्णस्रोते

धावमान अंधकार हते,
घूर्णाचक्रे घुरे घुरे मरे
स्तरे स्तरे
सूर्य चंद्र तारा जतो
बुद्‌बुदेर मतो।

(तुझ्या भयानक कायाहीन वेगाच्या स्पंदनानें शून्यावकाश थरथरत असतो. वस्तुहीन प्रवाहाच्या प्रचंड आघातानें वस्तुरूप फेसांचे पुंजके उठतात.

गतिमान् अंधारांतून प्रकाशाच्या तीव्र वर्णच्छटांचे स्रोत वेगानें फेकले जातात. विराट चक्राकार भोवऱ्यांत अवघे सूर्य, चंद्र, तारे बुडबुड्यांप्रमाणें स्तरास्तरांनीं प्राण पणाला लावून गरगर फिरत असतात. )

अशा प्रकारचें सृष्टीविषयींचें व्यापक तत्त्वचिंतन ' बलाका ' काव्यग्रंथांत जागोजागीं आढळतें. पूर्वयुगांत कवींद्रांच्या भावनेला प्रत्यक्षपणें स्पर्शणारें विराट सृष्टिजीवन आतां त्यांच्या वैचारिकतेलाच मुख्यतः कार्यान्वित करीत असलेलें दिसतें. त्यामुळें काव्यांतील रस-रूपांच्या आविष्कारामागें त्याच्या यथार्थ स्वरूपाची तात्त्विक सूचकता वाचकाला प्रकर्षानें जाणवते. या तात्त्विक सूचकतेमुळें ' बलाका ' काव्यग्रंथांत क्षितिजगामी पक्ष्याच्या पंखस्पंदनाची मुक्ततरल गति अनेक दीर्घ कवितांच्या मुक्तच्छन्दांत व्यक्त झाली आहे. ' बलाका ' काव्याचें हें गतिवैशिष्ट्य ' श्यामली ' ( १९३६ ) काव्यग्रंथापर्यंतच्या दीर्घ कालखंडांतील सर्व तत्त्वचिंतनप्रधान काव्यांत जागोजागीं आढळतें.

' प्रान्तिक ' ( १९३७ ) काव्यग्रंथापासून रवींद्रनाथांच्या काव्यप्रतिभेच्या प्रवाहाला वेगळेंच वळण मिळालें. हा प्रवाह ' शेषलेखा ' ( शेषलेखन ) या अखेरच्या काव्यग्रंथापर्यंत विशिष्ट गतीनें प्रवाहित होऊन शेवटीं तो विश्वजीवनाच्या महासागरांत विलीन झाला आहे. १९३७ ते १९४१ पर्यंतचा हा कालखंड आत्मोपलब्धीचें पर्व म्हणून ओळखला जातो. आत्मा हा ब्रह्माचा अंश आहे, देहांत वास करीत असल्यामुळें सीमाबद्ध वाटला तरी शेवटीं तो अनंत चैतन्यसागरांतच विलीन होतो, या उपनिषद्-प्रणीत ज्ञानाच्या व्यापक अनुभूतीमुळें जीवन व मृत्यु यांचें परस्पर निकट नातें कवीच्या प्रत्ययाला आलें. १९३७ सालच्या मोठ्या आजारांत त्यांनीं मृत्यूचा ओझरता स्पर्श अनुभवलाच होता. जीवन-मृत्यूच्या निकट नात्याचें विवरण कवींद्र रवींद्रनाथ ' जन्मदिने ' काव्यग्रंथांत किती सूचकपणें करतात !

धूसर गोधुलि लग्ने सहसा देखिनु अेक दिन
मृत्युर दक्षिण बाहु जीवनेर कंठे विजडित
रक्त सूत्र गाछि दिये बाँधा—
चिनिलाम तखोनि दोंहारे।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ३७८७५ वि: ३/८५
क्रमांक ९८३२ नों: दि: 23/10/49

देखिलाम, नितेछे जौतुक
बरेर चरम दान मरणेर वधु–
दक्षिण बाहुते वहि चलियाछे युगान्तेर पाने।

( एके दिवशीं धूसर सायंकाळीं मीं अकस्मात् पाहिलें, मृत्यूचा लाल सूत बांधलेला उजवा बाहु जीवनाच्या मानेभोंवतीं लपेटला आहे. मीं त्या दोघांना लगेच ओळखलें. पाहतों तर मृत्यूची वधू आपल्या पतीचें श्रेष्ठ दान स्वीकारीत आहे आणि उजव्या बाहूनें वहन करीत युगांतराकडे चालत आहे.)

जीवनाचे चिरपथिक कवींद्र रवींद्रनाथहि मृत्यूची भीति न बाळगतां चैतन्यसागरांत अवगाहन करण्यासाठीं सिद्ध झाले आहेत, असें या अखेरच्या कालखंडांतील काव्यग्रंथांत जागोजागीं दिसून येतें. त्यांच्या काव्यप्रतिभेच्या प्रवाहाला महासागरांत शतधारांनीं विलीन होण्यासाठीं उत्सुक झालेल्या भागीरथीची प्रसन्न पुण्यगति लाभली आहे.

* * *

## जीवनदेवता : २

रवींद्रांच्या ‘ गीतांजलि ’ व त्यानंतरच्या ‘ बलाका ’ या श्रेष्ठ काव्य-ग्रंथांतील वैचारिकतेंत कालक्रमाप्रमाणें सुसंगत असा विचारक्रमहि आहे. एकंदर रवींद्रकाव्याबद्दलहि आपण असें विधान केलें तर तें चुकीचें ठरणार नाही. रवींद्रकाव्याच्या क्रमविकासाबद्दल विचार केला तर, आपणांला असें दिसून येतें कीं, ‘ गीतांजलि ’, ‘ बलाका ’ आदि रुचिर कळसांनीं शोभणाऱ्या रवींद्रकाव्य-महालाची वैचित्र्यपूर्ण, पण पद्धतशीर बांधणी कित्येक वर्षें अगोदर-पासून होत होती. या दृष्टीनें पाहिलें असतां, रवींद्रकाव्यमहालाची भक्कम पायाभरणी त्यांच्या ‘ जीवनदेवता ’ तत्त्वानें झाली होती, असें आढळून येतें. प्रस्तुत लेखांत ‘ जीवनदेवता ’ कल्पनेचें थोडक्यांत विवेचन करण्याचें योजिलें आहे.

रवींद्रनाथांच्या ‘ जीवनदेवता ’ विषयक कविता प्रामुख्यानें ‘ शोनार तरी ’ ( स्वर्णनौका ) व ‘ चित्रा ’ या १८९२ ते १८९६ च्या दरम्यान

रचलेल्या काव्यग्रंथांत आढळतात. त्यापूर्वीच्या ‘ कडिओ कोमल ’ व ‘ मानसी ’ या काव्यग्रंथांतील बऱ्याच कवितांत तारुण्यसुलभ व्यक्तिनिष्ठेचा व रूपतृष्णेचा वारंवार आढळ होतो. पण भोगांतील समाधान क्षणिक व ग्लानिकारक असल्यामुळें साहजिकच कवीचें मन अशांत, क्षुब्ध होतें आणि तें व्यक्तिनिष्ठेच्या संकुचित सीमा ओलांडण्याच्या प्रयत्नाला लागतें. ‘ निष्फल कामना ’, ‘ निष्फल प्रयास ’, ‘ भैरवी गान ’ अशा अनेक कवितांत कवीच्या मनाची ही अशांति वारंवार जाणवते. १८८७ च्या सुमारास जमीनदारीच्या कारभाराची जबाबदारी पत्करून रवींद्रनाथ प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत उतरले. कल्पनाप्रधान जीवन वास्तवतेच्या क्षेत्रांत वावरूं लागलें. जमीनदारीची देखरेख करण्यासाठीं रवींद्रनाथांना गृहनौकेंतून कित्येक दिवस प्रवास करावा लागे. सस्यश्यामल वंगभूमीच्या वैचित्र्यपूर्ण सृष्टिसौंदर्याच्या निकट सहवासांत रममाण होण्यांत, दुःखकष्टांनीं गांजलेल्या शेतकरी जीवनाचें निरीक्षण करण्यांत, त्यांच्याशीं समरस होण्यांत दिवस व्यतीत होऊं लागले. अशा उदार जीवनाचें प्रतिबिंब ‘ शोनार तरी ’ काव्यग्रंथांत जागोजाग दिसून येतें. या काव्यग्रंथांत तात्त्विक वृत्तीच्या रवींद्रनाथांनीं, बाह्यतेशीं अंतर्मनाचें, उदार विश्वाशीं व्यक्तीचें परिपूर्ण मीलन साधण्याची कल्पना मांडली आहे. व्यक्तिनिष्ठेच्या संकुचितपणांतच जीवनाला बंदिस्त करणें हें कृत्रिमपणाचें असल्याचें लक्षण आहे. तशानें व्यर्थताच पदरीं पडते. जीवनसाधना व्यक्तीनें करायची असली तरी साधनेच्या फळावर त्या व्यक्तीला अधिकार सांगतां येत नाहीं. विशाल जीवनाच्या दृष्टीनें व्यक्तीच्या जीवनसाधनेचें फल साऱ्या मानवसमाजाच्या मालकीचें होतें. विश्वमानवाच्या उन्नतीसाठीं, कल्याणासाठींच त्याचा उपयोग व्हायचा असतो. हें तत्त्व ‘ शोनार तरी ’ कवितेंत उत्तम रीतीनें ग्रथित केलें आहे. रवींद्रनाथ जीवननौकेच्या नावाड्याला म्हणतात :

ओगो तुमि कोथा जाओ कोन विदेशे
बारेक भिडाओ तरी कुलेते एसे।
जेओ जेथा जेते चाओ, जारे खुशि तारे दाओ,
शुधु तुमि निये जाओ क्षणिक हेसे
आमार सोनार धान कुलेते एसे।

जतो चाओ ततो लओ तरणीपरे ।
आर आछे ? आर नाइ, दियेछि भरे ।
एतो काल नदीकुले जाहा लये छिनु भुले
सकलि दिलाम तुले थरेविथरे—
एखन आमारे लओ करुणा करे ।

( अरे कुशल नावाड्या, व्यापक संचारासाठीं तूं कोठें, कोणत्या विदेशांत जात आहेस ? तुझी नौका ह्या किनाऱ्याला जरा भिडव, मग तुला जायचें असेल तेथें तूं जा; आपल्या नौकेंतलें धन ज्याला द्यायचें असेल त्याला दे. फक्त एकच वार तुझी नौका या किनाऱ्याला लाव आणि माझें साधनाफलरूपी स्वर्णधान्य हंसतमुखानें नौकेंत घे. आणखी आहे ? नाहीं. सारें स्वर्णधान्य मीं नौकेंत भरलें. आजपर्यंत येथें जिवापलीकडे जपून ठेवलेलें सारें स्वर्णधान्य मीं तुझ्या नौकेंत भरून टाकलें आहे. आतां मलाहि तुझ्या नौकेंत कृपा करून घे. ) परंतु—

ठाँइ नाइ, ठाँइ नाइ, छोटो शे तरी
आमारि सोनार धाने गियेछे भरि ।
श्रावण गगन घिरे घनमेघ घुरे फिरे,
शून्य नदीर तीरे रहिनु पडि—
जाहा छिलो निये गेलो सोनार तरी ॥

( या छोट्या नौकेंत आतां जागाच उरली नाहीं. माझ्या साधनाफलरूपी धान्यानेंच सारी नौका भरून गेली. आतां मी कोठें बसणार ? श्रावणकालीन आकाशांत घनकृष्णमेघ यथेच्छ भ्रमण करीत आहेत आणि मी मात्र या निर्जन नदीतीरावर एकटाच मागें राहिलों आहें. माझ्यापाशीं जें साधनाफलरूपी धन होतें, तें आतां विश्वमानवाच्या मालकीचें झालें आहे. )

जीवननौकेचा कुशल नावाडी म्हणजे महाकाल. त्यानें कवीच्या साधनाफलाचाच स्वीकार केला; कवीचा स्वीकार केला नाहीं. विशाल जीवनांत व्यक्तीला महत्त्व आहे. साहजिकच साधना संपल्यावर फलोपभोग घेत आपण आराम करूं शकूं, अशी कवीची जी स्वार्थी कल्पना होती, ती फोल ठरली.

त्याचें साधनाफल महाकालाच्या स्वाधीन झाल्यामुळें कवीला आपली साधना चालू ठेवणें भाग पडलें. व्यक्तीला कधींच निष्क्रिय होतां येत नाहीं, जीवन-साधना अखेरपर्यंत चालवलीच पाहिजे, असा महाकालाचा, जीवनदेवतेचा हेतु आहे.

व्यक्तीला जीवनसाधना करण्यास उद्युक्त करणाऱ्या सर्जनशील जीवन-देवतेचा व्यक्तिजीवनाशीं साहजिकच अतिशय निकट संबंध असतोच. जीवन-देवता ही व्यक्तीची अधिष्ठात्री देवताच असते. अशा देवतेशीं प्रियतम-प्रेयसीचें नातें जोडणारे रवींद्रनाथ 'जीवनदेवता' कवितेंत म्हणातात :

आपनि वरिया लये छिले मोरे ना जानि
किसेर आशे।
लेगेछे कि भालो, हे जीवननाथ,
आमार रजनी, आमार प्रभात
आमार नर्म, आमार कर्म, तोमार विजन
वासे।......
की देखिछो बंधु, नयनमाझारे राखिया
नयन दुटि।
करेछो कि क्षमा जतेक आमार स्खलन,
पतन, त्रुटि।
पूजाहीन दिन, सेवाहीन रात
कतो बारबार फिरे गेछे नाथ—
अर्घ्य कुसुम झरे पडे गेछे विजन विपिने फुटि।
जे सुरे बांधिले ए बीणार तार
नामिया नामिया गेछे बारबार
हे कवि, तोमार रचित रागिणी आमि कि गाहिते पारि।

( हे जीवननाथ, तूं मला कोणत्या आशेनें वरलें होतेंस, हें नीटसें कळत नाहीं. आपल्या निभृत जीवनांतील प्रत्येक दिवसरात्र आनंदी वृत्तींनें व योग्य कर्मसाधनेनें साजरी करण्याचा माझा प्रयत्न तुला प्रसन्न करण्यासाठींच असतो. पण माझी ही साधना तुला मनापासून आवडली का ? हे प्रियतम,

तुझी स्थिर, जागरूक दृष्टि माझ्या मनोमर्मांत कशाचें निरीक्षण करीत असतें बरें ? माझ्यांतील दोषांबद्दल, पावलोपावलीं माझ्या हातून होणाऱ्या चुकांबद्दल तूं मला मनापासून क्षमा केलीस ना ? माझ्या निष्काळजीपणामुळें किती तरी रात्रीं तुझी पूजा व सेवा न घडतां निघून गेल्या आहेत. तुझ्या पूजेसाठीं मीं पुष्पमाला गुंफण्याचें विसरून गेल्यामुळें निर्जन वनांत फुललेलीं किती तरी फुलें वैफल्यानें कोमेजून, गळून गेलीं असतील ! या अपराधाबद्दल तूं मला क्षमा कर. तूं योग्य स्वरांत लावलेल्या माझ्या जीवनवीणेच्या तारा माझ्याच वेंधळेपणामुळें, अक्षमतेमुळें उतरून गेल्या आहेत, बेसूर झाल्या आहेत. असें असतांना हे कवि, तूं रचलेली मधुर रागिणी मी कशी बरें गाऊं शकेन ?)

या कवितेंत रवींद्रनाथांचें 'जीवनदेवता' तत्त्व जास्त स्पष्ट झालें आहे. 'जीवनदेवता' कल्पनेचें विवरण करतांना रवींद्रनाथ म्हणतात, "आज मला मनोमन पटलें आहे कीं, माझें सारें लिखाण केवळ उपलक्ष्यरूप आहे. हे अक्षम लेखनकण ज्या भावी संपूर्णतेची रचना करीत आहेत, त्या संपूर्णतेच्या स्वरूपाची यांना कांहींच कल्पना नाहीं. कारण हे अपूर्ण आहेत, खंडित अवस्थेंत आहेत. लेखन करणाऱ्या व्यक्तीच्या अंतर्मनांत जो खरा रचनाकार असतो, त्यालाच भावी संपूर्णतेच्या यथार्थ स्वरूपाची कल्पना असते. फुंकरामुळें बासरींतून स्वरांमागून स्वर निघतात. तेव्हां फुंकराला वाटतें, सारें कर्तृत्व आपलेंच आहे. पण अलग अलग स्वरांची रागिणी खरोखर कोण गुंफीत असतो ? फुंकरामुळें सूर निघतात हें खरें, पण फुंकरच बांसरी वाजवीत आहे, असें म्हणणें हास्यास्पद ठरेल. रागरागिणींचें ज्ञान असणारा संगीतकारच बांसरी वाजवीत असतो. अशा संगीतकाराशिवाय यथार्थ बांसरीवादन होणार नाहीं, हें स्पष्ट आहे. त्याचप्रमाणें माझ्या अंतर्मनांत जो खरा कवि आहे, तो माझ्यांतील बऱ्यावाईट, अनुकूल-प्रतिकूल उपकरणांचा उपयोग करीत माझ्या जीवनाची विशालतेच्या, पूर्णत्वाच्या दृष्टीनें रचना करीत असतो. अशा सर्जनशक्तीलाच मीं 'जीवनदेवता' म्हटलें आहे."

ज्या सर्जनशक्तीमुळें अंशाला व्यापक पूर्णता लाभते, व्यक्तिजीवनांतील सुखदुःखादि घटनांना विशाल जीवनांत तात्पर्यपूर्ण एकतानता लाभते; चराचर

विश्वाला व्यापणाऱ्या शिवसुंदरस्वरूपी परमतत्त्वाची एकात्म अनुभूति व्यक्तीला प्राप्त होऊं शकते, त्या सर्जनशक्तीलाच रवींद्रनाथांनीं 'जीवनदेवता' म्हटल्याचें दिसून येतें.

रवींद्रनाथ पुढें म्हणतात, "जीवनदेवतेचें कार्यक्षेत्र व्यापक आहे. तिचें सर्जन-कार्य या जीवनापुरतेंच सीमाबद्ध आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. अनादिकालापासून अनेक विचित्र, विस्मृत अवस्थांतून जीवनदेवतेनें मला सध्यांच्या जीवनांत आणून सोडलें आहे. अखिल विश्वांतून प्रवाहित होणाऱ्या अस्तित्वधारेची व्यापक स्मृति, मला नकळत कां असेना, माझ्यांत वास करीत आहे. म्हणूनच या तरुलतांबद्दल, पशुपक्ष्यांबद्दल मला पुरातन एकत्वाची अनिवार ओढ वाटते. या विराट रहस्यमय विश्वाबद्दल मला परकेपणा किंवा भीति न वाटण्याचें कारणहि हेंच. थोडक्यांत सांगायचें झालें तर, व्यापक विश्वबोध म्हणजेच जीवनदेवता."

'जीवनदेवते'ची कल्पना केवळ कविकल्पना आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. भारतीय तत्त्वज्ञानांतील 'अंशरूप जीवात्मा, पूर्णरूप परमात्मा' तत्त्वाशीं, विशेषतः वैष्णवांच्या भेदाभेददर्शनाशीं आपणांला या कल्पनेचें साम्य आढळतें. पाश्चात्य तत्त्वज्ञानांतहि या कल्पनेला पुष्टि देणारे आधार मिळतात. हेगेलचें व्यक्ति-समष्टितत्त्व आणि विशेषतः बेर्गसँचें सर्जनात्मक उत्क्रांतीचें तत्त्व, हीं दोन्ही 'जीवनदेवता' कल्पनेला बरींच जवळचीं आहेत. विज्ञानाच्या क्षेत्रांतहि या कल्पनेला पुष्टि मिळूं शकते. डार्विनच्या उत्क्रांतितत्त्वाप्रमाणें प्रत्येक जीवकोषाला स्वतंत्र व्यक्तित्व असतें. म्हणजेच मानवामध्यें अनेक व्यक्तित्वांचा समावेश झालेला असतो. आपलें युगानुयुगांचें जीवन विश्वाच्या अभिव्यक्तीच्या अनेक धारांतून प्रवाहित होत आल्याचा रवींद्रनाथांना जो अनुभव येई, त्याचें कारण हेंच कीं, अनेक जीवनांतील नाना व्यक्तित्वें त्यांच्या सध्यांच्या व्यक्तित्वांत समाविष्ट झालीं होतीं. असंख्य जीवनांतील अनेक भिन्नांशांचा एका प्रगत व्यक्तित्वांत झालेला समावेश सर्जनशील जीवनदेवतेनेंच केला होता जणुं!

'शोनार तरी' व 'चित्रा' काव्यग्रंथांतील अनेक सुंदर कवितांत रवींद्रनाथांनीं जीवनदेवतेशीं असलेल्या निगूढ नात्याचा व तिच्या विश्वबोधात्मक

स्वरूपाचा रसपूर्ण, कलात्मक आविष्कार केला आहे. 'शोनार तरी' तील मानससुंदरी, 'समुद्रेर प्रति', 'वसुंधरा', 'निरुद्देश यात्रा' व 'चित्रा' काव्यग्रंथांतील 'चित्रा', 'जीवन-देवता', 'साधना', 'उर्वशी', 'विजयिनी, वगैरे कविता वानगीदाखल उल्लेखितां येतील.

'मानससुंदरी' या कवितेंत जीवनदेवतेला आपली अंतर्वासिनी प्रेयसी कल्पून तरुण कवि रवींद्रनाथ म्हणतात :

अयि निरभिमानिनी,
अयि मोर जीवनेर प्रथम प्रेयसी
मोर भाग्यगगनेर सौंदर्येर शशि,...
तोमार हृदयकंप अंगुलिर मतो
आमार हृदयतंत्री करिबे प्रहत
संगीततरंगध्वनि उठिबे गुंजरि
समस्त जीवन व्यापि थरथर करि ।

(हे प्रिये, तूं ह्या जीवनांतील माझी प्रथम प्रेयसी आहेस. माझ्या भाग्याकाशांत परिपूर्ण सौंदर्यानें विलसणारा चंद्रमा आहेस. तुझें-माझें नातें इतकें निकटचें आहे कीं, तुझ्या हृदयस्पंदनरूपी अंगुलीनें माझी हृदयवीणा झंकारूं लागेल व त्या मधुर संगीताच्या दिव्य लहरींनीं माझें सारें जीवन व्याप्त होईल.)

यौवनरसिक कवि पुढें म्हणतात :

कार अतो दिव्यज्ञान
के बलिते पारे मोरे निश्चय प्रमाण,
पूर्वजन्मे नारी रूपे छिलेकिना तुमि
आमारि जीवनवने सौंदर्ये कुसुमि
प्रणये विकशि । मिलने आछिले बाँधा
शुधु एक ठाँइ, विरहे टुटिया बाधा
आजि विश्वमय व्याप्त हये गेछो प्रिये
तोमारे देखिते पाइ सर्वत्र चाहिये ।

धूप दग्ध हये गेछे, गन्धबाष्प तार
पूर्ण करि फेलियाछे आजि चारिधार
गृहेर वनिता छिले, टुटिया आलय
विश्वेर कविता रूपे हयेछो उदय ।

( गत जन्मीं माझ्या जीवनवनांत सुंदर फुलाप्रमाणें उमलणाऱ्या, प्रणयानें विकसणाऱ्या नारीरूपानें तूं वास करीत होतीस कीं नाहीं, हें समजण्याचें दिव्यज्ञान कोणाला आहे ? याबद्दलचें निश्चित प्रमाण कोणाला देतां येईल बरें ! हे प्रिये, त्या वेळीं मीलनाच्या बंधनामुळें तूं एकाच जागीं सीमाबद्ध झाली होतीस. नंतर तें बंधन विच्छेदानें नष्ट झाल्यावर आतां तूं साऱ्या विश्वाला व्यापून टाकलें आहेस. यामुळें जेथें पाहावें तेथें तूं मला दिसतेस. धूप जळून गेल्यावर सुगंधरूपानें तो सर्वत्र पसरतो, त्याप्रमाणें गतजन्मीं माझ्यापाशीं गृहिणीरूपानें असलेली तूं आतां विश्वाच्या कवितारूपानें प्रकट झाली आहेस. )

व्यक्तिजीवनाची अधिष्ठात्री ‘ जीवनदेवता ’ आपल्या दीर्घकालीन सृजनात्मक कार्यानें अंशरूप व्यक्तीचा दीर्घ साधनेमधून पूर्णत्वाच्या दिशेनें विकास करीत असते. निसर्गाच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें—

सांग होले मेघेर पाला,
शुरू हबे वृष्टि ढाला
बरफ जमा शारा होले नदी हये गलबे—

मेघांची निर्मिति संपल्यावर जलवृष्टीला सुरुवात होते व पाण्याचें बर्फ बनण्याची क्रिया संपल्यावर तेंच बर्फ वितळत जाऊन नदीरूपानें वाहूं लागतें, त्याचप्रमाणें ‘ जीवनदेवते ’च्या सृजनकार्याचें क्षेत्र अत्यंत व्यापक असल्यामुळें तिची रहस्यलीला अनंत कालपर्यंत चालत असते.

* * *

वाल्मीकि, व्यास, कालिदास अशा प्राचीन महाकवींप्रमाणें कवींद्र रवींद्रनाथांनीं सुद्धां भिन्न भिन्न ऋतूंतील सृष्टिसौंदर्यानें मुग्ध होऊन उत्कृष्ट काव्यरचना केली आहे. त्यांचें बालपण कलकत्त्यांतील एका वाड्यांत गेल्यामुळें त्यांची निसर्गलीलांशीं ओझरतीहि ओळख नव्हती. पण त्यामुळेंच सृष्टिसौंदर्याबद्दल त्यांच्या मनांत अनिवार आकर्षण निर्माण झालें होतें. शिवाय रवींद्रनाथांचें हृदय उपनिषद्-विचारांनीं अनुप्राणित झालें होतें. तसेंच अद्वैतमतानुसार या सृष्टींत जें कांहीं प्रकाशमय, आनंदमय आहे, तें सच्चिदानंदरूप ईशतत्त्वाचाच आविष्कार होय, हें त्यांच्या मनावर बिंबलें होतें. मानवहि त्याच ईशतत्त्वाचा अंश असल्यानें त्याला सृष्टीबद्दल अनिवार आत्मीयता वाटते; सृष्टिसौंदर्याच्या दर्शनानें त्याचें मन पुलकित होऊन युगानुयुगांच्या नात्यानें तद्रूप होऊं पाहतें. हीच तद्रूपवृत्ति रवींद्रनाथांमध्यें प्रकर्षानें वास करीत असलेली आपणांला आढळून येते.

'शोनार तरी' काव्यग्रंथांतील 'वसुंधरा' ह्या दीर्घ कवितेंत त्यांना सृष्टीबद्दल वाटणारी व्यापक आपुलकी चांगलीच दिसून येते :

जननी, लहो गो मोरे
सघनबंधन तव बाहुजुगे धरे
आमारे करिया लहो तोमार बुकेर,
तोमार विपुल प्राण विचित्र सुखेर
उत्स उठितेछे जेथा से गोपनपुरे
आमारे लइया जाओ राखियो ना दूरे।

(हे जननी वसुंधरे, निबिड वात्सल्यानें तूं मला आपल्या बाहुबंधनांत घेऊन छातीशीं कवटाळून धर. मला आपलासा करून तुझ्या विपुल प्राणशक्तीचें, ह्या वैचित्र्यपूर्ण स्नेहसुखाच्या उगमस्थानाचें निगूढ रहस्य उद्घाटित कर.)

माता-पुत्राचें नातें जोडून एकात्मतेच्या योगानें कवि सृष्टीच्या सरस सौंदर्याचें रहस्य समजून घेऊं पाहत आहे. रवींद्रनाथांच्या काव्यामध्यें व

धूप दग्ध हये गेछे, गन्धबाष्प तार
पूर्ण करि फेलियाछे आजि चारिधार
गृहेर वनिता छिले, टुटिया आलय
विश्वेर कविता रूपे हयेछो उदय ।

( गत जन्मीं माझ्या जीवनवनांत सुंदर फुलाप्रमाणें उमलणाऱ्या, प्रणयानें विकसणाऱ्या नारीरूपानें तूं वास करीत होतीस कीं नाहीं, हें समजण्याचें दिव्यज्ञान कोणाला आहे ? याबद्दलचें निश्चित प्रमाण कोणाला देतां येईल बरें ! हे प्रिये, त्या वेळीं मीलनाच्या बंधनामुळें तूं एकाच जागीं सीमाबद्ध झाली होतीस. नंतर तें बंधन विच्छेदानें नष्ट झाल्यावर आतां तूं साऱ्या विश्वाला व्यापून टाकलें आहेस. यामुळें जेथें पाहावें तेथें तूं मला दिसतेस. धूप जळून गेल्यावर सुगंधरूपानें तो सर्वत्र पसरतो, त्याप्रमाणें गतजन्मीं माझ्यापाशीं गृहिणीरूपानें असलेली तूं आतां विश्वाच्या कवितारूपानें प्रकट झाली आहेस. )

व्यक्तिजीवनाची अधिष्ठात्री ' जीवनदेवता ' आपल्या दीर्घकालीन सृजनात्मक कार्यानें अंशरूप व्यक्तीचा दीर्घ साधनेमधून पूर्णत्वाच्या दिशेनें विकास करीत असते. निसर्गाच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें—

सांग होले मेघेर पाला,
शुरू हबे वृष्टि ढाला
बरफ जमा शारा होले नदी हये गलबे—

मेघांची निर्मिति संपल्यावर जलवृष्टीला सुरुवात होते व पाण्याचें बर्फ बनण्याची क्रिया संपल्यावर तेंच बर्फ वितळत जाऊन नदीरूपानें वाहूं लागतें, त्याचप्रमाणें ' जीवनदेवते ' च्या सृजनकार्याचें क्षेत्र अत्यंत व्यापक असल्यामुळें तिची रहस्यलीला अनंत कालपर्यंत चालत असते.

* * *

वाल्मीकि, व्यास, कालिदास अशा प्राचीन महाकवींप्रमाणें कवींद्र रवींद्रनाथांनीं सुद्धां भिन्न भिन्न ऋतूंतील सृष्टिसौंदर्यानें मुग्ध होऊन उत्कृष्ट काव्यरचना केली आहे. त्यांचें बालपण कलकत्त्यांतील एका वाड्यांत गेल्यामुळें त्यांची निसर्गलीलांशीं ओझरतीहि ओळख नह्वती. पण त्यामुळेंच सृष्टिसौंदर्याबद्दल त्यांच्या मनांत अनिवार आकर्षण निर्माण झालें होतें. शिवाय रवींद्रनाथांचें हृदय उपनिषद्-विचारांनीं अनुप्राणित झालें होतें. तसेंच अद्वैतमतानुसार या सृष्टींत जें कांहीं प्रकाशमय, आनंदमय आहे, तें सच्चिदानंदरूप ईशतत्त्वाचाच आविष्कार होय, हें त्यांच्या मनावर बिंबलें होतें. मानवहि त्याच ईशतत्त्वाचा अंश असल्यानें त्याला सृष्टीबद्दल अनिवार आत्मीयता वाटते; सृष्टिसौंदर्याच्या दर्शनानें त्याचें मन पुलकित होऊन युगानुयुगांच्या नात्यानें तद्रूप होऊं पाहतें. हीच तद्रूपवृत्ति रवींद्रनाथांमध्यें प्रकर्षानें वास करीत असलेली आपणांला आढळून येते.

'शोनार तरी' काव्यग्रंथांतील 'वसुंधरा' ह्या दीर्घ कवितेंत त्यांना सृष्टीबद्दल वाटणारी व्यापक आपुलकी चांगलीच दिसून येते :

जननी, लहो गो मोरे
सघनबंधन तव बाहुजुगे धरे
आमारे करिया लहो तोमार बुकेर,
तोमार विपुल प्राण विचित्र सुखेर
उत्स उठितेछे जेथा से गोपनपुरे
आमारे लइया जाओ राखियो ना दूरे।

( हे जननी वसुंधरे, निबिड वात्सल्यानें तूं मला आपल्या बाहुबंधनांत घेऊन छातीशीं कवटाळून धर. मला आपलासा करून तुझ्या विपुल प्राणशक्तीचें, ह्या वैचित्र्यपूर्ण स्नेहसुखाच्या उगमस्थानाचें निगूढ रहस्य उद्घाटित कर. )

माता-पुत्राचें नातें जोडून एकात्मतेच्या योगानें कवि सृष्टीच्या सरस सौंदर्याचें रहस्य समजून घेऊं पाहत आहे. रवींद्रनाथांच्या काव्यामध्यें व

गीतांमध्यें त्यांचें व्यापक वैचित्र्यपूर्ण सौंदर्यानें मंडित झालेलें निसर्गप्रेम जागोजाग आढळून येतें.

रवींद्रनाथांनीं इतर ऋतूंतील सृष्टिशोभेवर अनेक सुंदर कविता लिहिल्या असल्या तरी वर्षाकालीन सौंदर्यानें मुग्ध होऊन लिहिलेल्या त्यांच्या कविता केवळ अपूर्व आहेत. त्यांची प्रतिभा मेघाच्छन्न आषाढ-श्रावणांच्या अविराम जलधारांप्रमाणें सरसतेनें ओसंडत असलेली दिसते.

' बिष्टि पडे टापूर टुपुर ' कवितेंत वर्षाऋतूच्या आगमनानें कवीच्या मनांत बालपणच्या मधुर स्मृति कशा जागृत होतात, हें सुंदर रीतीनें दाखवलें आहे.

मेघेर खेला देखे कतो खेला मने पडे।
कतो दिनेर लुकोचुरी कतो घरेर कोने।
तारी संगे मने पडे छेलेबेलार गान
विष्टि पडे टापुर, टुपूर, नदेय एल बान।

आकाशांतील मेघांचा पळापळीचा खेळ पाहून बालपणाच्या खेळाची आठवण होते. लहानपणीं घराच्या निरनिराळ्या कोप्यांत किती वेळां तरी खेळलेला लपाछपीचा खेळ आठवतो. त्याचबरोबर लहानपणीं म्हणत असलेलें गाणेंहि आठवतें : पाऊस पडतो टापूर टुपूर, आलारे आला नदीला पूर.

'वर्षामंगल' ह्या उत्कृष्ट कवितेंत रवींद्रनाथांचें कविमन वर्षाऋतूच्या आगमनानें किती आनंदित झालें आहे, हें चांगलेंच दिसून येतें.

ऐ आसे ऐ अति भैरव हरषे
जलसिंचित क्षितिसौरभ रभसे
घनगौरवें नवयौवना वरषा,
श्याम गंभीर सरसा।

( ही पहा, ही वर्षा, उत्ताल आनंदानें येत आहे. तिच्या जलसिंचनानें मातीचा सुवास कसा दरवळून राहिला आहे ! श्यामल गंभीर पण सरस असें रूप धारण करून ही वर्षा नवयौवनानें अलंकृत होऊन येत आहे. )

अशा प्रकारच्या वर्षादेवीचें स्वागत करण्यासाठींच कीं काय, कवि नववधूंना, अभिसारिकांना आवाहन करीत आहे. लोभनीय नृत्य व मधुर

संगीत यांनीं आनंदोत्सव साजरा करा. कारण, हे सुंदरींनो, तुमचे विरहाचे दिवस आतां संपले. लवकरच तुमचे प्रवासी प्रियकर परत येऊन त्यांच्याशीं तुमचें प्रेममीलन होईल. हे पुरसुंदरींनो, घनवृष्टीमुळें लवकर काम आटपून घरीं परतणाऱ्या तुमच्या प्रियकरांच्या स्वागताची तयारी करा.

यूथि-परिमल आसिछे सजल समीरे
डाकिछे दादुरी तमालकुंज-तिमिरे
जागो सहचरी, आजिकार निशि भूलोना
नीपशाखे बांधो झूलना।

कुसुमपराग झरिबे झलके झलके,
अधरे अधरे मीलन अलके अलके
कोथा पुलकेर तुलना
नीपशाखे सखी, फुलडोरे बांधो झुलना॥

( सजल वाऱ्यावर जुईचा सुवास दरवळत आहे. अंधारलेल्या तमालकुंजांत बेडकी ओरडत आहे. सहचरी, ऊठ. ही रात्र प्रियमीलनाची आहे, हें विसरूं नकोस. अभिमानानें दूर न राहतां प्रियकराच्या स्वागतासाठीं कदंबशाखेला फुलांनीं शृंगारलेला झोपाळा बांध. एकमेकांच्या शेजारीं बसून झोके घेत असतांना, पुष्पपराग. उधळत असतांना, परस्परांच्या. केसांचें, अधरांचें होणारें मीलन किती मधुर असेल ! )

'नववर्षा' कवितेंत वर्षेच्या आगमनानें कवीचें हृदय आनंदानें पुलकित होऊन मोराप्रमाणें नृत्य करीत आहे.

नयने आमार सजल मेघेर नील अंजन
लेगेछे, नयने लेगेछे।
नवतृणदले घनवनछाये
हरष आमार दियेछि बिछाये
पुलकित नीपनिकुंजे आजि विकशित
प्राण जेगेछे।
नयने सजल स्निग्ध मेघेर नील अंजन
लेगेछे॥

( सजल मेघांकडे पाहतांना माझ्या डोळ्यांत पडणारी त्यांची घनछाया मला स्निग्ध काजळासारखी सुखदायक वाटत आहे. ह्या श्यामल हिरवळींत, वृक्षांच्या घनदाट छायेंत माझा आनंद सामावला आहे. बहरलेल्या कदंबाच्या कुंजांत माझें मन आज उल्हासानें जागृत झालें आहे. )

वरील प्रकारच्या काव्याचें सौंदर्य बरेंचसें इंद्रियग्राह्य अनुभूतींवर आधारलें आहे, हें स्पष्ट आहे. तेवढ्यावरच समाधान न मानतां रवींद्रनाथांनीं खऱ्या अद्वैतवादी विचारवंताप्रमाणें अतींद्रिय अनुभूतींच्या योगानें, गीतांजलि-कालांतील व नंतरच्या वर्षाकाव्याला एक प्रकारची आध्यात्मिकता प्राप्त करून दिली आहे.

गीतांजलींतील ' आषाढसंध्या ' कवितेंत—

हृदये आज ढेउ दियेछे, खुंजे ना
पाइ कूल;
सौरभे प्राण कांदिये तुले भिजे बनेर फूल।
आंधार राते प्रहरगुली कोन सूरे आज
भरिये तुली, कोन भुले आज सकलभूलि
आछि आकुल हये ॥

( ह्या वर्षाकालीन रात्रीं माझ्या हृदयपृष्ठावर सुद्धां लाटा उसळल्यामुळें, मी भांबावून गेलों आहें. मला किनारा सांपडेनासा झाला आहे. भिजलेल्या फुलांच्या वासामुळें माझें अंतर्मन कसल्याशा अनामिक जाणिवेनेंच कीं काय हाहाःकार करीत आहे. ह्या अंधाऱ्या रात्रीच्या दीर्घ प्रहरांची रिक्तता मीं कोणत्या रागिणीनें भरून काढूं, हें मला कळत नाहीं. सारें कांहीं विसरून मी असा कां बरें व्याकुळ झालों आहें ? ) ह्या ठिकाणीं वर्षाकालीन वातावरणांत कवीला आपल्या अपूर्णतेची तीव्र जाणीव झाली आहे.

' वर्षार रूप ' कवितेंत कवीला वर्षाकालीन सृष्टीचें स्वरूप अंध मानव-जातीच्या अग्रगतींत आढळत आहे.

पुंजे पुंजे दूर सुदूरेर पाने
दले दले चले, केन चले नाहि जाने ।

जानेना किछुई कोन महाद्रितले,
गभीर श्रावणे गलिया पडिबे जले।
नाहि जाने, तार घनघोर समारोहे
कोन शे भीषण जीवन मरण राजे।

भिन्न भिन्न मानवसमाज वर्षाकालीन मेघांप्रमाणें सुदूर दिगंताच्या दिशेनें चालले आहेत. पण आपण कोणत्या साध्याकडे चाललों आहोंत, हें त्यांना माहीत नाहीं. वाटेंत कोणत्या अभेद्य पर्वतरूपी दुर्लंघ्य अडथळ्याशीं आपल्याला टक्कर द्यावी लागणार आहे, वश्यता स्वीकारावी लागणार आहे हें पण त्यांना कळत नाहीं. ह्या मानवसमाजरूपी विशाल मेघांच्या स्पर्धात्मक धामधुमींत केवढ्या भयंकर जीवन-मरणाच्या संग्रामाची शक्ति सांठवलेली आहे, ह्याची त्यांना मुळींच जाणीव नाहीं असें दिसतें.

‘ शेष नमस्कार ’ कवितेंत—

घनश्रावणमेघेर मतो रसेर भारे नम्रनत
एकटि नमस्कारे प्रभु, एकटि नमस्कारे
समस्त मन पडिया थाक् तव भवनद्वारे।

( हे प्रभु, ह्या अखेरच्या नमस्कारानें माझें सारें मन श्रावणांतील रसभारानें नम्र झालेल्या घनमेघाप्रमाणें तुझ्या भवनद्वारीं नेहमीं लीन होऊन राहो. )

सर्व जल-स्थल-आकाशव्यापी सृष्टीच्या वैचित्र्यांत व समग्र मानवीजीवनाच्या भिन्नतेंत, विच्छिन्नतेंत अखंडता, परिपूर्णता पाहणें, उत्कटतेनें ती अनुभवणें हीच सर्वानुभूति. आपुलकीच्या, व्यापक प्रेमाच्या माध्यमानेंच ती प्राप्त होत असते. ह्याच आनंदमय सर्वानुभूतीच्या योगानें रवींद्रनाथांनीं एकंदर अस्तित्वामागील ‘ एकमेवाद्वितीयम् ’ सत्तेचें महान् स्वरूप ओळखलें. अशा प्रकारची व्यापक दृष्टि प्राप्त करून देणारी आनंदमय सर्वानुभूति हीच रवींद्रनाथांच्या काव्याचा प्राण होय, त्यांच्या जीवन-संगीताचा मूलस्वर होय.

* * *

संस्कृत काव्याशीं, विशेषतः कालिदासाच्या काव्याशीं, रवींद्रनाथांचा किशोरवयापासूनच दाट परिचय झाला होता. संस्कृतचे एक शिक्षक त्यांना कुमारसंभव, शाकुंतल शिकवीत. किशोरवयांतच रवींद्रनाथांनीं रघुवंशाच्या तेराव्या सर्गाचा व कुमारसंभवाच्या कांहीं भागाचा बंगालींत पद्यानुवाद केला होता. कालिदासाच्या काव्याविषयींची त्यांची आवड पुढें वाढतच गेली. सौंदर्यवादी रवींद्रनाथांच्या अनेक सरस कवितांत त्यांची कालिदास-प्रीति जागोजाग दिसून येते. आपल्या प्रभावी निबंधांतहि त्यांनीं कालि-दासाच्या काव्याचें व नाटकांचें उत्कृष्ट रसग्रहण केलें आहे. त्याच्या विशाल, वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोनाची वारंवार प्रशंसा केली आहे.

मेघदूत तर रवींद्रनाथांना विशेषच प्रिय होतें. आषाढाच्या प्रथम दिवसाच्या ज्या रूपमोहानें विव्हल होऊन कविकुलगुरूनें अमर मेघदूताची रचना केली, त्या आषाढाच्या वर्षासौंदर्याचें कवींद्रांनाहि अनिवार आकर्षण वाटत असे. ते लिहितात, ‘ आमार जीवनेओ प्रतिवत्सरे सेइ आषाढेर प्रथम दिन तार समस्त आकाशजोडा ऐश्वर्य निये उदय हय । ’ ( माझ्या जीवनांतहि दरवर्षी त्या आषाढाचा प्रथम दिवस आपल्या साऱ्या आकाशव्यापी सौंदर्या-निशीं उगवत असतो. ) अशाच एका दिवशीं मेघ-घन आकाशांतून जलधारा ओसंडत असतांना, वादळी वारा वाहत असतांना मेघदूताच्या वाचनानें रवींद्र-नाथांना जी दीर्घ कविता स्फुरली, तीच ‘ मानसी ’ या काव्यग्रंथांतली ‘ मेघदूत ’ कविता.

या कवितेंत सुरुवातीपासूनच कवींद्रांना वर्षाकालीन अनंत सौंदर्यांत चिरविरहाचें अपूर्व रूप उत्कटतेनें जाणवत असल्याचें स्पष्ट दिसतें. कवितेच्या आरंभींच कालिदासाला उद्देशून कवींद्र म्हणतात :

कविवर, कबे कोन विस्मृत वरषे  
कोन पुण्य आषाढेर प्रथम दिवसे  
लिखेछिले मेघदूत । मेघमंद्र श्लोक

विश्वेर विरहि जतो सकलेर शोक
राखियाछे आपन आंधार स्तरे स्तरे
सघन संगीत माझे पूंजीभूत करे ॥
शेदिन शे उज्जयिनी-प्रासादशिखरे
की ना जानि घनघटा, विद्युत्–उत्सव
उद्दाम पवनवेग, गुरुगुरु रव ।
गंभीर निर्घोष शेइ मेघ संघर्षेर
जागाये तुलिया छिलो सहस्र वर्षेर
अंतर्गूढ बाष्पाकुल विच्छेदक्रंदन
एक दिने । छिन्न करि कालेर बंधन
शेइ दिन झरे पडेछिलो अविरल
चिरदिवसेर जॅनो रुद्ध अश्रुजल
आर्द्र करि तोमार उदार श्लोकराशि ॥

( हे कविश्रेष्ठा, कोणत्या तरी पुरातन, अज्ञात वर्षी पवित्र आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशीं तूं मेघदूताची रचना केलीस. वर्षाकाळच्या मेघांप्रमाणें धीर, गंभीर प्रकृतीचे जे श्लोक तूं रचलेस, त्या श्लोकांच्या घनश्यामल थराथरांत व भावनाघन संगीतांत जगांतील सर्व विरही जनांचें दुःख एकवटलें आहे. त्या दिवशीं त्या सुदूर उज्जयिनींतील प्रासादशिखरावर किती तरी घनदाट मेघ जमा झाले असतील, विद्युल्लतेची विस्मयकारक लीला, वादळी वाऱ्याचें उद्दाम तांडव आणि मेघांचा गडगडाट चालला असेल. हजारों वर्षांना प्रच्छन्नपणें व्यापणारें अश्रुविव्हल विरहक्रंदन गंभीर मेघनिर्घोषामुळें त्या एका दिवसांतच जागृत झालें असेल. दीर्घकाळ सांचून राहिलेलें अश्रुजलच जणूं त्या दिवशीं काळाचें बंधन न जुमानतां अविरत धारांनीं ओसंडत होतें. त्यानेंच तुझ्या श्रेष्ठ श्लोकांना रसस्नान घातलें आहे. )

कवींद्र कौतुकभरानें महाकवि कालिदासाला विचारतात : त्या दिवशीं प्रवासांत असलेल्या साऱ्याच विरही प्रेमिकांनीं सुंदर प्रेयसींच्या निवासस्थानांकडे वळून घन मेघांना नमस्कार करीत आपली विरहगाथा एकाच स्वरांत गायिली होती का ? आपल्या प्रेमाचा अश्रुसजल निरोप अगदीं दूर मोकळ्या

केसांनीं व मलिन वस्त्रांनीं विरह-दुःख भोगणाऱ्या आपल्या प्रेयसींकडे बंधनहीन मेघांमार्फत पाठविण्याचा प्रयत्न केला होता का? श्रावणांतील गंगा ठिकठिकाणचे जलप्रवाह सामावून घेत अदम्य, विस्तृत प्रवाहानें सुदूर सागराकडे वाहत असते, त्याप्रमाणें हे महाकवि, त्या दिवशीं तूं सर्व विरही प्रेमिकांच्या वतीनेंच कीं काय त्यांचें विरहगीत आपल्या प्रभावी संगीतांतून त्यांच्या देशोदेशींच्या विरहकातर प्रेयसींकडे निश्चितच पोंचतें केलेंस.

शेदिनपरे गेछे कतो शतबार
प्रथम दिवस स्निग्ध नव वरषार
प्रतिवर्षा दिये गेछे नवीन जीवन
तोमार काव्येर परे करि वरिषण
नववृष्टि वारिधारा, करिया विस्तार
नवघनस्निग्धच्छाया, करिया संचार
नव नव प्रतिध्वनि जलद मंद्रेर,
स्फीत करि स्रोतवेग तोमार छंदेर
वर्षातरंगिणी सम ॥

( त्या दिवसानंतर स्निग्ध नववर्षेचे किती तरी प्रथम दिवस शेकडों वेळां निघून गेले आहेत. त्यांपैकीं प्रत्येक वर्षाऋतूनें तुझ्या काव्यावर नवनवीन जलधारांचा वर्षाव करून, नवमेघांच्या मंद छायांचा विस्तार करून, नवमेघांच्या मंद गंभीर प्रतिध्वनींचा संचार करून तुझ्या छंदप्रवाहांत वर्षाकालीन नदीप्रमाणें व्यापकता निर्माण केली आहे. तुझ्या काव्यांत नवजीवनाचा संचार आहे. )

'गेलीं कित्येक शतकें असंख्य विरही प्रेमिकांनीं आषाढांतील वर्षाघन सायंकाळीं तुझ्या अपूर्व छंदाचें मंदस्वरानें गायन करीत आपली विरहव्यथा निववली आहे. त्या सर्वांचा कंठस्वर समुद्रलहरींच्या कलध्वनीप्रमाणें आज मला ऐकूं येत आहे. जेथें एके काळीं कवि जयदेवानें क्षितिजावरील श्यामल तमालवनांचें, मेघव्याप्त आकाशाचें सरस निरीक्षण केलें होतें. त्या श्यामसुंदर वंग देशांत मी ह्या वर्षाघन सायंकाळीं तुझें मेघदूत काव्य वाचीत आहें. आज माझें गृहत्यागी मन बंधनहीन मेघावर बसून देशोदेशीं भ्रमण करीत

आहे.' ( यापुढें कवींद्रांनीं सबंध 'पूर्वमेघा' चें पस्तीस-चाळीस काव्य-पंक्तींतच रेखाटलेलें वर्णन केवळ अपूर्व आहे.) 'कोठें तो सानुमान आम्रकूट.... विंध्यपर्वताच्या पायथ्याकडून वाहणारी ती शीर्ण रेवा......वेत्रवतीच्या कांठचा तो सुंदर दशार्ण गांव ! ज्यांच्या टपोऱ्या निळ्या डोळ्यांत मेघांची घननील छाया पडते, अशा त्या सुशील ग्रामवधू, कुठल्याशा घनश्याम पर्वत-शिखरावर बसून विमनस्कपणें नवमेघाकडे पाहतांना अकस्मात् त्याच्या गडगडाटानें भयत्रस्त होऊन गुहांचा आश्रय शोधणाऱ्या त्या सिद्धांगना.... कोठें ती अवंती नगरी....! शिप्रानदीच्या पाण्यांत आपला महिमा पाहणारी ती उज्जयिनी, तेथें घनांधकारांत, क्षणिक विद्युत्प्रकाशांत प्रेमाभिसारासाठीं जाणाऱ्या त्या विरहकातर रमणी...., कोठें तें ब्रह्मावर्तांत वसलेलें कुरुक्षेत्र.... जेथें यौवनचंचल जान्हवी पार्वतीच्या रोषाला न जुमानतां शंकराच्या चंद्र-करोज्ज्वल जटांशीं फेनरूपानें परिहासलीला करीत असते, असें तें कनखल, अशा रीतीनें माझें हृदय देशोदेशीं मेघरूपानें भ्रमण करीत करीत शेवटीं कैलास-मानससरोवरांकडील अलकापुरीला जाऊन पोंचतें. कामनेचें मोक्षधाम बनलेल्या त्या अलकानगरींतच विरहिणी प्रियतमा सौंदर्याच्या आदिनिर्मिती-प्रमाणें शोभतांना मला खिडकींतून क्षीण चंद्रकोरीसारखी दिसूं लागते. त्या मुक्ताविलासपुरीमध्यें, हे महाकवि, मला तुझ्याशिवाय दुसरा कोण बरें घेऊन जाऊं शकला असता ?'

कवि, तव मंत्रे आजि मुक्त हये जाय
रुद्ध एइ हृदयेर बंधनेर व्यथा ।
लभियाछि विरहेर स्वर्गलोक जेथा
चिरनिशि यापितेजे निरहिणी प्रिया
अनंत सौंदर्यमाझे एकाकी जागिया ॥

( हे कवि, माझ्या हृदयांत गुदमरणारी बंधनव्यथा आज तुझ्या प्रभावी काव्यमंत्रानें मुक्त झाली आहे. जेथें विरहिणी प्रिया अनंत सौंदर्यांत अगदीं एकाकीपणें जागृत राहून दुःखी मनानें चिररात्र कंठीत असते, अशा त्या विरहाच्या स्वर्गलोकांत मी पोंचलों आहें. )

एकीकडे अपरिवर्तनीय सृष्टिसौंदर्याच्या कारागारांत बंधनव्यथा भोगणारी विरहिणी सौंदर्यप्रतिमा आणि दुसरीकडे तिच्याशीं मीलन होण्यासाठीं उत्कंठित होणारें विरहकातर सौंदर्यासक्त मानवी मन, या दोघांच्या व्यथांचा केंद्रबिंदु अचूक टिपून घेऊन, रवींद्रनाथांनीं येथें कालिदासाच्या काव्य-प्रतिभेच्या माध्यमानें त्या दुर्लभ सौंदर्यप्रतिमेचें दर्शन घडल्यामुळें हृदयाची बंधनव्यथा दूर झाल्याचा आनंद व्यक्त केला आहे. परंतु—

आबार हाराये जाय। हेरि, चारिधार
वृष्टि पडे अविश्राम। घनाये आंधार
आसिछे निर्जन निशा। प्रांतरेर शेषे
केंदे चलियाछे वायु अकूल-उद्देशे।
भावितेछि अर्धरात्री अनिद्र नयान
के दियेछे हॅनो शाप, कॅनो व्यवधान।
कॅनो ऊर्ध्वे चेये काँदे रुद्ध मनोरथ
कॅनो प्रेम आपनार नाहि पाय पथ।
सशरीरे कोनो नर गेछे सेइखाने,
मानससरसीतीरे विरह शयाने,
रविहीन मणिदीप्त प्रदोषेर देशे
जगतेर नदीगिरि सकलेर शेषे॥

( अरेरे, हें मीलन-सूत्र परत हरवून गेलें. हें मानसमीलन शेवटीं क्षण-स्थायीच ठरलें. आतां पाहतों तर चहूंकडे अविरत जलवृष्टि होत आहे. अंधार पडून निर्जन रात्रीचें आगमन झालें आहे. अधीर वारा, मैदानाच्या शेवटीं असीम लक्ष्याचा शोध करतां करतां विलाप करीत चालला आहे. आतां मध्यरात्रीं निद्राहीन अवस्थेंत मी विचार करीत आहें. मानवाला असा विच्छेदाचा शाप कोणीं दिला ? दूरत्वाची वेदना त्याला कां बरें भोगावी लागते ? मानवाचे गुदमरलेले मनोरथ आकाशाकडे पाहात कां अश्रु ढाळतात ? मानवी प्रेमाला आपल्या साफल्याचा मार्ग कां बरें सांपडत नाहीं ? सुदूर मानससरोवराजवळच्या त्या रहस्य-लोकांतील बंदिस्त सौंदर्यप्रतिमेच्या विरह-शय्येपाशीं स्थूल देहानें कोण गेला आहे ? जगांतील नदी-पर्वतांच्या पलीकडे

अगदीं सरते शेवटीं जेथें रविप्रकाश पोंचत नाहीं, रत्नोज्ज्वल संध्येचा प्रकाशच जेथें नेहमीं पसरलेला असतो, अशा त्या अलौकिक देशांत आजपर्यंत सदेहपणें कोण खरें प्रवेश करूं शकला आहे ? )

अर्थातच, तेथें कोणीच जाऊं शकलेला नाहीं. कारण, येथें कवितेच्या शेवटीं रवींद्रनाथांना असें सुचवायचें आहे कीं, ज्या प्रेमाशीं सार्थक मीलन होण्यासाठीं आपण नेहमीं उत्कंठित होत असतो, तें आपल्या मानस-सरोवराच्या अगम्य तीरावर वास करीत असतें. तेथें फक्त तरल कल्पनाच पोचूं शकते. सूक्ष्म सौंदर्यचेतनेनेंच आपणांला क्षणिक मीलनाचा आनंद लाभूं शकतो. थोडक्यांत सांगायचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, सुदूर, अनिर्वचनीय सौंदर्यलोकाबद्दल सीमाबद्ध मानवी मनाला एक प्रकारची जी निरंतर ओढ वाढत असते, सीमाहीन विरह-कातरता जाणवत असते, तीच या अपूर्व कवितेंत प्रामुख्यानें प्रकट झाली आहे.

महाकवि कालिदासाच्या अमर मेघदूतांत जागोजाग व्यक्त झालेल्या विरहवेदनेच्या विश्वव्यापकतेची तात्त्विकता अद्वैतवादी रवींद्रनाथांच्या ‘ शानाइ ’ काव्यग्रंथांतील ‘ यक्ष ’ कवितेंत जास्तच व्यापक रीतीनें प्रकट झाली आहे. अलकानगरीच्या मार्गानें अविरत अग्रेसर होणाऱ्या यक्षाच्या विरहवेदनेचें अपूर्व काव्यरूप रंगवतांना कवींद्र म्हणतात :

पथिक कालेर मर्मे जेगे थाके विपुल विच्छेद;
पूर्णतार साथे भेद
मिटाते शे नित्य चले भविष्येर तोरणे तोरणे
नव नव जीवने मरणे ।
ए विश्व तो तारि काव्य, मंदाक्रान्ते तारि रचे टीका
विराट दुःखेर पटे आनंदेर सुदूर भूमिका ।
धन्य यक्ष शेइ
सृष्टिर आगुन-ज्वाला एइ विरहेइ ।

( पथिक काळाच्या मर्मस्थानीं व्यापक स्वरूपाचा विच्छेद नेहमींच जागृत असतो. स्वतःच्या व पूर्णतेच्या दरम्यानचें अनैक्य दूर करण्यासाठीं तो

भविष्याच्या बहिर्द्वारांतून, नवनवीन जीवनांतून आणि मरणांतून अविरतपणें अग्रेसर होत असतो. हें विश्व तर त्यानेंच रचलेलें काव्य आहे. मंदाक्रांता छंदांत तो त्याचें निरूपण करतो, व्यापक दुःखाच्या पटावर नेहमीं सुदूर मीलनानंदाची भूमिका रेखाटीत असतो. सृष्टीच्या दाहक विरहज्वाला सहन करणारा तो यक्ष खरोखरच धन्य होय. )

* * *

# रवीन्द्रसंगीत : ५

All art constantly aspires towards the condition of music. It is the art of music which most completely realises this artistic ideal, this perfect identification of form and matter.

— *Walter Pater*

बहुमुखी प्रतिभेच्या रवींद्रनाथांनीं संगीतक्षेत्रांतहि वैशिष्ट्यपूर्ण स्थान पटकाविलें. ते नुसते कवि नव्हते, भावगीतकार कवि होते. रवींद्रसंगीत विशेषतः बंगालमध्यें बरेंच लोकप्रिय आहे. या लेखांत रवींद्रनाथांच्या संगीत-विषयक कामगिरीचें थोडक्यांत विवेचन करण्याचें योजिलें आहे.

रवींद्रनाथांवर लहानपणापासून संगीताचा प्रभाव पडला होता. त्यांचे थोरले बंधु हेमेंद्रनाथ व ज्योतिरिंद्रनाथ संगीताचे मोठे भोक्ते होते. मुलांना संगीत शिकवण्यासाठीं गायकहि नेमले होते. संगीतशिक्षणाबद्दलच्या मनो-रंजक आठवणी रवींद्रनाथांच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकांत जागोजाग आढळ-तात. वडिलांबरोबर हिमालयभ्रमण करीत असतांना प्रार्थनेच्या वेळीं ब्राह्मो समाजाचीं उपासनागीतें ते नियमित गात असत. इकडील शास्त्रीय संगीताच्या शिक्षणाशिवाय पाश्चिमात्य संगीताचीहि रवींद्रनाथांना लहानपणीं माहिती झाली होती. ज्योतिरिंद्रनाथ पिआनोवर गीतांना चाली लावीत असत. पुढें सतराव्या वर्षी रवींद्रनाथ इंग्लंडला गेले, तेव्हां पाश्चिमात्य संगीताशीं त्यांचा

चांगलाच परिचय झाला. रवींद्रनाथांचा गळा गोड होता. जोरासाँको वाड्यांत, विलायतेच्या प्रवासांत व इंग्लंडांत, भारतीय व पाश्चिमात्य संगीताच्या गायनाबद्दल ते परिचित वर्गांत लोकप्रिय होते. अशा रीतीनें लहानपणापासून संगीताच्या वातावरणांत वाढल्यानें पुढील आयुष्यांत ते संगीत-क्षेत्रांत भरीव कामगिरी करूं शकले.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतांतील रागरागिणींच्या आश्रयानेंच बंगाली संगीत वृद्धिंगत झालें. तरी नंतर वैष्णव भक्तकवींच्या कीर्तन-संगीताला प्राधान्य प्राप्त झालें. रवींद्रनाथांपूर्वी बंगालमध्यें रामप्रसाद, निधू गुप्त, राम बसू असे नामवंत संगीतकार होऊन गेले. त्यांचीं गीतें मधुर, भावपूर्ण असूनहि इंग्रजी शिक्षणानें प्रभावित झालेल्या आधुनिक काळांत ते संगीतकार मागें पडले. रवींद्रनाथ शास्त्रीय संगीताच्या वातावरणांत लहानाचे मोठे झाले होते. शास्त्रीय संगीतांत शिरलेले दोष त्यांना जास्त जाणवूं लागले, तसे ते कीर्तनसंगीताच्या भावपूर्ण माधुर्याकडे आकर्षित झाले. संगीतांत वास्तविक गाण्याला महत्त्व असतें; पण मैफलीमध्यें संगीतशास्त्रालाच प्राधान्य मिळून गाणें गौण होतें. शास्त्रीय गायनांत गीत नसतेंच. रागरागिणींचा विस्तार चालतो. गोड गळ्याचे श्रेष्ठ गायकच असें गायन यशस्वी रीतीनें करूं शकतात. पण बहुतेक वेळां गोड गळ्याच्या व भावपूर्ण गीताच्या अभावीं शास्त्रीय संगीत कानांना व अर्धशिक्षित गायकाच्या हास्यास्पद अंगविक्षेपांनीं डोळ्यांना तापदायकच होतें. श्रेष्ठ दर्जाचें शास्त्रीय संगीत दुर्लभ असल्यानें त्याचें क्षेत्र साहजिकच मर्यादित होतें. दुसरें असें कीं, खोट्या अभिमानाला बळी पडून सरस लोकसंगीताची उपेक्षा केल्यामुळें शास्त्रीय संगीत जास्तच मर्यादित होतें.

रागरागिणींचें महत्त्व रवींद्रनाथांना मान्य होतें. गीतांतील शब्दरचना संगीताचें वाहन असल्यानें शब्दरचनेला साहजिकच गौणत्व येतें. रागरागिणींचें ऐश्वर्य स्वयंभू असतें. रसनिष्पत्तीसाठीं त्यांना गीतांवर अवलंबून राहावें लागत नाहीं, हें उघड आहे. पण बंगालमध्यें काव्याची परंपरा पहिल्यापासूनच प्रभावी असल्यानें विशुद्ध संगीताचा व्यापक प्रसार होऊं शकला नाहीं. वैष्णव कवींच्या पदावलीपासून आधुनिक काळापर्यंत मुख्यतः

काव्याच्या आश्रयानेंच त्याची वाढ होणें स्वाभाविक होतें. असें असलें तरी काव्यात्मक गीतांवर रागरागिणींचा प्रभाव पडून तीं गौण ठरतात. पण एकंदरींत सरस गीतांच्या बैठकीमुळें संगीताची रसवृद्धि होते, असेंच आढळून येतें. रवींद्रनाथ थोर कवि व संगीतज्ञ असल्यामुळें भावतरल कवितांशीं अनुरूप रसाविष्कार करणाऱ्या रागरागिणींचा संयोग करून, किंवा राग-रागिणींच्या सुरावटीला अनुरूप भावपूर्ण काव्याची बैठक देऊन त्यांनीं दुधांत साखर मिसळण्याचें महत्त्वाचें कार्य केलें. काव्य व संगीत यांच्या युतीविषयीं रवींद्रनाथ म्हणतात : "काव्यांतर्गत शब्दरचना मानवकृत असते व संगीत नैसर्गिक असतें. शब्दरचना स्पष्ट, सीमाबद्ध असते, तर संगीत हें अस्पष्ट, सीमाहीन असतें. यामुळें शब्दरचनेंत वावरणारा मनुष्य मानव-लोकांत असतो व तोच मनुष्य संगीताच्या योगानें सर्व विश्वप्रकृतीशीं एकरूप, समरस होतो. या कारणानें काव्याशीं संगीताचा संयोग झाला कीं मानवाच्या सुखदु:खादि भावनांना अनंत आकाशाची व्यापकता प्राप्त होते. वैयक्तिक वेदना प्रभातकालीन व सायंकालीन क्षितिजांच्या रंगछटांशीं एकरूप होते. विश्वाच्या विराट अव्यक्ताशीं संयोग पावल्यानें मानवी वेदनेला अलौकिक सौंदर्य लाभतें."

रवींद्रप्रतिभेच्या प्रभातकाळापासूनच संगीताचा प्रभाव स्पष्टपणें दिसून येतो. वैष्णव संतकवींच्या अनुकरणानें रवींद्रनाथांनीं किशोर वयांत 'भानु-सिंहाची पदावली' रचली. त्यांच्या सुरुवातीच्या काव्य-ग्रंथांचीं नांवेंहि संध्या-संगीत, प्रभातसंगीत, शैशव-संगीत, अशीं आहेत. सुप्रसिद्ध 'वंदेमातरम्' गीताला त्यांनींच पहिली चाल लावली. त्यांचा पहिला गीतसंग्रह 'रविछाया' १८८४ सालीं प्रसिद्ध झाला. तरुणपणींच त्यांनीं 'वाल्मीकि-प्रतिभा' व 'मायार खेला' ( मायेचा खेळ ) अशीं दोन गीतप्रधान नाटकें लिहिलीं. या नाटकांत हिंदुस्थानी पद्धतीच्या गीतांबरोबरच त्यांनीं आयरिश गीतांचाहि समावेश केला. पौरस्त्य व पाश्चिमात्य संगीताचा समन्वय करण्याचा हा प्रयोग बराच यशस्वी झाला, पण स्वत:चें समाधान न झाल्यामुळेंच कीं काय त्यांनीं तो प्रयोग पुढें सोडून दिला व भारतीय रागरागिणींचा उपयोग चालू ठेवला. रवींद्रनाथांच्या पुढील काव्यग्रंथांपैकीं गीतांजलि, गीतालि, गीतिमाल्य हीं नांवें पाहिलीं कीं त्यांच्या काव्यावर प्रथमपासून अखेरपर्यंत

क्रमांक ...... नों: दि: ......

संगीताचा केवढा प्रभाव होता, हें स्पष्ट दिसून येतें. त्यांनीं आपल्या सर्व नाटकांत गीतांचा भरपूर उपयोग केला आहे. रवींद्रनाथांच्या एकूण भावगीतांची संख्या दोन हजारांपर्यंत जाते. या एकाच गोष्टीवरून त्यांच्या संगीतविषयक कामगिरीची पुरेशी कल्पना येते. रवींद्रसंगीतांतील भावगीतांच्या स्वरलिप्या तयार करण्यांत आल्या. या स्वरलिप्यांचें विश्वभारतीतर्फे आजवर ‘ स्वरवितान ’ नांवानें एकावन्न खंड प्रसिद्ध झाले आहेत. स्वरलिप्यांचें संकलन करण्यांत रवींद्रनाथांची पुतणी श्रीमती इंदिरादेवी चौधुरी यांचा बराच मोठा वांटा आहे. त्यांच्या दीर्घ परिश्रमांमुळें रवींद्रनाथांच्या भावगीतांना स्थायी स्वरूप प्राप्त झालें आहे.

रवींद्रनाथांनीं हजारों भावगीतें रचलीं असलीं, तरी त्यांत तोचतोचपणा नाहीं, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. ताल, सुरावट व भावनाविष्कार यांच्या व्यापक वैचित्र्यानें त्यांचीं सारीं भावगीतें वैशिष्ट्यपूर्ण झालीं आहेत. रवींद्रनाथांनीं प्रचलित तालांचा उपयोग करून नवीन तालांचेहि प्रयोग केले. नऊ, अकरा व तेरा अशा मात्रांचे तीन ताल त्यांनीं बसवले. या बाबतींत त्यांचें वैशिष्ट्य मान्य करावें लागतें. सुरावटींत वैचित्र्य आणण्यासाठीं त्यांनीं भिन्न रागरागिणींचीं अनेक मिश्रणें केलीं. असें करण्यानें त्यांनी शास्त्रीय संगीताचे नियम मोडले असें समजण्याचें कारण नाहीं. कारण प्रचलित शास्त्रीय संगीतांतहि देशीतोडी, काफीसिंधु, गौडमल्लार, वसंतबहार असे मिश्र प्रकार आढळतात. आडाणा, शंकरा, हे प्रचलित रागहि अनुक्रमें सारंग—कानडा, बिहाग-कल्याण अशा मिश्र स्वरूपांचे आहेत. निरनिराळ्या रागांच्या मिश्रणानें रवींद्रनाथांनी सुमारें तीस नवीन रागिण्या तयार केल्या. त्यांचा व इतर रागमिश्रणांचा उपयोग करून सुमारें एक हजार गीतांना चाली लावल्या. तसेंच बाऊल, कीर्तन, भाटियाली वगैरे लोक-संगीताच्या प्रकारांचा भरपूर उपयोग करून आपलें संगीत जास्तच समृद्ध केलें. शास्त्रीय संगीताच्या दांभिक आभिजात्याची संकीर्णता ओलांडून त्यांनीं संगीताला सर्वलोकाभिमुख बनविलें

भावनाविष्काराच्या दृष्टीनेंहि रवींद्रनाथांच्या भावगीतांत बरेंच वैचित्र्य आढळतें. सृष्टिव्यापी सौंदर्याच्या दर्शनानें होणाऱ्या आनंदानुभूतीच्या योगानें कवीला विराट जीवनाची प्रचीति येते. ही प्रचीति टिकवण्यासाठीं तो सीमा-

बद्ध जीवनांतून मुक्त होण्याची धडपड करतो. भावी विच्छेदाच्या शंकेनें उदास होतो. अशी वेदना रवींद्रनाथांच्या भावगीतांत रूपवैचित्र्यानें अनेक वेळां व्यक्त झाली आहे. भावनेचा आवेग ते चंचल स्वरविलासांत वारंवार अनुभवीत असत. रवींद्रनाथ लिहितात, " भैरवी, तोडी व रामकली यांच्या खास मिश्रणानें बनलेली एक प्रभातकालीन रागिणी गुणगुणत असतांना अकस्मात् माझ्या मनांत तीव्र पण मधुर चांचल्याचें आलोडन निर्माण झालें. कसल्याशा अनिर्वचनीय भावनेच्या आवेगानें मन व्यापून गेलें. एका क्षणांत या वास्तव, सीमाबद्ध जगताचें व जीवनाचें अद्‌भुत परिवर्तन अनुभवास आलें. जणूं मानवी अस्तित्वाच्या साऱ्या कठीण समस्यांचें भाषाहीन पण संगीतमय, भावनामय असें उत्तरच माझ्या कानांत निनादूं लागलें. " अशा प्रकारची दुर्लभ अनुभूति फक्त श्रेष्ठ कलावंतांनाच लाभत असते. सीमाबद्ध जीवनाच्या विषण्णतेंत कवींद्रांना संगीताच्या योगानें मुक्तीचा आस्वाद मिळतांच ते म्हणतात :

आमार मुक्ति आलोय आलोय एइ आकाशे
आमार मुक्ति धुलाय धुलाय घासे घासे ।
देहमनेर सुदूर पारे हारिये फेलि आपनारे
गानेर सूरे आमार मुक्ति ऊर्ध्वे भासे ॥

( अनंत आकाश व्यापून टाकणाऱ्या ह्या विपुल प्रकाशांत, ह्या स्नेहमय धुळींत व सजीव हिरवळींत मला मुक्तीचा अनुभव येत आहे. देहमनातीत अवस्थेंत मी स्वतःचें अस्तित्व विसरून गेलों, म्हणजे संगीताच्या स्वरप्रवाहांत मुक्तीची अनुभूति तरंगत असल्याचा भास होतो. )

रवींद्रनाथांच्या अनेक भावगीतांत मानवी सुखदुःखांचीं विविध आंदोलनें आढळतात. प्रियजनांच्या विरहमीलनात्मक भावनांचा वैचित्र्यपूर्ण आविष्कार तर वारंवार प्रत्ययास येतो. पण अशा भावनाविष्कारांत अदम्य आवेग न दिसतां शांत, कामनाहीन प्रेमभावनेचा, विरही प्रेमाच्या आकुलतेचा आढळ होतो. आपल्या भावगीतांचें हें कार्य लक्षांत घेऊनच कीं काय, रवींद्रनाथ उतारवयांतहि उत्साहानें रचना करूं लागले. ते म्हणतात :

जदि होथाय बकुल वनच्छाये
मिलन घटे तरुण तरुणीते,
दुटि आँखिर परे दुइटि आँखि
मिलिते चाय दुरंत संगीते,
के ताहादेर मनेर कथा लये
वीणार तारे तुलबे प्रतिध्वनि
आमि जदि भवेर कुले वसे
परकालेर भालो मंदई गणि।

( घनदाट बकुळीच्या झाडाखालीं तरुण-तरुणींची भेट झाल्यावर त्यांच्या प्रेममय नेत्रांना भावपूर्ण संगीताच्या माध्यमानें मीलन घडवून आणायचें असेल, तर त्या वेळीं त्यांच्या मनांतील मूक भाषा जाणून ती वीणेच्या झंकारानें माझ्याशिवाय कोण बरें व्यक्त करील? मी वृद्ध झालों, तरी संसारसागराच्या तीरांवर जडवत् बसून परलोकींच्या बऱ्यावाइटाचा विचार करण्यापेक्षांहि संगीतकाराची भूमिकाच जास्त पसंत करीन. )

रवींद्रनाथांच्या भावगीतांत भक्तिपर गीतेंहि बरींच आहेत. प्राचीन काळचे ऋषि परमेश्वरप्राप्तीसाठीं कठोर तपश्चर्या करीत. आधुनिक काळांतील ह्या ऋषितुल्य महाकवीनें संगीत-साधनेच्या योगानें मधुर भक्तिरसाची आळवणी केली. रवींद्रनाथ म्हणतात :

दाँडिये आछो तुमि आमार गानेर ओ पारे
आमार सुरगुलि पाय चरण, आमि पाइने तोमारे॥

( हे परमेश्वरा, तूं माझ्या संगीताच्या पैलतीरीं वास करतोस. माझ्या भक्तिगीतांच्या स्वरांना तुझा पवित्र चरणस्पर्श लाभतो. पण मला मात्र ह्या तीरावर तुझ्यापासून दूर राहावें लागतें. )

यासाठीं परमेश्वराशीं मीलन व्हावें म्हणूनच कीं काय रवींद्रनाथ प्रार्थना करतात :

तोमार काछे ए वर मागि, मरण हते जेनो
जागि, गानेर सुरे।

(करुणाघना देवा, मी तुझ्यापाशीं आतां एकच वर मागतों. तो असा कीं, मरणनिद्रेनंतर मी जागा होईन, तेव्हां संगीताच्या सुरांतच माझें चैतन्य समाविष्ट झालेलें असावें. )

* * *

## आदर्श स्त्री : ६

सध्यांचें द्रुत गतिमान् यांत्रिक युग महाकाव्याच्या निर्मितीला पोषक नाहीं असें मानलें जातें. रवींद्रनाथांनीं लौकिक दृष्टीनें रामायण, महाभारता-सारखें महाकाव्य रचलें नसलें तरी त्यांच्या विपुल काव्यसंभाराचें लक्षपूर्वक अवलोकन केलें असतां असें आढळतें कीं, महाकवीला आवश्यक असणारी सुदूरप्रसारी प्रतिभा व सखोल अंतर्दृष्टि त्यांच्या ठायीं पुरेपूर वास करीत होती. त्यांच्या उच्च कोटीच्या वैचारिक क्रमविकासांत विलक्षण एकसूत्रता नांदत होती. ह्या दृष्टीनें रवींद्रनाथांच्या वैचित्र्यपूर्ण काव्यसंभाराला महा-काव्याचा मान देणें योग्यच होईल. काय्जरलिंग्, श्लाइट्झर, विंटेरस्टाइन यांसारख्या पंडितांनीं तर रवींनाथांबद्दल गौरवपूर्ण उद्गार काढतांना जर्मन महाकवि ग्यटेशीं त्यांची तुलना करून त्यांना 'भारतीय ग्यटे' अशी पदवी दिली आहे.

जगांतल्या निरनिराळ्या महाकवींनीं आपापल्या प्रतिभेच्या रंगवैचित्र्यानें आदर्श स्त्रीचीं चित्रणें केलीं आहेत. त्यांमध्यें कवींद्र रवींद्रनाथांनीं महत्त्वाचें स्थान पटकावलें आहे. प्राचीन संस्कृत कवींप्रमाणें रवींद्रनाथांनीहि आपल्या काव्यांत स्त्री-देहाचें वर्णन केलें आहे. पण तें वर्णन भोगदृष्टीनें कलुषित झालेलें नाहीं स्त्रीसौंदर्याचें वर्णन करतांना त्यांनीं संयम पाळला आहे, एवढेंच नव्हे, तर तें सौंदर्य पावित्र्यावर अधिष्ठित केलें आहे. निद्रामग्न राजकन्येच्या विकसित यौवनाला त्यांनीं 'पानांनीं झांकलेल्या पूजेच्या अनाघ्रात पुष्प-युगला' ची उपमा दिली आहे. स्त्रीच्या लावण्यानें, तिच्या स्नेहशीलतेनें व पावित्र्यानें रवींद्रनाथांचें कविमन रहस्यमुग्ध झालें होतें. स्त्री-सौंदर्याच्या दर्शनानें पुरुषाचें सुप्त प्रेम जागृत होतें. प्रेम हें पूजेइतकेंच पवित्र असतें.

प्रेमपूजनाचें श्रेष्ठत्व रवींद्रनाथांनीं ‘ प्रेमाचा अभिषेक ’ या कवितेंत बहारीनें वर्णन केलें आहे. प्रेयसीला उद्देशून ते म्हणतात :

तुमि मोरे करेछो सम्राट...
आमार शकल दैन्य लाज,
आमार क्षुद्रता जतो, ढाकियाछो आज
तव राज-आस्तरणे । हृदि-शय्यातल
शुभ्र दुग्ध-फेननिभ, कोमल शीतल
तारि माझे बशायेछो ।

(हे प्रिये, तूं आपल्या प्रेमपूजनानें मला सम्राटाच्या सिंहासनावर बसवलें आहेस. माझें सारें दैन्य, लाज, माझी सारी क्षुद्रता तूं आपल्या राजवस्त्रानें झांकून टाकली आहेस. दुधावरील फेसाप्रमाणें शुभ्र, कोमल व शीतल अशा हृदयशय्येवर तूं मला बसवलें आहेस.)

पुरुषाच्या कामना-कलुषित दृष्टीला स्त्रीचें देहसौंदर्यच दिसतें. तें सौंदर्य स्थूल, अंशरूप असतें. अंशरूप सौंदर्यांत सौंदर्यसत्तेच्या समग्रतेची अनुभूति लाभणेंच महत्त्वाचें असतें, हें रवींद्रनाथांनीं कवीच्या दृष्टीनें जाणलें होतें. अंशरूप अवस्थेंत प्राप्त होणाऱ्या समग्रतेच्या अनुभूतींत रहस्यमयता अपरिहार्य असते. कारण ज्या सखोल अंतर्दृष्टीशिवाय तशी अनुभूति लाभणें केवळ अशक्य असतें, तिचें कार्यच मुळीं जीवनरहस्य उद्घाटित करण्याचें आहे. अंशरूपांत समग्रतेच्या अनुभूतीची कल्पना अगदीं नवीन नाहीं. हेगेलचें तत्त्वज्ञान व भारतांतील अद्वैत तत्त्वज्ञान ह्या दोहोंतहि ही कल्पना आहे. ‘ एकं सद्विप्राः बहुधा वदन्ति ’ किंवा ‘ पूर्णमदः पूर्णमिदम् ’ हा अद्वैतवादाचा एक आधारभूत सिद्धान्तच आहे. अद्वैतवादी रवींद्रनाथ म्हणतात, “ प्रत्येक मानव स्नेहप्रेमादि भावनांनीं रहस्यमय ब्रह्माचीच नकळत पूजा करीत असतो. विश्वांतील त्या आदिशक्तीचा आविर्भाव म्हणजेच प्रेम. पिंडब्रह्मांडीं मूलभूत असणाऱ्या अनंत आनंदाची क्षणिक अनुभूतीच आपण आपल्या जीवनांत अनुभवीत असतों. ”

ह्या विचारसरणींतून रवींद्रनाथांच्या 'जीवनदेवता' कल्पनेचा उगम झाला आहे. ज्या शक्तीच्या योगानें व्यक्तिजीवनांतील सुख-दुःखदायक घटनांना तात्पर्यपूर्ण एकतानता प्राप्त होते, ज्या शक्तीच्या योगानें चराचर विश्वाशीं स्वतःच्या एकात्मतेची अनुभूति प्राप्त होते, त्या शिवसुंदरस्वरूपी सृजनशक्तीलाच रवींद्रनाथांनीं जीवनदेवता म्हटलें आहे. ही जीवनदेवताच रवींद्रनाथांची प्रियतम 'मानससुंदरी'. ही मानससुंदरी 'उर्वशी' कवितेंत विश्वव्यापी लीलामयीच्या रूपानें अवतरली आहे. ह्या अत्युत्कृष्ट कवितेंत अपूर्व प्रतिभाविलासाशीं सखोल सौंदर्यदृष्टीचा मनोहर समन्वय साधला आहे. अशा प्रकारची विश्वव्यापी सौंदर्याचा हृदयंगम आविष्कार करणारी कविता जगाच्या काव्यभांडारांत तरी आढळेल कीं नाहीं, शंकाच आहे. कवितेच्या सुरुवातीलाच रवींद्रनाथांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, ही उर्वशी माता, पत्नी, कन्या अशा पारिवारिक नात्यांनीं जखडलेली नाहीं. ही उर्वशी आपल्या स्वतंत्र सौंदर्यसत्तेनें प्रकट झाली आहे.

उषार उदयसम अनवगुंठिता
तुमि अकुंठिता ।

( कोणत्याहि आवरणाचें किंवा कुंठेचें बंधन न मानतां तूं उषेप्रमाणें प्रकट झाली आहेस. )

ह्या जीवनसागरांतून महिमामयी उर्वशी आत्मसिद्ध स्वरूपानें प्रकट होते, तेव्हां निबिड सौंदर्यानुभूतीनें मानवी चेतना उजळून निघते. उर्वशीच्या एका हातांत अमृतकलश आहे. त्या अमृताच्या प्रभावानें आपल्या मनांत प्रेमाचा, आनंदाचा संचार होतो. तिच्या दुसऱ्या हातांत विषकुंभ आहे. त्या विषा-मुळें वासनाव्याकुळता, विरहवेदना भोगावी लागते. अशा रीतीनें अमृताच्या व विषाच्या विरोधी क्रियांमुळें आपलें जीवन आंदोलित होतें. अशी ही शक्तिशाली उर्वशी आपल्या सौंदर्यसत्तेनें सारें विश्व व्यापून राहिली आहे. तिच्या छंदोबद्ध नृत्यामुळेंच कीं काय, सागराच्या विशाल जलपृष्ठावर तरंगांची लीला सुरू होते. वसुंधरेचा सस्य-श्यामल पदर वायूनें कंपित होतो. कंठ-हारांतून गळून पडलेल्या रत्नांनीं आकाश नक्षत्रखचित होतें. अशा विश्व-ब्रह्मांड व्यापून राहिलेल्या सौंदर्याच्या निबिड अनुभूतीनें मानवाचें मन

पुलकित होतें. विश्वव्यापी सौंदर्याच्या विविधतेंत मनोमन अनुभवाला येणाऱ्या मूळ सौंदर्यतत्त्वालाच रवींद्रनाथांनीं उर्वशी म्हटलें आहे.

विकसित विश्व-वासनार –
अरविंद माझखाने पादपद्म रेखेछो तोमार
अति लघुभार ।
अखिल मानस-स्वर्गे अनंत-रंगिणी
हे स्वप्न-संगिनी ।

( विश्ववासनेच्या विकसित कमळांत तूं आपल्या कोमल, हलक्या चरणांची स्थापना केली आहेत. हे स्वप्नसहचरी, अखिल मानसस्वर्गांत तूं अनंत लीला करीत असतेस. )

मानवाच्या ठायीं विकसित होणाऱ्या वासनेमुळें तो सौंदर्यानुभूतीला समर्थ होतो. ह्या वासनेच्या विकसित कमळावर उर्वशीनें आपल्या अति लघुभार कोमल चरणांची स्थापना केली आहे जणूं. अति लघुभार म्हणजे स्थूल नसलेला. अशरीरी. आपल्या अशरीरी सौंदर्यसत्तेनें उर्वशी साऱ्या विश्वाचें नियंत्रण करते. रवींद्रनाथांची आदर्श स्त्रीसुद्धां आपल्या शिवसुंदर सत्तेनें मानवी जीवनाचें नियंत्रण करते.

' विजयिनी ' कवितेंत रवींद्रनाथांनीं पवित्र सौंदर्याच्या महिम्याचें वर्णन केलें आहे. एक रूपयौवना सरोवराच्या पाण्यांत स्नान करीत असते. तिचें अपूर्व सौंदर्य पाहून मुग्ध झालेला मदन ती रमणी पाण्याबाहेर येतांच तिला शर-विद्ध करण्यासाठीं पुष्पधनुष्यबाण घेऊन झाडाआड लपून राहतो. स्नान आटोपतांच ती पाण्याबाहेर येते. पुष्पबाण सज्ज करून मदन हंसतमुखानें तिला सामोरा जातो, पण त्या सुंदरीच्या शांत पवित्र दृष्टीशीं त्याची क्षणभर दृष्टिभेट होतांच पराभवादाखलच कीं काय मदन आपलें पुष्पधनुष्य व बाण तिच्या चरणीं अर्पण करून पावित्र्याची पूजा करतो. रवींद्रनाथांची आदर्श स्त्री या कवितेंत पवित्र सौंदर्यानें नटली आहे.

अंशरूप सौंदर्यापलीकडील विश्वव्यापी सौंदर्यसत्तेचें अखंड व पवित्र स्वरूप ओळखणें म्हणजेच इंद्रियग्राह्य आणि आत्मिक सौंदर्याचा समन्वत्

साधणें होय. या समन्वयाशिवाय प्रेमाला व्यापकता व पावित्र्य लाभणार नाहीं. 'स्वर्ग हइते बिदाय' ( स्वर्गातून प्रयाण ) या कवितेंत मांगल्यावर भर देऊन रवींद्रनाथांनीं शिव आणि सुंदर अशा व्यापक स्वरूपाच्या आदर्श स्त्रीची प्रतिमा घडवली आहे.

एकदा सुक्षणे
आशिबे आमार घरे सन्नत नयने
चंदनचर्चित भाले, रक्त पट्टांबरे
उत्सबेर बाँसरी संगीते, तार परे
सुदिने दुर्दिने, कल्याण-करुण करे,
सीमंत सीमाय मंगल सिंदुर-बिंदु,
गृहलक्ष्मी दुःखेसुखे, पूर्णिमाय इंदु
संसारेर समुद्रशियरे ।

( एके दिवशीं सुमुहूर्तावर विवाहोत्सवाचें बांसरी-संगीत वाजत असतांना ती लाल वस्त्र परिधान करुन, भाल प्रदेशीं चंदनबिंदु रेखून नत दृष्टीनें माझ्या घरांत प्रवेश करील. त्यानंतर बऱ्यावाईट काळांत मंगल कुंकुमबिंदु धारण करणाऱ्या गृहलक्ष्मीच्या कल्याणमय करस्पर्शानें ती सुखःदुखांनीं आंदोलित होणाऱ्या संसाराच्या समुद्रशिखरीं पूर्णिमेच्या चंद्राप्रमाणें शीतल शांति निर्माण करील. )

रवींद्रनाथांची आदर्श स्त्री केवळ गृहलक्ष्मी नाहीं. चूल व मूल एवढ्या-पुरतेंच तिचें क्षेत्र मर्यादित नाहीं. स्त्री ही मूलतः शक्तिरूपी असल्यामुळें ती पुरुषाला म्हणते,

जदि पार्श्वे राखो
मोरे संकटेर पथे, दुरूह चिंतार
जदि अंश दाओ, जदि अनुमति करो
कठिण व्रतेर तव सहाय हइते,
जदि सुखदुःखेर मोरे करो सहचरी,
आमार पाइबे तबे परिचय ।

( संकटाच्या मार्गानें जातांना, जीवनाचे अवघड प्रश्न सोडवतांना, कठीण व्रताचें आचरण करतांना तूं माझें सहकार्य घेतलेंस, सुखदुःखांत माझें साहचर्य स्वीकारलेंस, तरच माझा खरा परिचय तुला कळेल. )

रवींद्रनाथांची आदर्श स्त्री खऱ्या अर्थानें सहधर्मिणी, सहचारिणी आहे. अशा प्रकारची फुलाहून कोमल व वज्राहून कठिण अशी आदर्श स्त्री शाश्वत स्वरूपाची असते. चिरंतन स्त्री आणि चिरंतन पुरुष युगानुयुगें अनंत व पवित्र प्रेमानें परस्परांचें पूजन करून मानवजीवनाची धारा अखंड प्रवाहित करतात.

आपल्याला वंदनीय असलेल्या सीता, सावित्री, द्रौपदी यांसारख्या स्त्री-रत्नांचा आदर्श रवींद्रनाथांनीं नवनवोन्मेषशाली प्रतिभेनें जगापुढें अभिनव पद्धतीनें मांडला. पाश्चात्य वाङ्मयांत अशा प्रकारच्या पवित्र व शक्तिशाली स्त्रीचा आदर्श विरळाच. पाश्चात्यांची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टि भोगप्रधान असल्यामुळें 'शाकुंतला'च्या वाचनानें जर्मन महाकवि गटे आनंदानें वेडा झाला यांत नवल नाहीं. शोपेनहॉएर, नीत्से यांसारख्या श्रेष्ठ तत्त्वज्ञांची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टि किती विकृत होती, हें तत्त्वज्ञानाचे अभ्यासक जाणतातच. पूर्वेचा व पश्चिमेचा संगम साधणाऱ्या रवींद्रनाथांची आदर्श स्त्री पूर्णपणें भारतीय आहे, असेंच आढळून येतें.

* * *

## शिशुकाव्य : ७

म. गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याप्रमाणेंच कविश्रेष्ठ रवींद्रनाथ ठाकुर हेहि बालकांच्या सहवासाचे भोक्ते होते. खऱ्या मोठेपणांत अहंमन्यते-चा स्वाभाविकपणेंच अभाव असतो. त्यामुळें असे युगपुरुष लहान मुलांशीं समरस होऊं शकतात. जगांत पदोपदीं स्वार्थाचा, कुटिलतेचा, कटु अनुभव येत असतांना निष्पाप बालकांच्या खेळकर सहवासांतच खऱ्या आनंदाचा लाभ होऊं शकतो.

रवींद्रनाथांनीं ‘ शिशु ’ व ‘ शिशु भोलानाथ ’ असे शिशुकाव्याचे दोन ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं ‘ शिशु ’ हा काव्यग्रंथ त्यांनीं १९०२-३ सालीं लिहिला. १९०२ सालीं पत्नी वारल्यानंतर मीरा व शमींद्र ह्या दोन मुलांचें संगोपन रवींद्रनाथांनीं पित्याचा स्नेह नि मातेचें वात्सल्य अशा दुहेरी भूमिकेनें आपल्या हातीं घेतलें. शोकाच्छन्न एकाकी जीवनांत रवींद्रनाथांचें त्या लहान मुलांच्या सहवासानें सांत्वन होत असे. मुलांच्या मनोरंजनासाठीं लिहिलेल्या कवितांचा ‘ शिशु ’ काव्यांत अंतर्भाव केला आहे. रवींद्रनाथांनीं ह्या कविता मनोरंजनासाठीं लिहिल्या असल्या तरी त्यांत त्यांच्या व्यापक कविदृष्टीचा आढळ झाल्यावांचून रहात नाहीं. रवींद्रनाथ हे तात्त्विक वृत्तीचे सौंदर्यवादी कवि असल्यामुळें त्या शिशुकाव्यांत वात्सल्यासाठीं जीवनजिज्ञासेच्या रहस्यमयतेचा मधुर मिलाफ झाला आहे.

‘ जन्मकथा ’ कवितेंत ते म्हणतात :

खोका माके शुधाय डेके
एलेम आमि कोथा थेके
कोनखेने तुई कुडिये पेलि आमारे ।
मा शुने कय हेसे कंदे
खोकारे तार बुके बेंधे
‘ इच्छा हये छिली मनेर माझारे ’

( लहान मुलगा आईला विचारतो : ‘ आई, मी कुठून ग आलों ? मी तुला कुठें सांपडलों ? ’ वात्सल्यभरानें मुलाला हृदयाशीं कवटाळून आई हसत रडत म्हणते : ‘ बाळ, इच्छारूपानें तूं माझ्या मनांत वास करीत होतास.’ ती पुढें म्हणते, ‘ माझ्या बालपणाच्या भातुकलीच्या खेळांत, देवतापूजनांत तुझा वास होता. फुललेल्या फुलांत सुगंध वास करतो तद्वत् तूं माझ्या तारुण्यविकसित देहांत लावण्याच्या रूपानें वास करीत होतास.’ )

स्त्रीच्या देहमनाचा विकास मातृत्वासाठीं होत असतो. विधात्याची सर्वश्रेष्ठ कलाकृति जगाला सादर करण्यांतच तिच्या जीवनाचें साफल्य आहे.

निर्निमेषे तोमाय हेरे
तोर रहस्य बुझिने रे
सबार छिलि आमार हलि केमने।

( तासन् तास मी तुझ्याकडे टक लावून पाहतें. तरी पण तुझें खरें रहस्य मला कळत नाहीं. विश्वांत तूं आनंदरूपानें सर्वत्र वास करीत असतांना आतां माझा एकटीचा कसा झालास ? )

रवींद्रनाथांवर बालपणापासूनच उपनिषदांच्या अद्वैत तत्त्वाचा प्रभाव पडला होता. त्यांना सच्चिदानंद ब्रह्माचें चैतन्य व माधुर्य निरागस शिशु-जीवनांत प्रत्यहीं आढळत असे. ' केन मधुर ' कवितेंत आई म्हणते :

रंगीन खेलेना दिले ओ रांगा हाते
तखन बुझिरे बाछा, केन जे प्राते
एत रंग खेले मेघे, जले रंग ओठे जेगे
केन एत रंग लेगे फुलेर पाते
रांगा खेला देखि जबे ओ रांगा हाते।

( बाळ, तुझ्या नाजूक गुलाबी हातांत रंगीत खेळणें पाहिलें कीं, प्रातःकालीन मेघांवर मनोहर रंगविलास कां चालतो, नदीच्या पाण्यांत त्रिविध रंगविलास कां प्रतिबिंबित होतात, टवटवीत फुलांच्या पाकळ्या नाजुक रंगांनीं कां बहरतात, हें मला सहज कळून येतें. )

ज्या आदिचैतन्यामुळें ही सारी सृष्टि रूपरसगंधांच्या विविध वैचित्र्यानें नटली आहे, त्याच चैतन्याचा मनोरम विलास रवींद्रनाथांना बालकांमध्यें दिसत असे. त्यांच्या कवितांचे शिशुनायक चराचर विश्वाशीं सहज एकरूप झाले आहेत. ' लुकोचरी ' कवितेंत ते म्हणतात :

आमि जदि दुष्टुमि करे
चाँपार गाछे चाँपा हये फुटि
भोरेर बेला मागो, डालेर परे
कचि पाताय करि लुटोपुटी—

तबे तुमि आमार काछे हारो,
तखन कि मा, चिनते आमाय पारो
तुमि डाको " खोका, कोथाय ओरे "
आमि शुधु हासि चुपटि करे ॥

( आई ग, जर मी गमतीनें चांपयाचें फूल झालों, मी सकाळींच फांदी-वरच्या कोवळ्या पानांत लपूं छपूं लागलों, तर तूं सहज हरशील. मला शोधून काढूं शकणार नाहींस. ओळखूंहि शकणार नाहींस, होय कीं नाहीं ? " बाळ, तूं कुठें आहेस ? " म्हणून मला हांका मारशील तेव्हां मी गुपचूप हंसेन, 'ओ' देणारच नाहीं. )

'विदाय' कवितेंतील बालकसुद्धां चिरचंचल वायूशीं एकरूप होऊन आईला बिलगत आहे. पाण्याच्या तरंगांशीं समरस होऊन स्नानाच्या वेळीं आईशीं खेळत आहे. रात्रीं जागणाऱ्या आईला 'झोप' म्हणून ताऱ्यांच्या रूपानें सांगत आहे. आई झोपल्यावर तेंच बालक जोत्स्नारूपानें जवळ येऊन तिच्या निमीलित नेत्रांचें चुंबन घेतें. स्वप्नरूपानें आईच्या झोपेंत प्रवेश करतें. त्यामुळें ती अभावितपणें आपला मुलगा जवळ आहे कीं नाहीं चांचपून पाहते, पण व्यर्थ ! तिचा चिरचंचल मुलगा अखिल विश्वाशीं एकरूप होऊन मुक्त विहार करणारा आहे. सकाळच्या प्रहरींहि गुराखी मुलाच्या वेणू-संगीताच्या रुपानें अनंत आकाशांत यथेच्छ संचार करून तो कामांत दंग झालेल्या आपल्या आईबरोबरहि इकडे तिकडे हिंडत आहे. नंतर—

पुजोर कापड हाते करे मासि जदि शुधाय तोरे
'खोका तोमार कोथाय गेलो चले ?'
बलिस, 'खोका से कि हाराय, आछे आमार
चोखेर ताराय
मिलिये आछे आमार बुके कोले।'

तो मुलगा आईला म्हणतो : पूजेच्या वेळीं 'तुझा मुलगा कुठें आहे ?' असें मावशीनें विचारलें तर तूं सांग : 'माझा मुलगा कुठेंहि गेला तरी

हरवणार नाहीं; कारण तो माझ्या नेत्रज्योतींत, माझ्या हृदयांत, अंग-प्रत्यंगांत सामावला आहे.

विश्वविहार करणाऱ्या चिरचंचल बालकाचें रवींद्रनाथांना जसें कौतुक वाटे, तसेंच त्याच्या निर्लोभी निरासक्तपणानेंहि ते मुग्ध होत असत.

अमेरिकेच्या जडवादी वातावरणांत गुदमरून गेलेल्या रवींद्रनाथांनीं परत आल्यावर 'शिशु भोलानाथ' च्या कविता रचल्याचें नमूद करून ठेवलें आहे. जडवादी समाजाच्या यांत्रिक जीवनाला कंटाळलेल्या मनाला त्यांनीं बालसुलभ स्वातंत्र्य उपभोगण्यासाठीं मुक्त केलें. ते गाऊं लागले :

शिशु हबार भरसा आबार
जागुक आमार प्राणे
लागुक हावा निर्भावनार पाले ।

( सारी कृत्रिमता विसरून माझ्या मनाला बालजीवनाची सरलता, सरसता प्राप्त व्हावी, अशी माझी उत्कट इच्छा आहे. बालसुलभ निष्काळजीपणानें माझी जीवननौका संसारसागरावर विहरत राहावी. )

रवींद्रनाथ म्हणतात : विश्व हें स्वाभाविकतः गतिमान् असल्यानें जडवादी समाजाची वस्तुसंचयाची प्रवृत्ति जगरहाटीच्या नियमाला विरोध करणारी आहे ह्या झगड्यांत सृष्टिनियमांचा विजय अपरिहार्य आहे. कारण नित्य-नवीनाची उत्पत्ति हेंच सृष्टीचें कार्य आहे. सृजनाभिमुख सृष्टीची निःस्वार्थी, निरासक्त वृत्ति रवींद्रनाथांना लहान मुलांत प्रकर्षानें आढळत असे. त्यांच्या दृष्टीनें लहान मुलें हीं महाकालाचींच प्रतीकें होत. रवींद्रनाथांचा शिशु भोलानाथ, हा निरासक्त वृत्तीच्या शंकराचा बालावतार आहे.

आपन विभव
आपनि भरिस नष्ट हेला भरे,
प्रलयेर घूर्णिचक्र परे
चूर्ण खेलनार धूलि उडे दिके दिके
आपन सृष्टिके
ध्वंस हते ध्वंस माझे मुक्ति दिस अनर्गल

खेलारे करिस रक्षा छिन्न करि खेलना-शृंखल
अकिंचन, तोर काछे किछुरइतो कोनो मूल्य नाइ
रचिस जातोर इच्छा ताई
जाहा खुशि नाइ दिये,
तारपर भुले जास जाहा इच्छा ताई निये।

( अरे बालका, कांहीं वेळापूर्वी तूं जमवलेला वस्तुसंग्रह नंतर तूं स्वतःच अवहेलनेनें नष्ट करतोस. तुझ्या प्रलय-लीलेच्या वेळीं साऱ्या खेळण्यांचा चक्काचूर होऊन तीं इतस्ततः विखुरलीं जातात. जणुं काय आपल्या वस्तु-संचयाला तूं ध्वंसाच्या योगानें अबाध मुक्तीच देत असतोस. जड खेळण्यांचें बंधन नष्ट करून तूं आपली क्रीडाप्रवृत्ति अबाधित चालू ठेवतोस. संग्रहहीन मुला, तुला कशाचीच कांहीं किंमत वाटत नाहीं. वाटतील त्या वस्तु गोळा करून तूं हवी तशी मांडणी करतोस. आणि मग तें सारें विसरून जाऊन तूं निराळींच खेळणीं घेऊन बसतोस. )

सृष्टिलीला चालवणाऱ्या महाकालाची अशी जी चिरचंचल, निर्लोभी वृत्ति रवींद्रनाथांना लहान मुलांत प्रकर्षानें आढळून येई, त्या आनंदात्मक वृत्तीशीं समरस होण्यासाठीं, तिचें रहस्य ओळखण्यासाठीं ते व्याकुळ होत असत नि गात असत :

ओरे शिशु भोलानाथ, मोरे भक्त बले
नेरे तोर तांडवेर दले
देरे चित्ते मोर
सकल भोलार एइ घोर
खेलेना भांगार खेला दे आमारे बलि
आपन सृष्टिर बंध आपनि छिंडिया जदि चलि
तबे तोर मत्त नर्तनेर चाले
आमार सकल गान छंदे छंदे मिशे जाबे ताले

( अरे भोलानाथा, तांडवनृत्य करणाऱ्या तुझ्या बालदलांत भक्त म्हणून मलाहि घे. तुझ्या सहवासानें माझ्या मनांत भोळी, निःस्वार्थ वृत्ति बाणूं दे.

आपण जमा केलेली खेळणीं आपणच कशीं नष्ट करावीं हें तूं मलाहि शिकव, कारण स्वतःच्या निर्मितीचें बंधन स्वतः तोडून मी जीवनाची अग्रगति चालू ठेवली, तर माझ्या जीवन-संगीताची स्वररचना अशा मुक्त नर्तनाच्या योगानें तालबद्ध होऊं शकेल. )

जीवन ही एक महान् कला आहे, असें तत्त्वज्ञ रवींद्रनाथांना इथें सुचवायचें आहे. संगीतकला ज्याप्रमाणें स्वर व ताल ह्यांनीं सुसंबद्ध असते, त्याप्रमाणें व्यक्तीचें जीवनहि सरस व प्रगतिशील असावें लागतें. मगच तें सफल होतें, सार्थकी लागतें.

बालमनाचें मनोरंजन करणाऱ्या साध्या, सोप्या शब्दरचनेंत अशा व्यापक जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा कलात्मक मिलाफ साधणें रवींद्रनाथांसारख्या महाकवीलाच शक्य होत असतें. अशा प्रकारच्या शिशुकाव्याला जागतिक वाङ्मयांत क्वचितच तोड मिळेल.

* * *

# देशभक्ति : ८

विश्वकवि रवींद्रनाथांची भावधारा जीवनाच्या समग्रतेंतून प्रवाहित होणें स्वाभाविक होतें. अंशबद्ध संकुचित जीवनाला त्यांच्या विपुल काव्यांत कोठेंच स्थान मिळालेलें नाहीं. गेल्या शतकाच्या पूर्वार्धांत राजा राममोहन राय, महर्षि देवेंद्रनाथ ठाकुर यांसारख्या थोर विचारवंतांनीं धर्माच्या व संस्कृतीच्या क्षेत्रांत जो विशाल दृष्टिकोन स्वीकारला होता, त्याचीच संपूर्ण परिणति रवींद्रनाथांमध्यें आढळते. सस्यश्यामला मातृभूमीबद्दलचें अकृत्रिम प्रेम व उदार भारतीय संस्कृतीचा त्यांना वाटणारा पुरेपूर अभिमान यांतून त्यांची उत्कट निसर्गप्रीति आणि व्यापक मानवप्रेमच व्यक्त झालें आहे. इंग्रजांच्या जुलमी राजवटीबद्दल त्यांना अतिशय तिटकारा वाटत असला तरी त्या भरांत आपल्या देशबांधवांच्या दोषांवर पांघरूण घालण्याचा त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. कल्याणकामी रवींद्रनाथांनीं पुकारलेला लढा

मुख्यतः अन्यायांविरुद्ध होता. अन्यायी इंग्रज राजवटीवर त्यांनीं जशी कडक टीका केली, तशीच आपल्या देशबांधवांचीहि संकुचितपणाबद्दल, दुबळेपणाबद्दल वारंवार कानउघाडणी केली. यामुळें रवींद्रनाथांची देशभक्ति कडवेपणा किंवा संकुचितपणा यांनीं दूषित न होतां उदात्त मानवतेशीं तिचा व्यापक समन्वय साधला आहे. कवींद्र रवींद्रनाथ मांगल्याचे खरेखुरे पुजारी ! अखेरपर्यंत त्यांनीं उदार, तेजस्वी जीवनाचाच पुरस्कार केला.

अन्याय, संकुचितपणा व दुबळेपणा यांचा निषेध करणाऱ्या आणि उदार तेजस्वी भारताचा गौरव करणाऱ्या कविता रवींद्रनाथांच्या काव्यांत जागोजागीं आढळतात. त्यांचा ‘ नैवेद्य ’ काव्यग्रंथ या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा आहे.

अन्यायी हिंसेच्या उन्मत्ततेचें वर्णन करतांना कवींद्र लिहितात :

हिंसार उत्सबे आजि बाजे
अस्त्रे अस्त्रे मरणेर उन्माद-रागिणी
भयंकरी। दयाहीन सभ्यता-नागिनी
तुलेछे कुटिल फणा चक्षेर निमिषे
गुप्त विषदंत तार भरि तीव्र विषे।

( आज हिंसेच्या उत्सवांत मृत्यूची भयानक उन्मत्त रागिणी अस्त्राअस्त्रांतून झंकारत आहे. निष्ठुर संस्कृतिरूपी नागिणीनें गुप्त विषारी दांतांत जहाल विष भरून दंश करण्यासाठीं क्षणार्धांत आपली फणा उभारली आहे. )

भारतीयांची दीनता, हीनता पाहून कवींद्रांचें हृदय किती व्यथित होत असे, याचें प्रभावी चित्रण ‘ त्राण ’ कवितेंत आढळतें. भारत-भाग्य-विधात्याला उद्देशून ते आवाहन करतात :

ए दुर्भाग देश हते हे मंगलमय।
दूर कोरे दाओ तुमि सर्व तुच्छ भय–
लोकभय, राजभय, मृत्युभय आर।
दीनप्राण दुर्बलेर ए पाषाणभार।

ए चिरपेषण जंत्रणा, धूलितले
एई नित्य अवनति, दंडे पले पले
एई आत्म-अवमान, अंतरे बाहिरे
एई दासत्वेर रज्जु...
ए बृहत् लज्जा-राशि चरण आघाते
चूर्ण करि दूर करो। मंगल प्रभाते
मस्तक तुलिते दाओ अनंत आकाशे
उदार आलोक माझे, उन्मुक्त बातासे॥

( हे मंगलमय, या दुर्भागी देशातून सारें तुच्छ भय दूर कर; लोकभय, राजभय आणि मृत्युभयहि दूर कर. दीनदुबळ्यांवरील हा अवजड पाषाणभार ही चिरदलनाची वेदना, धुळीला मिळवणारी नित्य अवनति, क्षणोक्षणीं घडणारा स्वत्वाचा अपमान, अंतर्बाह्य जखडणारा हा गुलामगिरीचा पाश... लज्जेच्या ह्या विशाल राशी चरणाच्या आघातानें चूर्णविचूर्ण करून उधळून दे. मंगल प्रभातकाळीं या देशाचें मस्तक अनंत आकाशांत उदार प्रकाशांत व मुक्त वायुलहरींत उन्नत होऊं दे. )

भारतीय संस्कृतीच्या उदार आदर्शाचें विवरण करतांना रवींद्रनाथ लिहितात :

हे भारत नृपतिरे शिखायेछो तुमि
त्यजिते मुकुटदंड सिंहासन भूमि,
धरिते दरिद्रवेश, शिखायेछो वीरे
धर्मयुद्धे पदे पदे क्षमिते अरिरे...
गृहीरे शिखाले गृह करिते विस्तार
प्रतिवेशी आत्मबंधु अतिथि अनाथे।

( हे भारता, राजांना तूं मुकुट, राजदंड, सिंहासन व भूमि यांचा त्याग करण्यास शिकवलें आहेस. धर्मयुद्धांत शत्रूला पदोपदीं क्षमा करण्याचें शिक्षण वीरांना दिलें आहेस....शेजारी, आप्तेष्ट, बंधुबांधव, अतिथि व अनाथ यांच्यांत आपल्या घराचा विस्तार करण्यास तूं गृहस्थाला शिकवलेंस. )

परकी लोकांच्या आणि देशबांधवांच्या अन्यायांविरुद्ध, असत्य आचरणाविरुद्ध रवींद्रनाथांनीं पुकारलेला लढा सत्यावर पुरेपूर आधारलेला होता. ते आपणांला स्पष्टपणें बजावतात :

जदि दुःखे दहिते हय
तबु मिथ्या चिंता नय।
जदि दैन्य बहिते हय
तबु मिथ्या कर्म नय।
जदि दंड शहिते हय
तबु मिथ्या वाक्य नय।
जय जय सत्येर जय।

(दुःखानें पिचावें लागलें तरी असत्याचा विचारहि मनांत आणूं नये. दैन्याचा भार वहावा लागला तरी मिथ्याचरण करूं नये. सजा भोगावी लागली तरी असत्य भाषण करूं नयें. सत्याचा त्रिवार जयजयकार असो.)

म्हणूनच शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसाधनेचा गौरव करतांना 'शिवाजीउत्सव' कवितेंत ते म्हणतात :

हे राजतपस्वी वीर,
तोमार शे उदार भावना
विधिर भांडारे
संचित हइया गेछे,
काल कभु तार अेक कणा
पारे हरिबारे?
तोमार शे प्राणोत्सर्ग
स्वदेशलक्ष्मीर पूजाघरे
शे सत्यसाधन
के जानितो हये गेछे,
चिरयुगयुगांतर तरे
भारतेर धन।

( हे राजतपस्वी वीरा, तुझी ती स्वातंत्र्याची उदार भावना विधात्याच्या भांडारांत संचित झाली आहे. तिचा एक कण तरी कालाला कधीं हरण करतां येईल का ? तुझा तो आत्मत्याग, स्वदेशलक्ष्मीच्या पूजागृहांतील तुझी ती सत्यसाधना कोणालाहि नकळत भारताची चिरकालीन अमूल्य संपद् बनली आहे. )

कवींद्र रवींद्रनाथांच्या उदार देशभक्तीचें व व्यापक मानवप्रेमाचें उदात्त दर्शन आपणांला गीतांजलींतील ' भारततीर्थ ' कवितेंत प्रकर्षानें घडतें. या अद्वितीय कवितेंत भारतीय संस्कृतीच्या उदार परंपरेकडे त्यांनीं साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेतलें आहे. फक्त भारतीयांचें नव्हे, सर्वांचेंच हित साधावें म्हणून भारताची ती समन्वयधर्मी परंपरा पुढें चालवण्यासाठीं ते सर्वांना आवाहन करतात :

एशो हे आर्य, एशो अनार्य,
हिंदु मुसलमान ।
एशो एशो आज तुमि इंग्रज
एशो एशो खृष्टान ।
एशो ब्राह्मण, शुचि करि मन
धरो हात शबाकार ।
एशो हे पतित, करो अपनीत
शव अपमान-भार ।
मार अभिषेके एशो एशो त्वरा,
मंगल घट हयनि जे भरा
शबार परशे पवित्र करा तीर्थनीरे
आजि भारतेर महामानवेर सागरतीरे

( हे आर्यांनो, अनार्यांनो, हिंदु-मुसलमानांनो, येथें एकत्र जमा. इंग्रजांनो, साऱ्या ख्रिश्चन लोकांनो, आतां तुम्हीहि येथें आमच्याबरोबर एकत्र या. ब्राह्मणांनो, आतां शुद्ध मनानें सर्वांचे हात आपल्या हातीं घ्या. पतितांनो, आज तुम्ही आमच्या बरोबरीनें येथें एकत्र जमा. आजपर्यंत तुम्हीं सहन

केलेले सारे अपमान आतां दूर करा. मातेला अभिषेक करण्यासाठीं सर्वांनीं येथें त्वरेनें जमावें. कारण भारताच्या ह्या महामानवरूपी सागराच्या तीरावर सर्वांच्या स्पर्शानें पवित्र झालेल्या तीर्थजलानें अभिषेकाचा मंगल कलश अजून पूर्ण भरलेला नाहीं. )

* * *

## ' गीतांजली 'चें मूलसूत्र : ९

जागतिक वाङ्मयांत गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर यांच्या ' गीतांजली 'चें स्थान किती उच्च आहे, हें नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. ' गीतांजली 'ला १९१३ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत नोबेल पारितोषिक मिळून भारतीय वाङ्मयाला जागतिक दर्जा प्राप्त झाला. विकृत दृष्टीचे साम्यवादी म्हणतात कीं, श्रेष्ठ काव्य म्हणून नव्हे, तेर धार्मिक अफूची गोळी पुरवल्याबद्दल ' गीतांजली 'ला पुंजीवादी राष्ट्रांनीं नोबेल पारितोषिक देऊन तिचा उदो उदो केला. या आक्षेपाला आज रशियानें योग्य उत्तर देत आहे. त्या देशांत रवींद्रकाव्यग्रंथांच्या लक्षावधि प्रती खपत आहेत, लोकप्रिय होत आहेत. श्रेष्ठ मानवी मूल्यांबद्दल आदर बाळगणाऱ्या व्यक्तीला ' गीतांजली 'तील गीतागीतांत पवित्र भावनांचा व पैलूदार विचाररत्नांचा कलात्मक आविष्कार आढळल्यावांचून राहणार नाहीं. या लेखांत ' गीतांजली 'तील मूळ अंतःप्रवाहाचें थोडेंसें विवेचन यथाशक्ति करण्याचें योजिलें आहे.

बालपणापासूनच रवींद्रनाथांची विचारसरणी उपनिषदांच्या तत्त्वज्ञानानें प्रभावित झाली होती. त्यामुळें शिवसुंदरस्वरूपी सत्याची आनंदाच्या योगानें प्राप्त होणारी सरस अनुभूति त्यांनीं नवनवोन्मेषशाली प्रतिभेनें आपल्या काव्यांत जागोजाग आविष्कृत केली आहे. विश्वव्यापी सौंदर्याच्या मुळाशीं जें आदिसत्य आहे, त्याच्याशीं एकात्मतेची अनुभूति होणें कठिण आहे. तशी अनुभूति प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत व्यक्तिजीवनांतील दुःख, अपूर्णता दूर होणार नाहीं. एकात्मतेच्या मार्गांत सर्वांत मोठी अडचण आहे ती अहंकाराची. अहंकारानें दृष्टि कलुषित व संकुचित होत असल्यामुळें जीवनाचें

मर्म आपल्याला कळत नाहीं. सर्व दुःखांचें कारण सुखसाधनांच्या अपूर्णतेपेक्षां जीवनाच्या तात्पर्यविषयक अज्ञानांतच आहे, असें जें रवींद्रनाथांनीं म्हटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे. म्हणूनच अहंकारापासून मुक्ति म्हणजे आनंद. ‘ रिलिजन् ऑफ मॅन् ’ या ग्रंथांत रवींद्रनाथ म्हणतात :

“ As in the world of Art, so in the spiritual world, our soul waits for its freedom from the ego to reach that disinterested joy which is the source and goal of creation.”

अहंकार लोपल्यानंतर प्राप्त होणाऱ्या विशुद्ध आनंदाच्या योगानेंच चराचर विश्वाशीं आपलें परिपूर्ण प्रेमाचें नातें जोडलें जातें. अहंकाराची शृंखला तोडून चराचर विश्वाशीं एकरूप होण्यासाठीं, समरस होण्यासाठीं कविमनाची जी धडपड चालली आहे, तिचाच कलात्मक आविष्कार ‘ गीतांजली ’त आढळतो.

आमार माथा नत करे दाओ हे तोमार
चरण धूलार तले ।
सकल अहंकार हे आमार
डुबाओ चोखेर जले ।

( हे प्रभो, आघात-वेदनांनीं तूं माझा अहंकार नष्ट करून आपल्या उदार चरणांशीं माझें मस्तक नम्र कर. दुःख-वेदनांमुळें वाहणाऱ्या अश्रुजलांत माझा अहंकार विरून जाईल असें कर. )

अॅका आमि अहंकारेर
उच्च अचले—
पाषाण-आसन धुलाय लुटाओ,
भांगो सबले ।
नामाओ नामाओ आमाय तोमार
चरणतले ।

( हे परमेश्वरा, अहंकाराच्या उच्च शिखरावर मी एकाकी उभा आहें. अहंकाराचें हें पाषाणासारखें कठिण आसन तूं छिन्न भिन्न कर, धूलिसात् कर आणि मला तुझ्या उदार चरणांशीं नम्र कर. )

चराचर विश्वाला मनोमनीं सादर ग्रहण करून गंभीर प्रेमाचा संबंध जोडण्याची कवीला तळमळ लागली लागली आहे.

एइ मोर साध जॅनो ए जीवन माझे
नव आनंद महासंगीते बाजे।
तोमार आकाश, उदार आलोक धारा
द्वार छोटो देखे फेरेना जॅनो गो तारा,
छय ऋतु जॅनो सहज नृत्ये आशे
अंतरे मोर नित्य नूतन साजे।

( प्रभो, माझी अशी आंतरिक इच्छा आहे कीं, विश्ववीणेच्या अखंड झंकारानें जें वैचित्र्यपूर्ण संगीत प्रसृत होतें, त्याच्या योगानें व्यक्त होणारें तुझें आनंददायी स्वरूप मला ह्या जीवनांत अनुभवायला मिळावें. तुझें मुक्त विशाल आकाश आणि उदार प्रकाश ह्यांच्या प्रभावानें माझ्या जीवनांतील संकुचितपणा व अज्ञानांधकार दूर व्हावा; आणि नित्यनवीन सौंदर्यानें भूषित होणाऱ्या षड्ऋतूंनीं माझ्या मनोमंचावर सहजस्फूर्त नृत्यांत रममाण व्हावें. )

एमनि करे चलते पथे
भबेर कुले
दुइ धारे जा फूल फुटे शब
निसर तुले।
शेगुलि तोर चेतनाते
गेंथे तुलिस दिवस राते
प्रतिदिनटि जतन करे
भाग्य मानि
नेरे ओ मन, नेरे आपन
प्राणे टानि।

( सृष्टींतील रूपरसगंधांच्या त्रिवेणी प्रवाहानें आपलें जीवन संपन्न होत असतें; म्हणून हे मना, आपल्या चेतनेच्या दिव्यतेनें या त्रिविध सौंदर्याचा आत्मीयतेनें स्वीकार करून तूं आपलें जीवन परिपूर्ण करून घे. )

‘ गीतांजली ’त नैसर्गिक सौंदर्याला मनोमनीं ग्रहण करण्याची कवीची तळमळ व्यक्त झाली आहे. त्याप्रमाणें समस्त मानवसमाजाचा आत्यंतिक प्रेमानें स्वीकार करण्याबद्दलची व्याकुळता तर जागोजाग प्रकट झाली आहे. रवींद्रनाथांची मानवप्रेमविषयक व्यापक अनुभूति अनुभवून वाचकाचें मनहि स्नेहसिक्त होतें.

आमार ॲकला घरेर आडाल भेंगे
विशाल भवे
प्राणेर रथे बाहिर हते
पारबो कबे ?
प्रबल प्रेमे शबार माझे
फिरबो धेये शकल काजे
हाटेर पथे तोमार शाथे
मिलन हबे,
प्राणेर रथे बाहिर हते
पारबो कबे ?

( माझ्या सीमाबद्ध व्यक्तित्वाची संकीर्णता दूर करून ह्या विशाल मानवसमाजांत मी प्राणप्राचुर्याच्या योगानें केव्हां बरें मुक्त संचार करूं शकेन ? अमर्याद आंतरिक प्रेमानें सर्वांमध्यें मिसळून जेव्हां मी माझें कर्मजीवन निःसंकोच मनानें जगूं शकेन, तेव्हांच हे प्रभो, तुझ्याशीं माझें खरें मीलन होईल. )

म्हणूनच देवालयाचें दार बंद करून आंतील अंधारांत बसून देवतापूजन करणाऱ्या भक्ताला कवि म्हणतात :

नयन मेले दॅख देखि तुइ चेये—
देवता नाइ घरे।

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 39४७६ दि. 3/10
क्रमांक ९४३२ नों: दि: 23/

तिनि गेछेन जेथाय माटि भेंगे
करछे चाषा चाष—
पाथर भेंगे काटछे जेथाय पथ;
खाटछे बारो मास
रौद्रे जले आछेन शबार साथे,
धुला ताँहार लेगेछे दुइ हाते,
ताँरइ मतन शुचि बशन छाडि
आय् रे धुलार परे

अरे, तूं जरा ज्ञानचक्षु उघडून पाहा, मग तुला आढळेल कीं, देवता ह्या बंदिस्त देवालयांत नाहींत. उन्हापावसाची पर्वा न करतां आपलीं कामें करणाऱ्या शेतकऱ्यांत, श्रमजीवी मानवांतच खऱ्या देवतेचा वास आहे. त्या देवतेचें तुला दर्शन घ्यायचें असेल, तर अलिप्तपणा निर्माण करणारें सोवळें सोडून तुला धूळमातीच्या कर्मक्षेत्रांतच उतरलें पाहिजे. )

अंधाऱ्या एकांतांत बसून केलेल्या कर्मठ पूजनानें खरी मुक्ति प्राप्त होणार नाहीं.

मुक्ति ? ओरे, मुक्ति कोथाय पाबि,
मुक्ति कोथाय आछे।
आपनि प्रभु सृष्टिबांधन परे
बांधा शबार काछे।

( मुक्ति ? अरे, कर्मठ अहंकाराच्या आत्मबंधनांत तुला मुक्ति मिळणार कुठें ? मुक्ति आहे कुठें ? स्वतः परमेश्वरच सृष्टीचें बंधन स्वीकारून चराचर अस्तित्वांत सामावला आहे. )

मानवतेशीं—पर्यायानें परमात्म्याशीं ( जीवात्म्याचा ) विच्छेद घडवून आणणाऱ्या अहंकाराचें ओझें कवीला किती असह्य झालें आहे !

आर आमाय आमि निजेर शिरे
बइबो ना।

आर निजेर द्वारे कांगाल हये
रइबो ना ।
एइ बोझा तोमार पाये फेले
बेरिये पडबो अबहेले
कोनो खबर राखबो ना ओर,
कोनो कथाई कइबो ना ।
आमाय आमि निजेर शिरे
वइबो ना ।

( माझ्या अहंकाराचें भारी ओझें मी यापुढें वहाणार नाहीं आणि स्वतःच्या दाराशीं स्वार्थी कंगालपणाहि पत्करणार नाहीं. हे प्रभो, माझ्या अहंकाराचें ओझें तुझ्या चरणांशीं समर्पण करून मी या उदार विश्वांत मुक्त संचार करणार आहें. )

असा संकल्प करणारे कविवर आपली नम्र, आंतरिक इच्छा व्यक्त करतात :

आमि चेये आछि तोमादेर शबापाने ।
स्थान दाओ मोरे शकलेर माझखाने ।
नीचे शब-नीचे ए धुलिर धरणीते ।
जेथा आसनेर मूल्य ना हय दिते,
जेथा रेखा दिये भाग करा नेइ किछु,
जेथा भेद नाइ माने आर अपमाने,
स्थान दाओ शेथा शकलेर माझखाने ।

( जिथें आसन प्राप्त करण्यासाठीं मूल्य द्यावें लागत नाहीं, जिथें उच्च-नीचतेचा, मान-अपमानाचा भेदभाव नाहीं, असें सहजप्राप्य स्थान मला धूलिधूसरित धरणीवरील सर्वसाधारण मानवसमाजांत प्राप्त व्हावें. )

अहंकाराचा त्याग करून विश्वमीलनाच्या योगानें सच्चिदानंद परमात्म्याशीं ( जीवात्म्यानें ) एकात्मतेची अनुभूति प्राप्त करून घेणें हेंच, माझ्या अल्प-मतीप्रमाणें, ‘ गीतांजली ’चें मूलसूत्र आहे.

अशी एकात्मतेची व्यापक अनुभूति प्राप्त होण्याची उत्कट इच्छा मनो-मनीं बाळगून कवि म्हणतात :

एमनि करे मुखोमुखी
शामने तोमार थाका
केवल मात्र तोमाते प्राण
पूर्ण करे राखा !
ए दया जे पयेछे तार
लाभेर सीमा नाइ—
शकल लोभ शे शरिये फेले
तोमाय दिते ठाँइ ।

( हे प्रभो, तुझ्या विश्वव्यापी सच्चिदानंद स्वरूपाचें नेहमीं दर्शन व्हावें व त्या निबिड अनुभूतींतच परिपूर्णता प्राप्त व्हावी, असा लाभ तुझ्या कृपे-मुळेंच मिळतो. हा अनुग्रह ज्याला लाभला, त्याला सर्व कांहीं मिळालें. असा भाग्यवान् तुझें अधिष्ठान प्राप्त करण्यासाठीं इतर सर्व आकांक्षांचा त्याग करतो. )

विश्वप्रेमी, आनंदकामी कविवर प्रार्थना करतात :

अंतर मन विकशित करो
अंतरतर हे ।
निर्मल करो, उज्ज्वल करो,
सुंदर करो हे ।......
युक्त करो हे शबार शंगे,
मुक्त करो हे बंध,
संचार करो सकल कर्मे
शांत तोमार छंद ।
चरणपद्मे ममचित्त निःस्पंदित करो हे......
अंतर मम विकशित करो
अंतरतर हे ।

( हे अंतर्यामी परमेश्वरा, अहंकारानें संकुचित झालेल्या माझ्या मनाचा विकास कर. माझें मन निर्मळ, तेजस्वी व सुंदर असावें. चराचर विश्वाशीं माझें यथार्थ मीलन घडवून आण. मला अंतर्बंधनांतून मुक्त कर. सर्व कामांत तुझ्या चरणकमलांशीं माझें मन नेहमीं नम्र, एकाग्र व्हावें. )

‘ गीतांजली ’मध्यें कवींद्र रवींद्रनाथांनीं उपनिषदांचें उदात्त तत्त्वज्ञान व वैष्णव संतांचा भक्तिरस यांचा मधुर मिलाप साधून तो अत्यंत कलात्मकतेनें प्रासादिक वाणीनें जगाला सादर केला आहे. ‘ गीतांजलि ’ हें भारतीय संस्कृतीचें आधुनिक अमृतफळ आहे, असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं.

★ ★ ★

## ‘ गीतांजलि ’ : १०

गीतांजलीला १९१३ सालीं नोबेल पारितोषिक मिळतांच भारतीय साहित्याला जागतिक साहित्याच्या दरबारांत मानाचें स्थान मिळालें. नोबेल पारितोषिक मिळालें इंग्रजी गीतांजलीला, बंगाली गीतांजलीला नव्हे. बंगाली ‘ गीतांजली ’तील सर्व गीतांच्या अनुवादांचा रवींद्रनाथांनीं इंग्रजी ‘ गीतांजली’त समावेश केला होता असेंहि नाहीं. बंगाली ‘ गीतांजली ’त १५७ गीतें आहेत, तर नोबेल पारितोषिक मिळालेल्या इंग्रजी ‘ गीतांजली ’त १०३ आहेत. हीं १०३ गीतेंहि बंगाली ‘ गीतांजली ’तील नाहींत. बंगाली ‘ गीतांजली ’तील एकावन्न गीतांच्या अनुवादांचा इंग्रजी गीतांजलींत समावेश झाला असून बाकीच्या बावन्न गीतांपैकीं सतरा ‘ गीतिमाल्य ’ काव्यग्रंथांतून, सोळा ‘ नैवेद्य ’ मधून, अकरा ‘ खेया ’ ( नदीपार ) काव्यग्रंथांतून, तीन ‘ शिशु ’ मधून, आणि बाकीचीं पांच ‘ चैतालि ’, ‘ स्मरण ’, ‘ कल्पना ’, ‘ उत्सर्ग ’ व ‘ अचलायतन ’ या ग्रंथांतून घेतलीं आहेत. प्रस्तुत लेखांत बंगाली ‘ गीतांजली ’चें थोडक्यांत विवेचन करण्याचें योजिलें आहे.

‘ गीतांजलि ’ हा कवींद्र रवींद्रनाथांचा एकमेव श्रेष्ठ काव्यग्रंथ नाहीं. काव्यकलेच्या दृष्टीनें ‘ बलाका ’, ‘ शोनार तरी ’ (स्वर्णनौका), ‘ चित्रा ’ हे काव्यग्रंथहि श्रेष्ठ प्रतीचे आहेत. ‘ गीतांजली ’मध्यें श्रेष्ठ प्रतीचा प्रतिभाविलास

आहेच; पण या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे रवींद्रनाथांच्या जीवनसाधनेच्या दृष्टीनें. 'गीतांजली'तील सर्व गीतें १९०६ ते १९१० च्या दरम्यान रचलीं गेलीं. १९०१ पासून १९१४ पर्यंतचा कालखंड रवींद्रकाव्यांत आध्यात्मिक साधनेचें पर्व म्हणून ओळखला जातो. 'नैवेद्य' (१९०१) पासून 'खेया', 'गीतांजली', 'गीतिमाल्य' व 'गीतालि' (१९१४) पर्यंतचे हे काव्यग्रंथ आध्यात्मिक साधनेच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

'मानसी'–'शोनार तरी'–'चित्रा'च्या प्रेम-सौंदर्यप्रधान पर्वानंतर 'चैतालि' (१८९६) पासून 'क्षणिका' (१९००) पर्यंतच्या काव्य-ग्रंथांत रवींद्रनाथ मानवाच्या श्रेष्ठ आदर्शाकडे, पूर्णतम जीवनाकडे आकर्षित झालेले दिसतात. क्षमा, त्याग, वैराग्य, न्यायनिष्ठा इत्यादि मूल्यांचा प्रभावी आविष्कार 'कथा' व 'काहिनी' या काव्यग्रंथांतील कर्ण-कुंती-संवाद, गांधारी-आवेदन, नरकवास वगैरे आख्यानांत व इतर अवदानांत पाहण्यास मिळतो. अशा श्रेष्ठ मूल्यांनीं परिपूर्ण बनलेल्या आदर्श जीवनाबद्दल रवींद्र-नाथांना जी तीव्र आकांक्षा वाटूं लागली होती, तिचीच स्वाभाविक परिणति 'नैवेद्य' काव्यग्रंथापासूनच्या आध्यात्मिक साधनेंत झाली. आध्यात्मिक जीवनाच्या आकांक्षेमुळें 'नैवेद्य' मधील बहुतेक गीतें व कविता प्रार्थनारूप आहेत. ईश्वरविषयक गूढगुंजनात्मक कवितांची सुरुवात 'खेया' काव्यग्रंथा-पासून होते. मूळचा अनंत, निर्गुण परमेश्वर लीलामयाच्या लीलावैचित्र्यानें कवींद्रांच्या मनाला स्पर्शूं लागल्यामुळें त्यांच्या हृदयांत नाना रसांचीं कारंजीं उसळूं लागलीं. लीलामयाच्या व्यापक अनुभूतीसाठीं त्यांचें मन अधीर झालें, तळमळूं लागलें. रसानुभूतीचा काव्य-संगीतांत आविष्कार होत असतांना सान्त व निर्गुणाला सगुण बनवण्यासाठीं त्यांना संकेतांचा व रूपकांचा उपयोग करावाच लागला. रसानुभूतीची वैचित्र्यपूर्ण उत्कटता व संकेत-रूपकांची परिणति 'गीतांजलि'मध्येंच प्रकर्षानें आढळते.

'गीतांजली'मधील गीतांचें निरीक्षण करतांना असें आढळतें कीं, रहस्य-मयाच्या दर्शनासाठीं व लीलामयाच्या मीलनासाठीं कवींद्रांच्या मनांत जोरदार आकांक्षा निर्माण झाली आहे. परिपूर्ण ईश्वरानुभूति त्वरित लाभत नसल्या-मुळें त्यांच्या मनांत वेदना, नैराश्य व विरहक्रंदन यांच्या लाटा उसळलेल्या

दिसतात. आत्मशुद्धीशिवाय लीलामयाशीं खरें मीलन होणार नाहीं, याची त्यांना जाणीव असल्यामुळें अहंकार, मलिनता, संकुचितपणा वगैरे दोषांतून मुक्त होण्यासाठीं ते साधना करीत आहेत, परमेश्वराच्या साह्यासाठीं प्रार्थना करीत आहेत, असेंहि अनेक गीतांत आढळतें.

ज्या परमेश्वराच्या परिपूर्ण-अनुभूतीसाठीं कवींद्र आसुसले आहेत, तो साधारणतः तीन रूपांनीं ' गीतांजली 'त व्यक्त झाला आहे. पहिलें रूप अद्वैत ब्रह्ममय, दुसरें लीलामय व तिसरें रहस्यमय. अद्वैत ब्रह्मरूप परमेश्वर सर्वशक्तिमान् प्रभु, सृष्टिकर्ता, पिता अशा नात्यांतून व्यक्त झाला आहे. लीलामय परमेश्वर सखा, प्रियकर बनला आहे. आणि रहस्यमय परमेश्वर अज्ञात, चिरचंचल प्रवासी सजला आहे. किशोर वयापासूनच अद्वैतमार्गी वडलांकडून मिळालेली उपनिषदांची शिकवण, वैष्णवांचा लीलावाद, बर्गसँप्रणीत सृजनात्मक उत्क्रांतीचें तत्त्व, कबीर, दादू वगैरे संतकवींचें काव्य यांचा थोडाफार प्रभाव वरील तिन्ही रूपांत सूचित होत असला, तरी रवींद्रनाथांच्या ईश्वरानुभूतीचें स्वातंत्र्यच ' गीतांजली 'मध्यें प्रकर्षानें जाणवतें.

सत्य-ज्ञान–आनंदरूप ब्रह्मच साऱ्या सृष्टींत अनेक रूपांनीं व्यक्त झालें आहे, अशी कवींद्रांची श्रद्धा आहे. ही सारी सृष्टि त्याच आनंदरूप परमेश्वराचें लीलाक्षेत्र आहे. जीवात्म्यांत परमात्म्याचा विकास, सान्तामध्यें अनंताची अभिव्यक्ति, या साऱ्यामागें लीलामयाचा एक गूढ हेतु आहे. परमेश्वराचें स्वरूप आनंदमय असल्यामुळें स्वतःच्या आनंदोपभोगासाठींच त्यानें इतर सृष्टीबरोबर मानवाची निर्मिति केली. सृष्टींतील सौंदर्य मूळच्या आनंदाचेंच व्यक्तरूप आहे. मानवाच्या स्नेह-प्रेम-भक्तींत तो स्वतःच्या आनंदांशाचा उपभोग घेत असतो. मानवाच्या प्रेमाशिवाय त्याची लीला पूर्ण होत नाहीं. भक्ताला परमेश्वराची ओढ वाटते. त्याप्रमाणें परमेश्वरहि भक्ताच्या प्रेमाचा भुकेला असतो. वैष्णव प्रेमभक्तींतील सख्यरति, वात्सल्यरति, मधुररति वगैरे भिन्न भिन्न रतिप्रकारांत परमेश्वर व भक्त यांच्या दरम्यान विरह-मीलनाची जी प्रेमलीला चालते, तिचा वैशिष्ट्यपूर्ण प्रभाव ' गीतांजली 'त जागोजागीं जाणवतो. लीलामय परमेश्वराच्या व्यापक लीलेच्या वैचित्र्यपूर्ण छंदामुळें ही चराचर सृष्टि अविरतपणें प्रवाहित होत असते. सृष्टिजीवनाच्या

आहेच; पण या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे रवींद्रनाथांच्या जीवनसाधनेच्या दृष्टीनें. ‘ गीतांजली ’तील सर्व गीतें १९०६ ते १९१० च्या दरम्यान रचलीं गेलीं. १९०१ पासून १९१४ पर्यंतचा कालखंड रवींद्रकाव्यांत आध्यात्मिक साधनेचें पर्व म्हणून ओळखला जातो. ‘ नैवेद्य ’ ( १९०१ ) पासून ‘ खेया ’, ‘ गीतांजली ’, ‘ गीतिमाल्य ’ व ‘ गीतालि ’ ( १९१४ ) पर्यंतचे हे काव्यग्रंथ आध्यात्मिक साधनेच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

‘ मानसी ’–‘ शोनार तरी ’ – ‘ चित्रा ’च्या प्रेम-सौंदर्यप्रधान पर्वानंतर ‘ चैतालि ’ ( १८९६ ) पासून ‘ क्षणिका ’ ( १९०० ) पर्यंतच्या काव्य-ग्रंथांत रवींद्रनाथ मानवाच्या श्रेष्ठ आदर्शांकडे, पूर्णतम जीवनाकडे आकर्षित झालेले दिसतात. क्षमा, त्याग, वैराग्य, न्यायनिष्ठा इत्यादि मूल्यांचा प्रभावी आविष्कार ‘ कथा ’ व ‘ काहिनी ’ या काव्यग्रंथांतील कर्ण-कुंती-संवाद, गांधारी-आवेदन, नरकवास वगैरे आख्यानांत व इतर अवदानांत पाहण्यास मिळतो. अशा श्रेष्ठ मूल्यांनीं परिपूर्ण बनलेल्या आदर्श जीवनाबद्दल रवींद्र-नाथांना जी तीव्र आकांक्षा वाटूं लागली होती, तिचीच स्वाभाविक परिणति ‘ नैवेद्य ’ काव्यग्रंथापासूनच्या आध्यात्मिक साधनेंत झाली. आध्यात्मिक जीवनाच्या आकांक्षेमुळें ‘ नैवेद्य ’ मधील बहुतेक गीतें व कविता प्रार्थनारूप आहेत. ईश्वरविषयक गूढगुंजनात्मक कवितांची सुरुवात ‘ खेया ’ काव्यग्रंथा-पासून होते. मूळचा अनंत, निर्गुण परमेश्वर लीलामयाच्या लीलावैचित्र्यानें कवींद्रांच्या मनाला स्पर्शू लागल्यामुळें त्यांच्या हृदयांत नाना रसांचीं कारंजीं उसळूं लागलीं. लीलामयाच्या व्यापक अनुभूतीसाठीं त्यांचें मन अधीर झालें, तळमळूं लागलें. रसानुभूतीचा काव्य-संगीतांत आविष्कार होत असतांना सान्त व निर्गुणाला सगुण बनवण्यासाठीं त्यांना संकेतांचा व रूपकांचा उपयोग करावाच लागला. रसानुभूतीची वैचित्र्यपूर्ण उत्कटता व संकेत-रूपकांची परिणति ‘ गीतांजलि ’मध्येंच प्रकर्षानें आढळते.

‘ गीतांजली ’मधील गीतांचें निरीक्षण करतांना असें आढळतें कीं, रहस्य-मयाच्या दर्शनासाठीं व लीलामयाच्या मीलनासाठीं कवींद्रांच्या मनांत जोरदार आकांक्षा निर्माण झाली आहे. परिपूर्ण ईश्वरानुभूति त्वरित लाभत नसल्या-मुळें त्यांच्या मनांत वेदना, नैराश्य व विरहक्रंदन यांच्या लाटा उसळलेल्या

आहेच; पण या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे रवींद्रनाथांच्या जीवनसाधनेच्या दृष्टीनें. 'गीतांजली 'तील सर्व गीतें १९०६ ते १९१० च्या दरम्यान रचलीं गेलीं. १९०१ पासून १९१४ पर्यंतचा कालखंड रवींद्रकाव्यांत आध्यात्मिक साधनेचें पर्व म्हणून ओळखला जातो. 'नैवेद्य' (१९०१) पासून 'खेया', 'गीतांजली', 'गीतिमाल्य' व 'गीतालि' (१९१४) पर्यंतचे हे काव्यग्रंथ आध्यात्मिक साधनेच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

'मानसी'–'शोनार तरी'–'चित्रा'च्या प्रेम-सौंदर्यप्रधान पर्वानंतर 'चैतालि' (१८९६) पासून 'क्षणिका' (१९००) पर्यंतच्या काव्य-ग्रंथांत रवींद्रनाथ मानवाच्या श्रेष्ठ आदर्शाकडे, पूर्णतम जीवनाकडे आकर्षित झालेले दिसतात. क्षमा, त्याग, वैराग्य, न्यायनिष्ठा इत्यादि मूल्यांचा प्रभावी आविष्कार 'कथा' व 'काहिनी' या काव्यग्रंथांतील कर्ण-कुंती-संवाद, गांधारी-आवेदन, नरकवास वगैरे आख्यानांत व इतर अवदानांत पाहण्यास मिळतो. अशा श्रेष्ठ मूल्यांनीं परिपूर्ण बनलेल्या आदर्श जीवनाबद्दल रवींद्र-नाथांना जी तीव्र आकांक्षा वाटूं लागली होती, तिचीच स्वाभाविक परिणति 'नैवेद्य' काव्यग्रंथापासूनच्या आध्यात्मिक साधनेंत झाली. आध्यात्मिक जीवनाच्या आकांक्षेमुळें 'नैवेद्य' मधील बहुतेक गीतें व कविता प्रार्थनारूप आहेत. ईश्वरविषयक गूढगुंजनात्मक कवितांची सुरुवात 'खेया' काव्यग्रंथा-पासून होते. मूळचा अनंत, निर्गुण परमेश्वर लीलामयाच्या लीलावैचित्र्यानें कवींद्रांच्या मनाला स्पर्शूं लागल्यामुळें त्यांच्या हृदयांत नाना रसांचीं कारंजीं उसळूं लागलीं. लीलामयाच्या व्यापक अनुभूतीसाठीं त्यांचें मन अधीर झालें, तळमळूं लागलें. रसानुभूतीचा काव्य-संगीतांत आविष्कार होत असतांना सान्त व निर्गुणाला सगुण बनवण्यासाठीं त्यांना संकेतांचा व रूपकांचा उपयोग करावाच लागला. रसानुभूतीची वैचित्र्यपूर्ण उत्कटता व संकेत-रूपकांची परिणति 'गीतांजलि'मध्येंच प्रकर्षानें आढळते.

'गीतांजली 'मधील गीतांचें निरीक्षण करतांना असें आढळतें कीं, रहस्य-मयाच्या दर्शनासाठीं व लीलामयाच्या मीलनासाठीं कवींद्रांच्या मनांत जोरदार आकांक्षा निर्माण झाली आहे. परिपूर्ण ईश्वरानुभूति त्वरित लाभत नसल्या-मुळें त्यांच्या मनांत वेदना, नैराश्य व विरहक्रंदन यांच्या लाटा उसळलेल्या

दिसतात. आत्मशुद्धीशिवाय लीलामयाशीं खरें मीलन होणार नाहीं, याची त्यांना जाणीव असल्यामुळें अहंकार, मलिनता, संकुचितपणा वगैरे दोषांतून मुक्त होण्यासाठीं ते साधना करीत आहेत, परमेश्वराच्या साह्यासाठीं प्रार्थना करीत आहेत, असेंहि अनेक गीतांत आढळतें.

ज्या परमेश्वराच्या परिपूर्ण-अनुभूतीसाठीं कवींद्र आसुसले आहेत, तो साधारणतः तीन रूपांनीं ' गीतांजलीं 'त व्यक्त झाला आहे. पहिलें रूप अद्वैत ब्रह्ममय, दुसरें लीलामय व तिसरें रहस्यमय. अद्वैत ब्रह्मरूप परमेश्वर सर्व-शक्तिमान् प्रभु, सृष्टिकर्ता, पिता अशा नात्यांतून व्यक्त झाला आहे. लीलामय परमेश्वर सखा, प्रियकर बनला आहे. आणि रहस्यमय परमेश्वर अज्ञात, चिरचंचल प्रवासी सजला आहे. किशोर वयापासूनच अद्वैतमार्गी वडलांकडून मिळालेली उपनिषदांची शिकवण, वैष्णवांचा लीलावाद, बर्गसँ-प्रणीत सृजनात्मक उत्क्रांतीचें तत्त्व, कबीर, दादू वगैरे संतकवींचें काव्य यांचा थोडाफार प्रभाव वरील तिन्ही रूपांत सूचित होत असला, तरी रवींद्र-नाथांच्या ईश्वरानुभूतीचें स्वातंत्र्यच ' गीतांजली 'मध्यें प्रकर्षानें जाणवतें.

सत्य-ज्ञान—आनंदरूप ब्रह्मच साऱ्या सृष्टींत अनेक रूपांनीं व्यक्त झालें आहे, अशी कवींद्रांची श्रद्धा आहे. ही सारी सृष्टि त्याच आनंदरूप परमेश्वराचें लीलाक्षेत्र आहे. जीवात्म्यांत परमात्म्याचा विकास, सान्तामध्यें अनंताची अभिव्यक्ति, या साऱ्यामागें लीलामयाचा एक गूढ हेतु आहे. परमेश्वराचें स्वरूप आनंदमय असल्यामुळें स्वतःच्या आनंदोपभोगासाठींच त्यानें इतर सृष्टीबरोबर मानवाची निर्मिति केली. सृष्टींतील सौंदर्य मूळच्या आनंदाचेंच व्यक्तरूप आहे. मानवाच्या स्नेह-प्रेम-भक्तींत तो स्वतःच्या आनंदांशाचा उपभोग घेत असतो. मानवाच्या प्रेमाशिवाय त्याची लीला पूर्ण होत नाहीं. भक्ताला परमेश्वराची ओढ वाटते. त्याप्रमाणें परमेश्वरहि भक्ताच्या प्रेमाचा भुकेला असतो. वैष्णव प्रेमभक्तींतील सख्यरति, वात्सल्य-रति, मधुररति वगैरे भिन्न भिन्न रतिप्रकारांत परमेश्वर व भक्त यांच्या दरम्यान विरह-मीलनाची जी प्रेमलीला चालते, तिचा वैशिष्ट्यपूर्ण प्रभाव ' गीतांजलीं 'त जागोजागीं जाणवतो. लीलामय परमेश्वराच्या व्यापक लीलेच्या वैचित्र्यपूर्ण छंदामुळें ही चराचर सृष्टि अविरतपणें प्रवाहित होत असतें. सृष्टिजीवनाच्या

गतिमान् प्रवाहांतील असंख्य उत्थानपतनांत, सुखदुःखांत रवींद्रनाथांना लीलामयाची रहस्यलीलाच जाणवत आहे. रहस्यमय परमेश्वराच्या मीलना-साठीं चाललेला मानवाचा अविरत अभिसार म्हणजेच हें प्रवाही मानवी जीवन. प्रत्यक्ष मीलनापेक्षां मीलनासाठीं चाललेल्या अखंड अभिसारांतच रवींद्रनाथ अधिक रमलेले दिसतात. या अभिसारासाठीं निघालेला प्रेमिक भक्त विरहवेदना भोगीत असतो, उत्कंठित मनानें रहस्यमयाचा शोध घेत असतो. निसर्गाच्या वैचित्र्यपूर्ण सौंदर्यांत व मानवाच्या स्नेह-प्रीतींत त्याला लीलामयाचा क्षणिक स्पर्श लाभत असतो. विरहवेदना, उत्कंठापूर्ण शोध व क्षणिक मीलनाची माया ह्या सर्वांमुळें प्रेमिक भक्ताला अविरत अभिसारांतच अतिशय गोडी वाटत आहे, जीवन सार्थकी लागल्यासारखें वाटत आहे. यासाठीं चिरचंचल, चिरप्रवासी रहस्यमयाचा शोध घेणारा प्रेमिक भक्तहि स्वेच्छेनें चिरप्रवासी बनला आहे. लीलामय, रहस्यमय परमेश्वर व प्रेमिक भक्त यांच्या विरहमीलनात्मक प्रेमलीलांचीं सरस, वैचित्र्यपूर्ण चित्रणेंच 'गीतांजली'मध्यें प्रामुख्यानें आढळतात.

'गीतांजली'मधील गीतांत, साधारणतः चार भावधारा प्रवाहित झालेल्या दिसतात : (१) परमेश्वराशीं सहजासहजीं मीलन साधत नसल्यामुळें भक्ताला वाटणारी हताशा व विरहवेदना. (२) अहंकार व संकुचितपणा यांच्या त्यागानें होणाऱ्या आत्मशुद्धीसाठीं कविभक्ताची साधना व त्या कामीं साह्य व्हावें म्हणून परमेश्वरचरणीं प्रार्थना, (३) निसर्गसौंदर्य व मानवी प्रेम यांतून लाभणारी क्षणिक ईश्वरानुभूति. पृथ्वीवरील मातींत व दीनदरिद्री श्रमिकांत व अस्पृश्यांत होणारें ईश्वरी दर्शन. (४) सान्ता-अनंतांत लीला-मयाची अनुभूति.

भक्ताची हताशा व विरहवेदना व्यक्त करणाऱ्या गीतांतील काव्यसौंदर्य केवळ अपूर्व आहे. वर्षाऋतूच्या वैचित्र्यपूर्ण पार्श्वभूमीवरचीं विरहगीतें किती रसघन झालीं आहेत !

**आजि श्रावण-घन-गहन-मोहे**
**गोपन तव चरण फेले**
**निशार मतो नीरव ओहे**

शबार दिठि एडाये एले ।
प्रभात आजि मुदेछे आँखि,
बातास वृथा जेतेछे डाकि,
निलाज नील आकाश ढाकि
निविड मेघ के दिलो मेले ।
हे ॲका सखा, हे प्रियतम,
रयेछे खोला ए घर मम,
समुख दिये स्वपनसम
जेयो ना मोरे हेलाय ठेले ।

( आज श्रावणाच्या घनगहन मोहानें नीरव रात्रीप्रमाणें तूं सर्वांची दृष्टि चुकवून गुप्त पावलांनीं आलास. आज प्रभातकाळानें आपले नेत्र मिटले आहेत. भणभण वारा उगीचच साद घालून जात आहे. निलाजरें निळें आकाश झाकीत घन मेघ कोणीं विस्तारले बरें ! हे प्रियतम, माझ्या एकाकी सख्या, ही माझी खोली उघडीच आहे. माझ्यासमोरून तूं मला स्वप्नाप्रमाणें अवहेलनेनें ठुकरावून जाऊं नकोस. )

कवींद्रांचें हृदय विरहानें इतकें व्याप्त झालें आहे कीं, सभोंवतालच्या वातावरणांत त्यांना विरहाचेंच प्रतिबिंब दिसत आहे.

हेरि अहरह तोमारि विरह
भुवने भुवने राजे हे ।
कतो रूप धरे कानने भूधरे
आकाशे सागरे साजे हे ।
सारा निशि धरि ताराय ताराय
अनिमेष चोखे नीरवे दाँडाय,
पल्लवदले श्रावण धाराय
तोमारि विरह बाजे हे ।
घरे घरे आजि कतो वेदनाय
तोमारि गभीर विरह घनाय,

कतो प्रेमे हाय कतो वासनाय
कतो सुखेदुखे काजे हे।
सकल जीवन उदास करिया
कतो गाने सुरे गलिया झरिया
तोमारि विरह उठेछे भरिया
आमार हियार माझे हे।

( तुझा विरह रात्रंदिवस या जगांत जागोजागीं विराजत असलेला दिसतो. किती तरी रूपें धारण करून तो वनांत, पर्वतावर, आकाशांत व सागरांत शोभतो. सारी रात्र तो ताऱ्याताऱ्यांतून निर्निमेष नेत्रांनीं पाहत नीरवपणें उभा असतो. पानांवर कोसळणाऱ्या श्रावणधारांत तुझाच विरह झंकारत असतो. घरोघरीं आज किती तरी वेदनांनीं तुझा विरह दाटत आहे. अरेरे, किती तरी प्रेमांत, वासनांत, सुखदुःखांत व कामकाजांत तो दाटत असतो. सारें जीवन उदास करीत, किती तरी स्वरांत, गीतांत वितळत, पाझरत तुझा विरह माझ्या मनांत भरभरून सांठला आहे. )

अहंकार, स्वार्थ, संकुचितपणा यांचा त्याग करून आत्मशुद्धि साधण्यासाठीं कविभक्ताची जी धडपड चालली आहे, तिच्यांत रवींद्रनाथांच्या आध्यात्मिक साधनेचा आलेखच आढळतो, असें म्हणतां येईल. आत्मशुद्धीच्या साधनेंत यश मिळावें म्हणून कवींद्र परमेश्वराची प्रार्थना करीत आहेत. अशा गीतांत काव्यरसाची थोडी कमतरता जाणवत असली तरी त्यांतील आत्यंतिक तळमळ वाचकाच्या मनाला भिडल्यावांचून राहत नाहीं.

दया दिये हबे गो मोर
जीवन धुते।
नइले कि आर पारबो तोमार
चरण छुँते।
तोमाय दिते पूजार डालि
बेरिये पडे सकल कालि,
परान आमार पारिने ताइ
पाये थुते।

अतो दिन तो छिलोना मोर
　　कोनो व्यथा,
सर्व अंगे माखा छिलो
　　मलिनता।
आज एइ शुभ्र कोलेर तरे
व्याकुल हृदय केंद्रे मरे,
दियो ना गो दियो ना आर
　　धुलाय शुते।

( हे परमेश्वरा, माझें जीवन तूं दयेनें निर्मळ केलें पाहिजे, नाहीं तर तुझ्या चरणांना मला स्पर्श करतां येईल का ? तुला पूजा-साहित्य अर्पण करतांना सारी मलिनता उघडी पडते. त्यामुळें तुझ्या चरणीं माझें जीवन मी अर्पण करूं शकत नाहीं. इतके दिवस माझ्या मनाला कोणतीच व्यथा नव्हती. सर्वांग मलिनतेनें माखलें होतें. आज तुझ्या ह्या शुभ्र वक्षीं आश्रय मिळावा म्हणून माझें व्याकुळ हृदय आक्रंदत आहे. कृपा करून आतां मला तूं धुळींत आणखी लोळूं देऊं नकोस. )

निसर्गसौंदर्य व मानवी प्रेम यांतून लाभणाऱ्या ईश्वरानुभूतीचें वैचित्र्य-पूर्ण चित्रण बऱ्याच गीतांत आढळतें. अनुभूतीच्या उत्कट रसाविष्कारामुळें अशीं गीतें अपूर्व काव्यसौंदर्यानें बहरलीं आहेत. वर्षाऋतूच्या सरस सौंदर्यांत, शरदाच्या निर्मळ आकाशांत, सोनेरी प्रकाशांत, वसंत ऋतूंतील रूपरस-गंधांच्या समारोहांत—सहाहि ऋतूंच्या परिवर्तनशील सौंदर्यांत कवींद्रांना आनंदमयाचें दर्शन घडत आहे :

प्रेमे प्राणे गाने गंधे आलोके पुलके
प्लावित करिया निखिल द्युलोक-भूलोके
तोमार अमल अमृत पडिछे झरिया।
दिके दिके आजि टुटिया सकल बंध
मुरति धरिया जागिया ओठे आनंद,
जीवन उठिलो निविड सुधाय भरिया।

( प्रेम, चैतन्य, गीत, गंध, प्रकाश, आनंद यांनीं अवघ्या पृथ्वीला व आकाशाला व्यापून टाकीत तुझें निर्मळ अमृत ओसंडत आहे. आज चहूंकडे साऱ्या बंधनांतून मुक्त झालेला आनंद मूर्तिमंत जागृत होत आहे. जीवन घन सुधेनें परिपूर्ण झालें आहे. )

सर्व मानवी नात्यांत, सर्व श्रेणींच्या माणसांत कवींद्रांना आनंदमयाचा स्पर्श जाणवत आहे. परमेश्वराचें दर्शन मंदिरांतील कर्मठ पूजनानें लाभत नाहीं. दीन-दरिद्री वाटणाऱ्या श्रमिकांबरोबर व अस्पृश्यांबरोबर तो राबत असतो. अस्पृश्यच खरे हरिजन अशी कवीची श्रद्धा आहे. म्हणून दीनबंधु परमेश्वराला उद्देशून रवींद्रनाथ म्हणतात :

विश्वसाथे योगे जेथाय विहारो
शेइखाने योग तोमार साथे आमारो।
नय को वने, नय विजने,
नय को आमार आपन मने
शबार जेथाय आपन तुमि हे प्रिय
शेथाय आपन आमारो।
शबार पाने जेथाय बाहु पसारो।
शेइखानेतेइ प्रेम जागिबे आमारो।
गोपने प्रेम रय ना घरे,
आलोरमतो छडिये पडे
शबार तुमि आनंदधन हे प्रिय
आनंद शेइ आमारो।

( विश्वाशीं एकरूप होऊन जेथें तूं विहार करतोस तेथेंच तुझ्याशीं माझेंहि मीलन होतें, वनांत नव्हे, निर्जन स्थानीं नव्हे, किंवा माझ्या मनोमनहि नव्हे. जेथें सर्वांनाच तूं आपलासा वाटतोस तेथेंच हे प्रिय, तुझ्याशीं माझेंहि निकट नातें जमतें. सर्वांसाठीं जेथें तूं आपले बाहू पसरतोस, तेथेंच माझेंहि प्रेम जागृत होईल. प्रेम गुप्तपणें घरांत राहत नाहीं. प्रकाशाप्रमाणें तें सर्वत्र पसरतें. हे प्रिय, तूं सर्वांचें आनंदधन आहेस, तोच माझा आनंद. )

जीवात्म्यांत व्यक्त होणारा परमात्मा, सान्तांत व्यक्त होणारा अनंत, अशी जी लीलामयाची रहस्यलीला कवीच्या अनुभवाला येते, तिचें गूढ-गुंजनात्मक चित्रण करणारीं गीतेंहि ‘ गीतांजली ’त आढळतात. अशा गीतांतील सरस गूढगुंजनामुळें वाचकाला अनिर्वचनीय आनंदाचा लाभ होतो. मानवाच्या सीमाबद्ध जीवनांत रहस्यमय आनंद जणूं आपली व्याकुळ बांसरी वाजवीत आहे. त्या वैचित्र्यपूर्ण रहस्यलीलेनें मानवी जीवन सरस सुंदर बनतें.

सीमार माजे, असीम, तुमि
बाजाओ आपन सुर ।
आमार माझे तोमार प्रकाश
ताइ ॲतो मधुर ।
कतो वर्णे कतो गंधे
कतो गाने कतो छंदे,
अरूप, तोमार रूपेर लीलाय
जागे हृदयपुर ।
आमारमध्ये तोमार शोभा
ॲमन सुमधुर ।

( हे असीम, सीमेमध्यें तूं आपले स्वर छेडतोस म्हणूनच माझ्यांतील तुझी अभिव्यक्ति इतकी मधुर आहे. किती तरी वर्ण-गंध-गीत-छंदांत व्यक्त होणाऱ्या तुझ्या रूपलीलेनें माझें हृदय-निकेतन जागृत होतें. म्हणूनच, हे अरूप, माझ्यांतील तुझी शोभा अशी सुमधुर आहे. )

‘ गीतांजली ’तील गीतांत भाव, भाषा व छंद यांचा जो वैचित्र्यपूर्ण समारोह दिसतो, तो केवळ अपूर्व म्हटला पाहिजे. या समारोहांत स्वरमाधुर्याची भर पडल्यावर मूळचींच सुंदर गीतें किती रसघन होत असतील, याची कल्पना केलेली बरी. रवींद्रसंगीताची ही रसघनता अनिर्वचनीय असल्यामुळें तिचें वर्णन करणें केवळ अशक्य आहे. तिचा अपूर्व आस्वाद वाचकांनीं स्वतःच घ्यावा.

* * *

## ' बलाका ' : ११

रवींद्रकाव्यांत ' बलाका ' काव्यग्रंथाला कलेच्या व वैचारिकतेच्या दृष्टीनें ' गीतांजली 'च्या खालोखाल महत्त्व आहे. रवींद्रनाथ म्हणतात : " शुभ्र बलाकापंक्तींतील बगळे एकामागून एक लीलेनें उडत जातात, त्याप्रमाणें या काव्यग्रंथांतील कविता आपणांला सहज स्फुरल्या व रचल्या गेल्या. " या काव्यग्रंथांतील कविता १९१४ ते १६ या कालखंडांतील आहेत. ' गीतांजलि ', ' गीतिमाल्य ' या काव्यग्रंथांच्या रचनाकाळीं रवींद्रनाथांची जीवनसमस्या-जनित अंतर्मुख दृष्टि शेवटीं शेवटीं समस्यापरिहारानें बहिर्मुख होत असलेली आढळून येते. सुरवातीच्या कवितांत आढळणारे वर्षाकाल, रात्र, अंधकार वगैरे विषादद्दर्शक संकेत शेवटीं कमी कमी होऊन त्या जागीं तेजाचें, प्रकाशाचें जयगान ऐकूं येतें. ' भारततीर्थ ', ' हे मोर दुर्भागा देश ' वगैरे उत्तरार्धांतील कवितांत बहिर्मुखतादर्शक विश्वैकात्मकता स्पष्टतर होऊं लागते. प्रसिद्ध इतिहासकार टॉयन्बीच्या मतें प्रत्येक महामानवाच्या किंवा राष्ट्राच्या जीवनामध्यें प्रथम पर्वांत आढळणारी स्वाभाविक उत्साहजनित बहिर्मुखवृत्ति पुढें विरोधविकास-वादाच्या तत्त्वाप्रमाणेंच कीं काय, अंतर्मुख किंवा स्थिति-शील बनते व अंतर्द्वंद्वाच्या शेवटीं समन्वयाच्या योगानें ती परत बहिर्मुख होते. असाच कांहींसा प्रकार रवींद्रनाथांच्या बाबतींत झालेला दिसतो. दुसरें असें : ' बलाका '—कालीन जागतिक परिस्थितीहि बहिर्मुखतेला आवाहन करणारी होती. तो काळ प्रथम महायुद्धाचा असल्यानें चहूंकडे अन्याय-अत्याचारांचें तांडव चालू होतें. तशा वेळीं मानवप्रेमी व कल्याणकामी रवींद्र-नाथांना काव्यानंदांतच दंग राहणें शक्य नव्हतें. जीवनसमस्या सुटल्यामुळें लाभलेल्या नवउत्साहानें व दृढतर जीवननिष्ठेनें त्यांनीं मानवतेच्या वतीनें अन्याय व अकल्याण यांविरुद्ध लढा पुकारला. ' शंख ' या कवितेविषयीं रवींद्रनाथ म्हणतात : " या कवितेंत उल्लेख केलेला शंख विधात्यानें विश्वमानवाच्या हातीं दिलेला ' आव्हान-शंख ' आहे. हा शंख फुंकूनच अन्याय-अकल्याणाविरुद्ध आपण लढा पुकारला पाहिजे." विधात्याला उद्देशून ते म्हणतात :

तोमार काछे आराम चेये
पेलेम शुधु लज्जा।
एबार शकल अंग छेये
पराओ रण-सज्जा।
व्याघात आशुक नव नव
आघात खेये अटल रबो,
वक्षे आमार दुःखे तव
बाजवे जयडंक।
देबो शकल शक्ति, लबो
अभय तव शंख।

( तुझ्याकडून मला आरामाची, सुखशांतीची प्राप्ति होईल, अशी अपेक्षा केल्याबद्दल माझी मलाच लाज वाटते. आतां तूंच माझ्या सर्वांगावर रणवेश चढव. जीवनसंग्रामासाठीं मला उद्युक्त कर. या जीवनसंग्रामांत कितीहि नवीं नवीं संकटें आलीं तरी मी डगमगणार नाहीं. दुःखांच्या आघातांनीं माझ्या वक्षःस्थळांत तुझीच विजयदुंदुभि वाजत राहील. सर्व शक्ति पणाला लावून लढत असतांना मी तुझ्या अभय देणाऱ्या आव्हानशंखाचा स्वीकार करून नवीन संकटांना ललकारीत राहीन. )

अन्यायाचा नतमस्तकानें स्वीकार करणें हें पौरुषहीनतेचें लक्षण आहे, असें बजावून त्यांनीं तेजस्वितेचा, पुरुषार्थाचा पुरस्कार केला. विविध संकटांचा प्रतिकार करीत, त्यांवर मात करीत जीवनाची अग्रगति चालू ठेवणें, हेंच जिवंतपणाचें लक्षण आहे.

आमरा चलि समुखपाने
के आमादेर बांधवे ?
रइलो जारा पिछुर टाने
काँदबे तारा काँदबे।
छिंडबो बाधा रक्तपाये
चलबो छुटे रौद्रे छाये,

जडिये ओरा आपन गाये
केवलि फाँद फाँदबे।
काँदबे ओरा कांदबे।

( जीवनसंग्रामांत विजय मिळवीत पुढें पुढें जाणाऱ्या आम्हांला कोण बरें आडवणार ? जे दुर्बल लोक भीतीनें व संकुचितपणानें मायापाशांत अडकून मागें रहातात, त्यांच्या कपाळींच खरें दुःख लिहिलें आहे. पुढें जातां जातां आमचे पाय रक्ताळले तरी आम्ही संकटांचे पाश तोडीत राहणार. कडक ऊन असो किंवा शीतल छाया असो, आमची अग्रगति चालूच राहणार. मागें राहणारे दुर्बल लोकच मोहग्रस्त होऊन स्वतःभोंवतीं नवीं नवीं बंधनें निर्माण करतात. अशा लोकांच्या नशिबींच खरें दुःख लिहिलेलें आहे. त्या दुःखांत चूर होऊन ते नेहमीं रडतच बसणार. )

अशा कवितांत वर्णिलेला जीवनसंग्राम व्यापक आहे. बाह्य अन्याय-अत्याचारांचा तेजस्वीपणानें प्रतिकार करण्यासाठीं जसें आवाहन आहे, तसेंच आपल्यांतील हीनता, दीनता, संकुचितता वगैरे दोषांविरुद्ध लढण्यासाठींहि आवाहन केलें आहे. अशा दुहेरी संग्रामाच्या योगानेंच खऱ्या मानवतेचा विजय होणार आहे.

झडेर पुंजित मेघे
कालोय ढेकेछे आलो,
जानेना तो केऊ
रात्रि आछे किना आछे,
दिगंते फेनाये ओठे ढेऊ
तारि माझे फुंकारे कांडारी
' नूतन समुद्रतीरे तरी
निये दिते हबे पाडि। '
बाहिरिया एलो कारा ?
मा काँदिछे पिछे,
प्रेयसी दाँडाये द्वारे
नयन मुदिछे।

झडेर गर्जन माझे
विच्छेदेर हाहाकार बाजे,
घरे घरे शून्य होलो
आरामेर शय्यातल;
'यात्रा करो, यात्रा करो,
यात्रीदल'
उठेछे आदेश
'बंदरेर काल होलो शेष।'

( संसारसागरावर व्यापक संग्रामाचें प्रचंड वादळ उठलें आहे. घनदाट मेघांनीं सर्व दिशा आच्छादित झाल्या असून ही वेळ रात्रीची आहे कीं दिवसाची, हेंहि कळत नाहीं. क्षितिजव्यापी सागरावर प्रचंड लाटा फेसाळत आहेत. अशा भयानक वेळींच मानवतेच्या नौकेचा तांडेल खलाशांना पुकारीत आहे, 'चला, आतां आपणांला नवीन समुद्रतीराकडे नौका हाकारली पाहिजे.' त्याच्या आवाहनाला कोणीं कोणीं साद दिली ? मार्गे आई आक्रोश करीत आहे, दरवाजांत उभ्या असलेल्या प्रेयसीनें भयार्त होऊन आपले डोळे मिटले आहेत. वादळाच्या भयानक गर्जनेंत विदारक विरहक्रंदन मिसळत आहे. घरोघरच्या सुखशय्या केव्हांच रिकाम्या पडल्या आहेत. तांडेलांचा वारंवार आदेश येत आहे, 'चला, खलाशांनो चला, ह्या बंदरांतला मुक्काम आतां संपला आहे.' अशा वेळीं घराचे मायापाश तोडून, संकटांना न भितां, मृत्यूची पर्वा न करतां आपणांला नवजीवनाच्या शोधासाठीं, तेजस्वी जीवनाच्या प्रातीसाठीं प्रयाण केलें पाहिजे. )

अशा कविता वाचीत असतांना आपणांला ज्या गतिशील जीवनशक्तीचा आढळ होतो, तिच्याशीं प्रख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ ऑंरि बेर्गसँ यानें प्रतिपादलेल्या सृजनात्मक उत्क्रांतींतील ( Creative evolution ) प्राणशक्ती—( elan vital ) चें बरेंच साम्य असल्याचें वारंवार जाणवतें. 'बलाका' काव्यग्रंथांतील 'चंचला' ही कविता लक्षपूर्वक वाचली तर ती बेर्गसँ-वर्णित elan vital चेंच श्रेष्ठ बंगाली काव्यरूप आहे, असें म्हणणें चुकीचें ठरणार नाहीं. 'चंचला' कवितेंतील नदी म्हणजे उद्दाम प्राणशक्तीचा प्रवाहच

आहे. केवळ मानवी जीवनांत नव्हे, तर साऱ्या सृष्टींत या प्राणशक्तीचा प्रवाह अविरत सृजनात्मक कार्य करीत आहे.

हे विराट नदी,
अदृश्य निःशब्द तव जल
अविच्छन्न अविरल
चले निरवधि ।......
ओगो नटी, चंचल अप्सरी,
अलक्ष्यसुंदरी,
तव नृत्यमंदाकिनी नित्य झरिझरि
तुलितेछे शुचि करि
मृत्युस्नाने विश्वेर जीवन।
निःशेष निर्मल नीले विकाशिछे निखिल गगन।

(हे विराट नदी, तुझ्या प्राणशक्तीचा अदृश्य प्रवाह अगदीं नीरवतेनें व अविरतपणानें वाहत असतो. अमूर्त सौंदर्यानें नटलेल्या चंचल अप्सरेप्रमाणें तूं विचित्र नृत्यांत रममाण झालेली असून तुझ्या नृत्यरत प्रवाहाच्या पवित्र संजीवनस्पर्शानें विविध विश्वजीवन क्षणोक्षणींच्या मृत्यूमधूनच नवजीवनाची प्राप्ति करून घेतें. अशा रीतीनें ह्या निर्मल नीलावकाशांत विशाल विश्व-जीवनाची नित्यनवीन तेजस्विता क्रमाक्रमानें विकसत असते.)

विश्वान्तर्गत प्राणशक्तीच्या उद्दाम प्रवाहाच्या अनुभूतीनें उत्साहित झालेले रवींद्रनाथ मानवाला म्हणतात :

ओरे देख, सेइ स्रोत होयेछे मुखर,
तरणी काँपिछे थरथर।
तीरेर संचय तोर पडे थाक् तीरे,
    ताकास् ने फिरे
    सम्मुखेर वाणी
    निक् तोरे टानि
    महास्रोते

पश्चातेर कोलाहल हते
अतल आँधारे - अकूल आलोते ।

( अरे पहा, प्राणशक्तीचा हा विश्वव्यापी प्रवाह कसा अमोघ गतीनें वाहत आहे ! या प्रबल प्रवाहांत तुझी जीवितनौका थरथर कांपत असून ती अग्रगतीसाठीं उत्सुक झाली आहे. अशा वेळीं तूं तीरावरील जड वस्तूंचा त्याग करून, मागच्या मायापाशांकडे मुळींच वळून न पाहतां आपली जीवित-नौका बंधनांतून मोकळी कर. नंतर ती आपोआपच भावी नवजीवनाच्या उदात्त वाणीच्या प्रभावानें अग्रगामी महाप्रवाहांत आकर्षित होऊन पुढें चालूं लागेल. भूतकाळाच्या परिचित कोलाहलांतून अमूर्त भविष्याकडे जातांना वाटेंतील घनांधकारानें तुझ्या मनांत शंका निर्माण होत असली, तरी अशी निश्चित खात्री बाळग कीं, ह्या अंधाराच्या अंतीं नवजीवनाची उज्ज्वल प्रभात उगवेलच उगवेल. )

गतिशील जीवनाचा अग्रगामी मार्ग प्रत्येकानें स्वीकारलाच पाहिजे, नाहीं तर तो जिवंत ह्या संज्ञेला पात्र ठरणार नाहीं. म्हणूनच ‘ शहाजहान ’ कवितेच्या शेवटीं रवींद्रनाथांनीं जड ताजमहालाच्या तोंडून वदवलें आहे :

जातो दूर चाइ
नाइ नाइ शे पथिक नाइ ।
प्रिया तारे राखिलो ना, राज्य तारे छेडे दिलो पथ,
रुधिलो ना समुद्रपर्वत ।
आजि तार रथ
चलियाछे रात्रिर आव्हाने
नक्षत्रेर गाने
प्रभातेर सिंहद्वार पाने ।
ताइ
स्मृतिभारे आमि पडे आछि
भारमुक्त शे एखाने नाइ ।

( मीं कितीहि दूरवर दृष्टि फेकली तरी मला तो चिर अग्रगामी शहाजहान दिसत नाहीं. प्रत्यक्ष प्रिया त्याला स्मृतिपाशांतून बांधूं शकली नाहीं. एवढें मोठें साम्राज्य त्याला अडवूं शकलें नाहीं. पृथ्वीव्यापी सागरामुळें आणि गगनचुंबी पर्वतांमुळेंहि त्याची अग्रगति रुद्ध झाली नाहीं. आज त्याचा रथ अंधाऱ्या रात्रीच्या आव्हानाचा स्वीकार करून नक्षत्रांचें उत्साहजनक संगीत ऐकत ऐकत प्रभातरूपी नवजीवनाच्या प्रवेशद्वाराकडे अविरत गतीनें निघाला आहे. म्हणूनच तो बंधनहीन शहाजहान आज इथें वास करीत नसून, पूर्व-स्मृतीनें भारावलेला मी ताजमहाल मात्र इथें जडवत् पडून आहें. )

वैचारिकतेच्या बाबतींत शेलीच्या Skylark पेक्षां सरस असलेल्या ' बलाका ' या अत्युत्कृष्ट कवितेंतहि रवींद्रनाथांना विश्वांतर्गत प्राणशक्तीच्या अमोघ अग्रगतीची निबिड अनुभूति प्राप्त झालेली दिसून येते. निःस्तब्ध सायंकाळीं क्षितिजाकडे उडत जाणाऱ्या शुभ्र बलाकापंक्तीच्या वैद्युतिक पंख-ध्वनीनें कवीची चेतना जागृत होते व त्याला चराचर विश्वांतील शोधक अग्रगतीची उन्मुखता उत्कटतेनें जाणवूं लागते.

देखितेछि आमि आजि
एइ गिरिराजि,
एइ बन चलियाछे
उन्मुक्त डानाय
द्वीप हते द्वीपान्तरे,
अजाना हइते अजानाय
नक्षत्रेर पाखार स्पंदने
चमकिछे अंधकार
आलोर क्रंदने ।
ध्वनिया उठिछे शून्य
निखिलेर पाखार ए गाने
' हेथा नय, अन्य कोथा,
अन्य कोथा, अन्य कोन खाने । '

(आज ह्या क्षणीं मला उत्कटतेनें जाणवत आहे कीं, ही जड पर्वतश्रेणी आणि वनराजी आपल्या मुक्त पंखांच्या योगानेंच की काय, विश्वाच्या अग्र-गतींत सामील झाली असून ती या अनंत अवकाशांत एका द्वीपाकडून दुसऱ्या द्वीपाकडे, गत अज्ञातांतून भावी अज्ञाताकडे उडत निघालीं आहेत. आकाशां-तील तीं असंख्य नक्षत्रेंहि अज्ञाताकडेच उडत चाललीं आहेत. नवजीवन प्रकाशाच्या शोधार्थ अज्ञाताच्या दिशेनें चाललेली चराचर विश्वाची ही अग्रगति पाहून हा गाढ अंधकारहि चकित होत आहे. चराचर विश्वाच्या अग्रगामी पंखध्वनीच्या ज्या अपूर्व गीतानें अनंत अवकाश व्यापला जात आहे, तें गीत असें—' इथें नव्हे, मग कुणीकडे अन्य कुणीकडे रे कुणीकडे ! '

पदोपदीं अडचणीवर मात करून अधिकाधिक उच्च जीवनाची प्राप्ति करून घेणें हेंच विश्वांतर्गत प्राणशक्तीचें अविरत कार्य असतांना मानवाचें ध्येयहि याव्यतिरिक्त दुसरें असूं शकत नाहीं. या ध्येयपूर्तीसाठीं आवश्यक असलेली साधना मानवाला आज निष्ठेनें करायची आहे. प्रथम महायुद्धाच्या काळीं अन्याय-अत्याचारांनीं सारी मानवजात त्रस्त झाली होती. आजच्या या अणुयुगांत तर अन्याय-अत्याचारांत भर पडून मानवजातीचें अस्तित्वहि धोक्यांत आहे. प्रथम महायुद्धाच्या काळीं मानवप्रेमी, कल्याणकामी रवींद्र-नाथांनीं अन्यायाविरुद्ध तेजस्वी लढा पुकारला, तसाच लढा आज दृढतर निष्ठेनें चालविणें भाग आहे. अशा प्रकारच्या संघबद्ध लढ्यानेंच या दारुण संकटाच्या काळीं मानवजातीचें, पर्यायानें मानवतेचें रक्षण होऊं शकेल, कल्याण होऊं शकेल.

निदारुण दुःखराते
मृत्युघाते
मानव चूर्णिलो जबे निज मर्त्यसीमा
तखनो दिबेना देखा देवतार अमर महिमा ?

( अति दारुण दुःखाच्या रात्रीं मृत्यूसमान आघात सहन करून मानव आपल्या मर्त्यसीमेवर विजय मिळवतो व तिचें उल्लंघन करतो, तेव्हां जीवन-देवतेच्या अमर महिम्याचें त्याला सत्यदर्शन होणार नाहीं का ? )

* * *

## मानवप्रीति : १२

महाकवि रवींद्रनाथांच्या विपुल वैचित्र्यपूर्ण काव्याचा स्थायीभाव: सर्वानु-भूति किंवा विश्वबोध. जलस्थलआकाशव्यापी निसर्ग व मानवी जीवन यांच्या अखंडत्वाचा आपल्या चैतन्याच्या योगानें परिपूर्ण अनुभव घेणें म्हणजेच सर्वानुभूति. या सर्वानुभूतीचें मूळ कवींद्रांच्या अद्वैतवादी मनोभूमिकेंत असून तिच्या जोमदारपणांतूनच निसर्गसौंदर्य, मानवप्रीति व भगवद्भक्ति यांची त्रिधारा त्यांच्या साऱ्या काव्यांत छंद व संगीताच्या विविध वैचित्र्यानें प्रवाहित झाली आहे. रवींद्रकाव्यांतील मानवप्रीतीचें स्वरूप इतकें उदात्त व व्यापक आहे कीं, विश्वसाहित्यांतील शेक्सपिअर, दुमा, ग्येटे यांसारख्या श्रेष्ठ मानवतावाद्यांतहि रवींद्रनाथांचा बराच वरचा क्रमांक लागेल.

निसर्गसौंदर्याच्या अनिवार ओढीबरोबरच सुखदु:खमय मानवी जीवनाशीं समरस होण्याची आकांक्षा रवींद्रनाथांच्या प्रथम पर्वांतील काव्यापासूनच दिसून येते. बाविसाव्या वर्षी रचलेल्या ' प्रभातसंगीत ' काव्यग्रंथांतील ' निर्झरेर स्वप्नभंग ' या कवितेंत वर्णन केल्याप्रमाणें, तरल कल्पना व अकारण आवेग यांच्या कारागृहांतून मुक्त झालेल्या तरुण कवीचा जोमदार भावप्रवाह निसर्गप्रेमानें व मानवप्रीतीनें उचंबळत, फेसाळत चाललेला दिसतो. या पर्वांतील ' प्राण ' या कवितेंत तरुण रवींद्रनाथ म्हणतात :

मरिते चाहिना आमि सुंदर भुवने
मानवेर माझे आमि बाँचिबारे चाइ ।

( या निसर्गसुंदर जगांत मला मरावेंसें वाटत नाहीं. सुखदु:खमय मानवी जीवनांतच वास करण्याची माझी इच्छा आहे. )

अशा कवितांमध्यें निसर्गसौंदर्याबद्दल आकर्षण व मानवी जीवनाबद्दल आपु-लकी व्यक्त होत असली, तरी अपरिणत वयांतील मोहरंजित दृष्टीमुळें व भोग-प्रवण वृत्तीमुळें त्यांत रसाविष्काराचा सखोलपणा फारसा आढळत नाहीं. प्रथम पर्वांतील मानवप्रीतिविषयक कवितांचें निरीक्षण केलें असतां वारंवार असें जाणवतें कीं, सौंदर्यदर्शी तरुण कवीची दृष्टि स्वाभाविकपणेंच देहगत सौंदर्याकडे

अनुक्रम ३९,४७८ वि. ३१५५
क्रमांक ९८३२ नों: दि: ९/३/१०/४९

विशेष आकर्षित झाली आहे. साहजिकच भावगत रसाविष्काराला गौणत्व आल्यामुळें काव्यकलेचा परिपूर्ण विकास साधलेला नाहीं. १८८७ च्या सुमारास रवींद्रनाथ जमीनदारीची देखरेख पाहण्यासाठीं वास्तव जीवनांत उतरले. वैचित्र्यपूर्ण मानवी जीवनाशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध येऊं लागला. अनुभूतीचें क्षेत्र बरेंच विस्तारलें. १८८७ ते १९०० या कालखंडांत अनुभूतीच्या विस्तृतपणामुळें त्या काळांतील ' शोनार तरी ' ( स्वर्ण-नौका ), ' चित्रा ' या काव्यग्रंथांत आपणांला रवींद्रनाथांच्या काव्यप्रतिभेचा श्रेष्ठ विलास पाहण्यास मिळतो. त्या कालखंडांतील काव्याला सर्जनशील जीवनदेवतेचें अधिष्ठान मिळाल्यामुळें निसर्ग व मानवांतील भावगत अंतर कमी होऊन मानवी जीवनाला व्यापकता लाभली आहे. कवीची अंतर्दृष्टि निसर्गसौंदर्याच्या व मानवी जीवनाच्या अंतर्लोकांत वावरूं लागल्यामुळें एकंदर सृष्टिजीवनाला अखंडत्व व चिरंतनत्व लाभलें आहे. विश्वान्तर्गत सर्जनशील चैतन्यच निसर्गांत व मानवांत प्रवाहित होतें, अशी कवींद्रांची दृढ श्रद्धा असल्यामुळें त्यांना अपूर्णतेंत पूर्णत्वाचें व सान्तामध्यें अनंतत्वाचें दर्शन होत आहे. वरवर क्षुद्र वाटणाऱ्या मानवी जीवनांत त्यांना महान् आशय गवसला आहे. सृष्टींतील चैतन्यांत ब्रह्माचें सच्चिदानंद रूपच प्रकट होतें. अशी अद्वैतवादी रवींद्रनाथांची दृढ श्रद्धा असल्यामुळें जगांतील अंशरूप जीवनाचें वैचित्र्य पाहून त्यांना उत्कट आनंद होत आहे; अत्यंत आपुलकी वाटत आहे. ' शोनार तरी ' काव्यग्रंथांतील ' वसुंधरा ' या अद्वितीय कवितेंत ही आपुलकी किती प्रभावीपणें व्यक्त झाली आहे !

इच्छा करे मने मने
स्वजाति हइया थाकि सर्व लोक सने
देशोदेशांतरे; उष्ट्र दुग्ध करि पान
मरुते मानुष हइ आरब सन्तान
दुर्दम्य स्वाधीन, तिब्बतेर गिरितटे
निर्लिप्त प्रस्तरपुरी-माझे बौद्धमठे
करि विचरण। द्राक्षापायी पारसिक
गोलाप कानवासी, तातार निर्भीक

अश्वारूढ, शिष्टाचारी सतेज जापान,
प्रवीण प्राचीन चीन निशिदिन सान
कर्म अनुरत-सकलेर घरे घरे
जन्मलाभ करे लइ हेन इच्छा करे ।

( देशोदेशीं भिन्न भिन्न जातींत जन्मून सर्व लोकांच्या जीवनांत सहभागी व्हावें, असें मला मनोमन वाटतें. वाळवंटांत जन्मून, सांडणीचें दूध पिऊन दुर्दम्य, स्वतंत्र अरब व्हावें, तिबेटच्या गिरिकंदरांत निर्लिप्त पाषाणपुरींतील बौद्धमठांत विचरण करावें, अशी मला उत्कट इच्छा होते. द्राक्षरस पिणारे, गुलाबांच्या बगीच्यांत राहणारे पारशी, अश्वारूढ निःस्पृह तातार, शिष्टाचार-दक्ष तेजस्वी जपानी, रात्रंदिवस कार्यमग्न असणारे प्रवीण प्राचीन चिनी— अशा सर्वांच्या घरोघरीं जन्माला यावें, असें मला वारंवार वाटतें. )

छोट्या-मोठ्या, भल्या-बुऱ्या माणसांच्या प्रेम, करुणा, भक्ति, त्याग इत्यादि भावनांत रवींद्रनाथांना चराचर सृष्टि व्यापणाऱ्या शिवसुंदराचें आनंदमय दर्शन होत आहे. त्या काळांतील अनेक कवितांत वरवर क्षुद्र-हीन वाटणारीं पण प्रत्यक्ष कार्यांत महान् आशय व्यक्त करणारीं माणसें आढळतात. ‘ श्रेष्ठ भिक्षा ’ कवितेंत बुद्धाच्या सेवेसाठीं आपल्या अंगावरील एकमात्र वस्त्राचा त्याग करणारी दीन दरिद्री स्त्री, ‘ पुजारिणी ’ कवितेंत बुद्धाच्या पूजेखातर प्राणत्याग करणारी बुद्धदासी श्रीमती, ‘ अभिसार ’ कवितेंत वासवदत्ता या नांवाच्या सुंदर नटीचें आमंत्रण नाकारणारा, पण दुर्धर रोगानें पछाडल्यामुळें लोकांनीं तिला गांवाबाहेर घालवल्यानंतर तिची शुश्रूषा करणारा संन्यासी उपगुप्त, ‘ देवतार ग्रास ’ कवितेंत स्वत्वासाठीं व निष्पाप मुलाला वांचवण्यासाठीं प्राणत्याग करणारा गरीब ब्राह्मण, ‘ बंदा वीर ’ कवितेंत स्वदेशासाठीं भयंकर मरण पत्करणारा शिखवीर बंदा, अशा अनेक छोट्या माणसांची महानता पाहून आपलें मन हेलावतें. प्रेम, भक्ति, करुणा, त्याग इत्यादि भावनांमुळें कवींद्रांना मानवी जीवन इतकें मधुर व महान् वाटतें कीं, त्यापुढें त्यांना प्रत्यक्ष स्वर्ग-सुखहि बेचव लागत आहे. स्वर्गांतील अपरिवर्तनीय सौंदर्यांत व अंतहीन सुखोपभोगांत त्यांना खऱ्या जीवनाचा आढळ होत नाहीं. विरहमीलनानें, सुखदुःखांनीं आंदोलित होणाऱ्या मानवी

जीवनाचेंच त्यांना आकर्षण वाटतें. 'चित्रा' काव्यग्रंथांतील 'स्वर्ग हइते विदाय' ( स्वर्गांतून प्रयाण ) या कवितेंत रवींद्रनाथ म्हणतात :

थाको, स्वर्ग, हास्यमुखे—करो सुधापान
देवगण। स्वर्ग तोमादेरि सुखस्थान,
मोरा परवासी। मर्त्यभूमि स्वर्ग नहे,
शे जे मातृभूमि, ताइ तार चक्षे वहे
अश्रुजलधारा, जदि दुदिनेर परे
केह तारे छेडे जाय दुदंडेर तरे।
जतो क्षुद्र, जतो क्षीण, जतो अभाजन
जतो पापी तापी, मेलि व्यग्र आलिंगन
शबारे कोमल वक्षे बाँधिबारे चाय-
धूलिमाखा तनुस्पर्शे हृदय जुडाय
जननीर। स्वर्गे तव बहुक अमृत,
मर्त्ये थाक् सुखे-दुःखे-अनंत मिश्रित
प्रेमधारा अश्रुजले चिरश्याम करि
भूतलेर स्वर्गखंडगुलि ॥

( स्वर्गा, तूं हंसतमुखच राहा. देवांनो, तुम्ही सुधापानच करा. स्वर्ग तुमचेंच सुखस्थान आहे. आम्ही अन्य लोकांतील माणसें आहोंत. मर्त्यभूमि स्वर्ग नव्हे, ती तर मातृभूमि ! म्हणूनच दोन दिवसांनीं थोड्या वेळासाठीं तिला कोणी सोडून गेला, तर तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहतात. क्षुद्र, क्षीण, अयोग्य, पापी, तापदायक....सर्व प्रकारच्या माणसांना उत्सुक आलिंगनानें ती आपल्या कोमल छातीशीं कवटाळूं पाहते. त्यांच्या धुळीनें माखलेल्या देहस्पर्शानें मातेचें हृदय तृप्त होतें. तुमच्या स्वर्गात अमृताच्या धारा खुशाल वाहोत. पृथ्वीवरील अनेक लहान लहान स्वर्गांना अश्रुजलानें चिरश्यामल बनवणारी अनंत सुखदुःखमिश्रित प्रेमधाराच या मर्त्यलोकांत वाहत असावी. )

करुणा-त्यागानें उदात्त व सुखदुःखमय स्नेह-प्रेमानें मधुर वाटणाऱ्या अखिल मानवी जीवनांत विश्वव्यापी शिवसुंदराचें आनंदरूपच व्यक्त होत

असल्यामुळें रवींद्रनाथांना सारीं माणसें समान दिसतात. उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, राजा-प्रजा, असले कृत्रिम भेद त्यांना मुळींच मान्य नाहींत. अशा स्वार्थी भेदांमुळें अन्याय, अत्याचार कसे वाढत आहेत, माणसांचें जीवन कसें कलुषित होत आहे, याचें प्रभावी चित्रण ब-याच कवितांत आढळतें. 'एबार फिराओ मोरे' ( परतव आतां मला ) या कवितेंत अन्याय, अत्याचार सहन करणारीं माणसें पाहून कवींद्रांचें मन किती विषण्ण झालें आहे !

ओइ जे दाँडाये नतशिर
मूक सबे, म्लान मुखे लेखा शुधु शत शताब्दिर
वेदनार करुण काहिनी, स्कंदे जतो चापे भार
बहि चले मंदगति जतो क्षण थाके प्राण तार-
तारपरे संतानेरे दिये जाय वंश वंश धरि,
नाहि भर्त्से अदृष्टेरे, नाहि निन्दे देवतारे स्मरि,
मानवेरे नाहि देय दोष, नाहि जाने अभिमान
शुधु दुटि अन्न खुँटि कोनोमते कष्टक्लिष्ट प्राण
रेखे देय बाँचाइया ।

( तीं सर्व मूक माणसें नतमस्तकानें तेथें उभीं आहेत पाहा. त्यांच्या म्लान चेहऱ्यांवर शतकानुशतकांच्या वेदनांची कहाणीच फक्त लिहिलेली आहे. खांद्यावर जेवढें ओझें चढेल तेवढें तीं प्राण असेपर्यंत मंदगतीनें वाहत असतात. त्यानंतर तें ओझें माणसें पिढ्यान् पिढ्या आपल्या वंशजांवर लादून जातात. तीं आपल्या नशिबाला बोल लावीत नाहींत. देवाला निंदत नाहींत किंवा माणसाला दोष देत नाहींत. कोणावर रुसणें, रागावणें त्यांना माहीत नसतें. फक्त दोन घांस कसेबसे मिळवून तीं माणसें मोठ्या शिकस्तीनें आपल्या कष्टजर्जर प्राणांचें रक्षण करतात. )

अशीं अन्यायजर्जर माणसें पाहून रवींद्रनाथांचें मन आपुलकीमुळें तीळ तीळ तुटत असलेलें दिसतें. अशा दीनदुबळ्यांना धीर देणें, निर्भय बनवणें आपलें कर्तव्य आहे, हें जाणून ते पुढें म्हणतात :

एइ शब मूढ म्लान मूक मुखे
दिते हबे भाषा, एइ शब श्रांत शुष्क भग्न बुके
ध्वनिया तुलिते हबे आशा; डाकिया वलिते हबे–
'मुहूर्ते तुलिया शिर एकत्र दाँडाओ देखि शबे,
जार भये तुमि भीत शे-अन्याय भीरु तोमा चेये
जखोनि जागिबे तुमि तखोनि शे पलाइबे धेये।'

(या साऱ्या मूढ म्लान व मूक मुखांतून निर्भय वाणी वदवली पाहिजे. या साऱ्या श्रांत, शुष्क व भग्न हृदयांत आशेचा संचार केला पाहिजे. या साऱ्या माणसांना बोलावून तुम्ही सारे निर्भयपणें संघबद्ध होऊन उभें राहा पाहूं! ज्या अन्यायाला तुम्ही भितां तो तुमच्यापेक्षां भित्रा आहे. तुम्ही जागृत होतांच तो कोठल्या कोठें पळून जाईल.)

कारण, करुणामय परमेश्वर गरिबांचा, श्रमिकांचा पक्षपाती आहे, अशी कवींद्रांची श्रद्धा आहे. 'गीतांजली'त त्यांनीं स्पष्टच म्हटलें आहे कीं, परमेश्वर मंदिरांत राहत नसून निर्माणकार्य करणाऱ्या श्रमिकांच्या बरोबरीनें राबत असतो. 'दीनेर संगी' या गीतांत कवींद्र गातात :

जेथाय थाके शबार अधम दीनेर हते दीन
शेइखाने जे चरण तोमार राजे—
शबार पिछे, शबार निचे, शब हारादेर माझे।

(जेथें सर्वांहून अधम, दीनाहून दीन माणसें राहतात तेथें सर्वांच्या मागें सर्वांत शेवटीं सर्वस्वहीन कंगालांमध्यें तुझे पवित्र चरण विराजत असतात.)

अन्यायदलितांनीं जसें निर्भय, तेजस्वी बनलें पाहिजे, तसें इतरांनीं आपल्या अनुभूतीचें क्षेत्र उन्नत, विस्तृत केलें पाहिजे. सर्व सृष्टींत आदि-सत्याचें चैतन्यमय आनंदरूप व्यक्त झालें असल्यामुळें प्रत्येक मनुष्य त्या मूळ अखंड सत्याचा अंश आहे. देशकालबद्ध सीमित मनुष्य संकुचितपणा निर्माण करणाऱ्या अहंकारावर जसजसा विजय मिळवील व निःस्वार्थी बनेल, तसेंच प्रेमाच्या कार्याच्या क्षेत्रांत सार्वत्रिक मैत्रीची व व्यापक हिताची तो जस-

जशी अधिक साधना करील, तसतशी त्याला जीवबद्ध मानवांतील विश्व-मानवाची अधिक अनुभूति लाभेल. संसारबद्ध मानवाचा उन्नत, विशाल अंश म्हणजेच विश्वमानव. या विश्वमानवाच्या आदर्शामुळेंच रवींद्रनाथांनी विश्वमैत्रीचा व मानवकल्याणाचा महान् संदेश जगाला दिला आहे.

मानवकल्याणाच्या ध्येयमार्गांत येणारीं विघ्नें म्हणजे द्वेष-शोषणादि अन्याय-अत्याचार. रवींद्रनाथांच्या जीवनांत आपणांला पहिल्यापासून अखेरपर्यंत असेंच आढळतें कीं, अन्याय करणाऱ्यांचा त्यांनीं नेहमीं तीव्र शब्दांत धिक्कार केला आहे व अन्याय सोसणाऱ्यांबद्दल सहानुभूति व्यक्त केली आहे. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत त्यांनीं हिंसेच्या उन्मत्त तांडवनृत्याचा वारंवार निषेध केला आहे. ' आरोग्य ' ( १९४१ ) काव्य-ग्रंथांतील ' ओरा काज करे ' ( ते काम करतात ) या कवितेंत युद्धपिपासु साम्राज्यवादी इंग्रजांना रवींद्रनाथांनीं स्पष्टच बजावलें आहे कीं, भूतकाळां-तील पठाण व मोगलांच्या साम्राज्यांप्रमाणें तुमचेंहि साम्राज्य केव्हां ना केव्हां धुळीला मिळेल आणि त्या धुळीवर निर्माणकार्य करणारा श्रमिक शेतकरीच शेवटीं विजयी होईल. ' जन्मदिने ' काव्यग्रंथांतील एका तेजोगर्भ कवितेंत कवींद्र म्हणतात :

ए कुत्सित लीला जबे हवे अवसान
बीभत्स तांडवे
ए पापजुगेर अंत हबे,
मानव तपस्वी वेशे
चिताभस्म-शय्यातले एशे
नवसृष्टि ध्यानेर आसने
स्थान लबे निरासक्त मने,
आज सेइ सृष्टिर आव्हान
घोषिछे कामान ।

( युद्धाची ही ओंगळ नृत्यलीला जेव्हां संपेल, बीभत्स तांडवांत या पाप-युगाचा जेव्हां अंत होईल, तेव्हां मानव तपस्वी वेशानें चिताभस्माच्या

शय्येजवळ येऊन नवसृष्टीच्या ध्यानासनावर निरासक्त मनानें स्थानापन्न होईल. त्याच नवसृष्टीचें आव्हान आज तोफेच्या मुखांतून घोषित होत आहे.)

मृत्यूपूर्वीच्या या कवितांत नवनिर्मिति करणाऱ्या चिरंतन मानवाचा विजयच स्पष्टपणें सूचित झाला आहे. कवींद्र रवींद्रनाथांनीं आपल्या विपुल काव्यांत जागोजागीं व्यक्त केलेल्या उत्कट मानवप्रीतीचाच हा विजय आहे.

* * *

# अंतिम काव्यधारा : १२

Rabindranath...is the great model of the full-grown oecumenic Indian of centuries to come. In this he should mean much the same to India as Goethe has meant and means to Germany.

—हेर्मान काय्‌जरलिंग्

भावी जर्मन राष्ट्राची बलिष्ठता व तेजस्विता महाकवि ग्येटेमध्यें मूर्तिमान् झाली होती. त्याप्रमाणें कवींद्र रवींद्रनाथहि भारताच्या श्रेष्ठत्वाचें प्रतीक होत. 'स्वदेश आत्मार वाणीमूर्ति तुमि' असें रवींद्रनाथांनीं कवीचें जें वर्णन केलें आहे, तें त्यांच्या स्वतःच्या बाबतींतहि तंतोतंत लागू पडतें. विश्वमैत्रीच्या विचारांतून व कार्यांतून चिरंतन मानवाची महानता वारंवार घोषित करून त्यांनीं भारतीय संस्कृतीची मर्मवाणीच साऱ्या जगाला निवेदन केली आहे. या दृष्टीनें १९३९ ते ४१ या कालखंडांत लिहिलेल्या त्यांच्या 'नवजातक', 'सनई', 'रोगशय्या', 'आरोग्य', 'जन्मदिने' व 'शेषलेखा' या महत्त्वाच्या काव्य-ग्रंथांचें थोडक्यांत अवलोकन करणें उपयुक्त ठरेल.

रवींद्रनाथांच्या जीवनव्यापी साधनेचें मूलसूत्र विश्वमैत्री हें होतें, पण दुर्दैव असें कीं, आयुष्याच्या अखेरीला सारें जग दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वालांनीं पेटत असलेलें त्यांना पाहावें लागलें. त्या वेळीं त्यांचें मन क्षुब्ध झालें असल्यास

नवल नाहीं. 'सभ्यतेचें संकट' या प्रसिद्ध निबंधांत त्यांनीं पाश्चिमात्य साम्राज्यशाहीवर कडक टीका केली आहे. त्यांत ती साम्राज्यशाही भारताचा, चीनचा, किंबहुना साऱ्या जगाचा कसा सर्वनाश करीत आहे, ह्याचें त्यांनीं विदारक चित्र रंगविलें आहे. तथाकथित पाश्चिमात्य सभ्यता रानटीपणानें कशी उन्मत्त झाली आहे, हें त्या निबंधांत व मिस् रॅथ्बोनला दिलेल्या उत्तरांत जहाल भाषेनें कथन केलें आहे, तरी पण त्या प्रबंधांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, इतकें सगळें असलें तरी मनुष्यावरील विश्वास ढळणें हें पाप आहे. हा विश्वास मी अखेरपर्यंत कायम राखीन. कारण—

राजछत्र भेंगे पडे, रणडंका शब्द नाहि तोले
जयस्तंभ मूढसम अर्थ तार भोले
रक्तमाखा अस्त्र हाते जतो रक्त-आँखि
शिशुपाठ्य काहिनीते थाके मुख ढाकि,
शत शत साम्राज्येर भग्नशेष परे
ओरा काज करे ।

(विधात्याच्या नियमानें राजछत्रें मोडून पडतात. रणडंके निःशब्द होतात. जयस्तंभ अर्थहीन होऊन जातात. हातांत शस्त्रें घेतलेले, डोळे लाल झालेले चेहरे तर लहान मुलांच्या गोष्टींच्या पुस्तकांत लपून राहतात. अशा प्रकारच्या शेंकडों साम्राज्यांच्या भग्न अवशेषांवर सर्वकालीन मानवच टिकून राहतो व नेहमीं जीवनोपयोगी कार्य करीत असतो.)

'नवजातक' काव्यग्रंथांत रवींद्रनाथ म्हणतात :

अपूर्ण शक्तिर एइ विकृतिर सहस्र लक्षण
देखियाछि चारिदिके सारा क्षण
चिरंतन मानवेर महिमारे तबु
उपहास करि नाइ कभु ।
प्रत्यक्ष देखेछि जथा
दृष्टिर सम्मुखे मोर हिमाद्रिराजेर समग्रता

गुहागह्वरेर जतो भांगाचोरा रेखागुलो तारे
पारे ना विद्रुप करिबारे,
जतो किछु खंड निये अखंडेरे देखेछि तेमनि
जीवनेर शेष काव्ये आजि तारे दिवो जयध्वनि ।

(अपूर्ण शक्तीमुळें निर्माण झालेल्या विकृतींचीं अनेक लक्षणें मला नेहमीं जागोजाग आढळलीं, तरी चिरंतन मानवाच्या जीवनमहिम्याचा मीं कधीं उपहास केला नाहीं. लहान-मोठ्या भेगांमुळें, गुहांच्या पोकळ्यांमुळें हिमालयाच्या विराटतेला जसा कमीपणा येत नाहीं, त्याप्रमाणें खंडित अवस्थेंत ज्या अखंड जीवनप्रवाहाचें प्रभावी स्वरूप मी पाहत आलों आहें, त्याचा आज मुक्तकंठानें जयजयकार करतों.)

चारी बाजूंना दिसणाऱ्या ध्वंसलीलेमध्यें रवींद्रनाथांना नवयुगाच्या आगमनाची पूर्वसूचना स्पष्ट दिसत होती. 'नवजातक' काव्यांत त्याच महान् नवजीवनाचा त्यांनीं जयजयकार केला आहे.

नंतरच्या 'सनई' काव्यग्रंथांत त्यांनीं प्रमुखतः जीवनसंगीताविषयीं काव्य-रचना केली आहे. जीवनाच्या वैचित्र्यांत, पदोपदीं आढळणाऱ्या असंबद्धतेंत-सुद्धां जीवनसंगीताच्या रागिणीचा अखंड सूर प्रवाहित होत आहे.

मने हय, विश्वेर जे मूल उत्स हते
सृष्टिर निर्झर झरे शून्ये कोटि कोटि स्रोते
ए रागिणी सेथा हते आपन छंदेर पिछु पिछु
निये आसे वस्तुर अतीत किछु
हेन इंद्रजाल
जार सूर जार ताल
रूपे रूपे पूर्ण हये उठे
कालेर अंजली पुटे

(विश्वाच्या ज्या मूळ उगमापासून ही सृष्टि अनंत धारांनीं प्रवाहित होत आहे, त्या मूळ उगमापासूनच अखंड झंकृत होणाऱ्या ह्या रागिणीच्या

विचित्र छंदामागें अव्यक्ताची रहस्यमयता असून, तिच्या स्वरछंदात्मक स्वरूपाची कालाच्या ओघांत पूर्णतर परिणति होत असते, असें दिसून येतें.)

या रागिणीच्या कार्याबद्दल रवींद्रनाथ पुढें म्हणतात :

मने भावि, एइ सूर प्रत्यहेर अवरोध परे
जतो बार गम्भीर आघात करे
ततो बार धीरेधीरे किछु किछु खुले दिये जाय
भावी-युग-आरंभेर अजाना पर्याय
निकटेर दुःखद्वंद्व, निकटेर अपूर्णता ताई
शब भूले जाइ......

(मला वाटतें, या रागिणीच्या स्वरप्रभावानें दैनंदिन विरोध कमी होत होत भावी युगाच्या आरंभाची सूचना स्पष्ट-स्पष्टतर होते. आपलीं सारीं दुःखें, द्वंद्वें व अपूर्णता भावी कालाकडे लक्ष देऊन आपण विसरून जातों.)

अशा प्रकारच्या क्रमवर्धमान अवस्थेंतच मानवी जीवनाला तात्पर्यपूर्ण एकतानता प्राप्त होत असते.

'सनई' नंतरचे 'रोगशय्या', 'आरोग्य', 'जन्मदिने', 'शेषलेखा' असे काव्यग्रंथ आहेत. द्वितीय महायुद्धकाळीं सर्वत्र रोगजीर्णतेचें व मृत्यूचें भयानक नृत्य पाहत असतांना अमर मानवाच्या अखंड जीवनाबद्दलचा विश्वास रवींद्रनाथांनीं प्रकट केला. त्या वेळीं त्यांच्या स्वतःच्या जीवनांतहि मृत्यूची कृष्णछाया दाटत होती, पण दृढविश्वासाच्या बळावर त्यांनीं रोगग्रस्त शरीराच्या वेदनांची पर्वा केली नाहीं. कारण—

एमन उपेक्षा मरणेरे
हेन जययात्रा
वह्निशिखा माडाइया दले दले
दुःखेर सीमान्त खुँजिबारे...

मृत्यूची उपेक्षा करून, चिताग्नीच्या ज्वाला पायदळीं तुडवून त्यांना दुःखातीत जीवनाची जययात्रा आरंभावयाची होती. मृत्यूपलीकडील अमृत-

जीवनाबद्दल त्यांच्या अद्वैती मनाला दृढविश्वास वाटत होता. आसन्नमृत्यूच्या पार्श्वभूमीवर रवींद्रनाथांना अमृतजीवनाचें शाश्वत रूप उज्ज्वलतर दिसूं लागलें:

एइ घन आवरण उठे गेले
अविच्छेदे देखा दिबे
देशहीन कालहीन आदिज्योति
शाश्वत प्रकाश पारावार
सूर्य जेथा करे संध्यास्नान
जेथाय नक्षत्र जतो महाकाय बुद्बुदेर मतो
उठितेछे फुटितेछे
शेथाय निशांते जात्री आमि
चैतन्यसागर तीर्थपथे ।

( हें घन आवरण गळून गेल्यावर, देशहीन, कालहीन अशा चैतन्याच्या आदिज्योतीचें महादर्शन घडेल. सूर्य जिथें संध्यास्नान करतो, असंख्य नक्षत्रें जिथें विशाल बुडबुड्याप्रमाणें प्रकट होतात व विकसतात, अशा चैतन्यसागराच्या तीर्थयात्रेला मी दुःखरूपी रात्रीनंतरच्या पवित्र उषःकालीं शाश्वत प्रकाशमार्गानें जाईन. )

मृत्यूच्या भयानकतेनें साधारण मनुष्याला जीवनाबद्दलच अविश्वास वाटूं लागतो. अनिश्चिततेच्या विचारांनीं मनाला उदासीनता, विषण्णता येते. पण रवींद्रनाथांचें जीवन अतिशय तेजस्वी होतें. " Goethe's immortal words ' eternal urge and unceasing exertion ' have been actually realised in Rabindranath Tagore. " डॉइश् ॲकॅडेमीचे अध्यक्ष थिओडोर फॉन् विंटेरस्टाइन् यांचे हे उद्गार अगदीं यथार्थ आहेत. अशा प्रकारच्या तेजस्वितेमुळेंच ते मृत्यूबद्दल निर्भय होते. ते धीरगंभीर वाणीनें म्हणाले :

ए जीवने सुंदरेर पेयेछि मधुर आशीर्वाद
मानुषेर प्रीतिपात्रे पाइ ताँरि सुधार आस्वाद

दुःसह दुःखेर दिने
अक्षत अपराजित आत्मारे लयेछि आमि चिने
आसन्न मृत्युर छाया जे दिन करेछि अनुभव।
सेदिन भयेर हाते हयनि दुर्बल पराभव।

(ह्या जीवनांत मला शिवसुंदरस्वरूपी परमात्म्याचा मधुर आशीर्वाद लाभला आहे. मीं त्या परमतत्त्वाच्या अमृतरसाचा आस्वाद मानवाच्या प्रीतिरूपानें घेतला आहे. दुःसह दुःख भोगतांना मला आत्म्याच्या अपराजयतेची ओळख पटली आहे. म्हणूनच कीं काय माझ्या जीवनांत मृत्यूची छाया पडली, तेव्हां भीतीनें घाबरून मी पराभूत झालों नाहीं.)

अद्वैतवादी रवींद्रनाथ मृत्यूच्या भयानें विचलित न होतां, उलट ह्या पृथ्वीवरील चराचर जीवनाचा महिमा पटून 'आरोग्य' काव्यग्रंथांत नम्रपणें म्हणतात :

शेषस्पर्श निये जबे जावो धरणीर
बले जावो तोमार धुलिर
तिलक परेछि भाले,
देखेछि नित्येर ज्योति दुर्योगेर मायार आडाले।
सत्येर आनंदरूप ए धूलिते नियेछे मुरति
एइ जेने ए धुलाय राखिनु प्रणति।

(ह्या पृथ्वीचा अखेरचा स्पर्श अनुभवून चिरप्रयाण करतांना मी म्हणेन, 'हे प्रिय भूमिमाते, तुझ्या पवित्र धूलीचा तिलक मीं भालप्रदेशीं धारण केला आहे. ह्या जीवनांत माझ्यावर दुःखसंकटरूपी मायेचीं जीं आक्रमणें झालीं, त्यामागें मीं परमचैतन्य-ज्योतीचा प्रकाश अनुभवला आहे. आदि-सत्य ह्या धूलींतच आनंदरूपानें अवतरलें आहे, हें मनोमनीं जाणून मी आज ह्या धूलीलाच माझें अखेरचें वंदन अर्पण करतों.')

अशा प्रकारची मानसिक समता व निर्भयता हेंच खरें आरोग्य होय. असें आरोग्य लाभलें तरच नवजन्मदिनाचा लाभ झाला, असें म्हणतां येईल. हा नवजन्म म्हणजे आत्मिकतेची नवी अनुभूति होय. ह्या अनुभूतीच्या

योगानेंच रवींद्रनाथ पूर्णत्वाची साधना करीत होते. तें पूर्णत्व 'यद्वाचानभ्युदितम्' किंवा 'यतो वाचो निवर्तन्ते' अशा स्वरूपाचें आहे. म्हणून 'जन्मदिने' काव्यग्रंथांत रवींद्रनाथ म्हणतात :

आज शब कथा
मने हय शुधु मुखरता
तारा एशे थामियाछे
पुरातन शे मंत्रेर काछे
ध्वनिते छे जाहा शेइ नैशब्दय चुडाय
सकल संशय तर्क जे मौनेर गभीरे फुराय।

(आज सारें बोलणें मला व्यर्थ बडबडीप्रमाणें वाटत आहे. कारण ज्यामध्यें सारे संशय, तर्ककुतर्क लोप पावतात, त्या मौनाच्या ठिकाणीं अखंड ध्वनित होणाऱ्या चिरंतन महामंत्रापाशीं सारा शब्दसंभार लीन झाला आहे.)

एकंदरींत आपल्याला असें आढळतें कीं, महायुद्धाच्या तांडवानें किंवा मृत्यूच्या भयानें रवींद्रनाथ अमृतत्वाच्या साधनेपासून ढळले नाहींत; उलट मृत्यूच्या पार्श्वभूमीवर शाश्वत जीवनाबद्दलचा त्यांचा विश्वास दृढतरच झाला. खऱ्या अद्वैती वृत्तीनें त्यांनीं जीवनांतील सुखदुःखांना मायेचा खेळ म्हटलें आहे. 'शेषलेखा' काव्यग्रंथांत मृत्यूच्या पूर्वीं आठच दिवस (म्हणजे ३०-७-४१ रोजीं) रचलेल्या 'तोमार सृष्टिर पथ' या अखेरच्या कवितेंत रवींद्रनाथ म्हणतात :

अनायासे जे परेछे छलना सहिते
से पाय तोमार हाते
शांतिर अक्षय अधिकार।

मायेनें जीवनांत पदोपदीं चालवलेली वंचना जो अविचलित मनानें सहन करतो तोच, हे छलनामयि, तुझ्या हातून शांतीचा अक्षय अधिकार प्राप्त करून घेतो.

* * *

# काहीं आक्षेप : १४

पंचेचाळीस वर्षांपूर्वी १९१३ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत 'गीतांजली'-ला नोबेल पारितोषिक मिळतांच रवींद्रकाव्याला जागतिक मान्यता प्राप्त झाली. नंतरच्या काळांत रवींद्रनाथांना जी सार्वत्रिक लोकप्रियता लाभली, ती सर्वस्वी त्यांच्या काव्यगुणांवर आधारली नसून तिच्यांत रवींद्रनाथांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचाहि मोठा वांटा आहे, हें प्रामाणिकपणें कबूल केलें पाहिजे. कारण वस्तुस्थिति अशी आहे कीं, रवींद्रनाथांच्या चहात्यांमध्यें त्यांच्या काव्याचा नियमित आस्वाद घेणारे किंवा अभ्यास करणारे थोडेच. बहुतेकांच्या बाबतींत रवींद्रकाव्याची प्रशंसा करणें ही एक 'फॅशन' झाली आहे. जे थोडे चहाते रवींद्रकाव्याचा आस्वाद घेण्याचा मनापासून प्रयत्न करतात, त्यांपैकीं बहुतेकांना अनुवादित काव्यग्रंथांवर विसंबून राहावें लागतें. बंगाली भाषा येत नसल्यानें ते मूळ रवींद्रकाव्याची गोडी चाखूं शकत नाहींत. हें झालें रवींद्रकाव्याच्या चहात्यांबद्दल. रवींद्रकाव्यांत दोष शोधून काढणारे अ-बंगाली चिकित्सकहि आपणांला मधून मधून आढळतात, पण चहात्यांप्रमाणें या चिकित्सकांचें रवींद्रकाव्यविषयक ज्ञानहि बहुतेक वेळां अपुरें असतें—अनुवादित काव्यग्रंथांवर आधारलेलें असतें. रवींद्रकाव्यावर जे आक्षेप घेतले जातात, त्यांपैकीं महत्त्वाच्या अशा एक-दोन आक्षेपांचें येथें थोडक्यांत विवेचन करण्याचें योजिलें आहे.

अ-बंगाली मंडळींत रवींद्रनाथांचें श्रेष्ठत्व मान्य करूनहि वारंवार रवींद्र-काव्यावर असा आक्षेप घेतला जातो कीं, त्यांचें काव्य बरेंचसें दुर्बोध आहे. या आक्षेपाचें समर्थन करण्यासाठीं रवींद्रांच्या सर्वमान्य काव्यग्रंथाचा इंग्रजी 'गीतांजली'चाच बहुधा आधार घेण्यांत येतो. मूळ बंगाली 'गीतांजलि' रवींद्र-नाथांनीं रचली; तिचें इंग्रजी भाषांतरहि त्यांनींच केलें, त्या अर्थीं मूळ बंगाली 'गीतांजली'हि इंग्रजीप्रमाणें दुर्बोध असावी, असा सरळ निष्कर्ष काढला जातो. पण बंगाली 'गीतांजलि' व इंग्रजी 'गीतांजलि' या दोहोंत किती फरक आहे, हें दोन्ही काव्यें लक्षपूर्वक ताडून पाहणाराला सहज दिसून येतें. बंगाली 'गीतांजलि' वाचतांना अशी जाणीव होते कीं, या श्रेष्ठ काव्याचें दुसऱ्या भाषेंत

यशस्वी भाषांतर होणें केवळ दुरापास्त आहे. आपण जी इंग्रजी 'गीतांजलि' वाचतों, ती स्वतः रवींद्रनाथांनीं भाषांतरित केली म्हणून एवढी तरी चांगली झाली आहे; दुसऱ्या कोणाला तेंहि जमलें नसतें. स्वतः रवींद्रनाथच म्हणत कीं, खरें रसग्रहण करायचें असेल, तर बंगाली 'गीतांजली'च वाचली पाहिजे. भाषांतरावरच अवलंबून राहायचें असेल, तर इंग्रजी काय, चिनी काय, दोन्ही सारखीच! आशय, ध्वनि, छंद, वगैरे बाबतींतलें अपूर्व सौंदर्य बंगाली 'गीतांजलीं'तच पूर्णपणें पाहण्यास मिळतें. दुर्बोधतेच्या दृष्टीनें विचार करायचा झाला तर श्रेष्ठ काव्याचा निदर्शक असणारा प्रसाद हा गुणहि बंगाली 'गीतांजलीं'त पुरेसा न आल्यामुळें किंवा तसा तो येऊं शकत नसल्यामुळें, इंग्रजी 'गीतांजलि' विशेष दुर्बोध वाटते. बंगाली 'गीतांजलीं'त दुर्बोधता मुळींच नाहीं, असा याचा अर्थ नव्हे. पण ही दुर्बोधता अभिव्यक्तीच्या दोषामुळें किंवा हेतुपुरस्सर आलेली नसून ती आशयाच्या व ध्वनीच्या गूढतेमुळें आलेली आहे. एका पाश्चात्य टीकाकाराच्या शब्दांत सांगायचें तर ही दुर्बोधता आविष्कारांतील काठिण्यामुळें आलेली (Obscurity of expression) नसून, कठिण आशय शब्दबद्ध करण्याच्या प्रयत्नांतून (Expression of obscurity) निर्माण झालेली आहे, असें म्हणतां येईल. फक्त 'गीतांजली'चेंच नव्हे तर एकंदर रवींद्रकाव्याचें यथार्थ रसग्रहण करण्यासाठीं रवींद्रनाथांची तात्त्विक भूमिका नीट समजून घेणें अत्यंत आवश्यक आहे. बालपणापासूनच त्यांच्यावर उपनिषदाधिष्ठित तात्त्विकतेचे संस्कार झाल्यामुळें व वैष्णवादि संतकाव्याचा त्यांच्यावर बराच प्रभाव पडल्यामुळें उपनिषदांत व संतकाव्यांत वारंवार आढळणारें गूढगुंजन (Mysticism) बंगाली 'गीतांजलीं'तहि जागोजाग दिसून येतें. प्रासादिक संतकवि म्हणून प्रसिद्ध असलेल्या तुकारामांच्या कित्येक अभंगांत आपणांला थोडेंफार गूढगुंजन आढळतेंच कीं नाहीं? निष्कर्ष असा कीं, विश्वाच्या व विश्वातीताच्या, सान्ताच्या व अनंताच्या रहस्यमयतेंत, सत्यानुभूतीसाठीं धडपडणाऱ्या साधकाच्या काव्यरचनेंत अज्ञेयाच्या, अव्यक्ताच्या कलात्मक प्रकटीकरणाचा तो उत्स्फूर्त प्रयत्न असल्यामुळें थोडेंफार गूढगुंजन अपरिहार्यच असतें. अंशामध्यें पूर्णत्व, भिन्नत्वांत एकत्व पाहणाऱ्या आणि सृजनशील 'जीवन-देवते'ला 'रहस्यमधुरा', 'छलनामयी' अशा शब्दांनीं संबोधणाऱ्या अद्वैतवादी रवींद्रनाथांच्या काव्यांत गूढगुंजन आढळणें अगदीं

स्वाभाविक आहे. गूढगुंजनामुळें वेद, उपनिषदें किंवा संतकाव्यें कमी दर्जाची ठरत नसतांना रवींद्रकाव्याच्या बाबतींतच दुर्बोधतेचा आक्षेप घेणें अप्रस्तुत ठरतें. उलट असेंहि म्हणतां येईल कीं, रहस्यमयतेमुळें रवींद्रकाव्य गूढरम्य झालें आहे, जास्तच चित्ताकर्षक झालें आहे.

सौंदर्यवादाचा ( Aestheticism ) व तज्जनित दुर्बलतेचा आक्षेप दुर्बोधतेच्या संदर्भात येणारा असून तो जास्त महत्त्वाचा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तर भागांत फ्रान्स व इंग्लंडमधील साहित्यांत सुरू झालेलें 'सौंदर्यवादी' युग सर्वांच्या माहितीचें आहे. बोदलेअर, स्विनबर्न, ऑस्कर वाइल्ड यांसारखे केवलकलावादी साहित्यिक 'कलेसाठीं कला' या ध्येय-वाणीनें सौंदर्यवादाचा पुरस्कार करीत होते. जीवनाच्या वास्तवतेकडे पाठ फिरवून देशकालातीत स्वप्नलोक निर्माण करून केवळ रुचिविलासांत, सौंदर्य-विलासांत रममाण होणारे ते जीवनविमुख साहित्यिक नंतर टीकेला पात्र झालेले दिसतात. त्या सौंदर्यवादी युगाला 'क्षयिष्णु युग' ( Decadent age ) असेंहि म्हटलें जातें. त्या काळीं तरुण रवींद्रनाथांवरहि वरील मतवादाचा कांहींसा प्रभाव पडला होता. 'कडिओ कोमल', 'मानसी' या काव्य-ग्रंथांतील कांहीं कवितांत रुचिविलासाचा, सौंदर्यविलासाचा अतिरेक आपणांला जागोजाग आढळतो. रुचिविलासामुळें अभिव्यक्तींतहि अस्वाभाविक कोमलता, तरलता बरीच शिरली होती, ही गोष्ट खोटी नाहीं. पण ती अवस्था तात्पुरती होती, हेंहि तितकेंच खरें. कारण रवींद्रनाथांची मूळ बैठकच सत्यानुभूतीची होती. शिवाय १८८८ सालापासून ऐन तारुण्यांत जमीनदारीच्या देखरेखीची जबाबदारी पडल्यामुळें व नंतर शांतिनिकेतन विद्यालयाचें कार्य सुरू केल्या-मुळें त्यांच्या काव्याला वास्तवतेचें पक्कें अधिष्ठान प्राप्त झालें आहे. रवींद्र-नाथांचें सौंदर्यप्रेम त्यांच्या काव्यांत सर्वत्र व्यक्त होत असलें, तरी त्यांचे बहुतेक सर्व काव्यग्रंथ आशयगत किंवा अभिव्यक्तिगत दुर्बलतेपासून मुक्त असून, उलट त्यांत आपणांला उन्नत तेजस्वी जीवनाचें, उदार मानवतेचें जागोजाग दर्शन होतें. असें असूनहि रवींद्रकाव्यावर रमणीसुलभ दुर्बलतेचा आक्षेप घेणारे जे थोडेफार चिकित्सक आहेत त्यांत सुप्रसिद्ध उर्दू कवि इकबालांच्या चहात्यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. डॉ. इकबालांचा 'खुदीवाद' पुष्कळांना माहीत आहे. 'खुदी' म्हणजे व्यक्तित्व. स्वतःच्या

व्यक्तित्वाचा जास्तींत जास्त विकास करा, असें खुदीवाद सांगतो. मनुष्याच्या व्यक्तित्वाचा तसा विकास झाला कीं, प्रत्यक्ष परमेश्वरहि मानवाच्या इच्छे-प्रमाणें वागेल. इकबालाच्याच शब्दांत सांगायचें तर ' खुदीको कर बुलंद इतना कि हर तकदीरसे पहले खुदा बंदसे खुद पूछे, बता तेरी रिजा क्या है '— या मताचा पुरस्कार करणारे इकबालभक्त रवींद्रकाव्याचा, विशेषतः गीतांजलीचा आधार घेऊन असा निष्कर्ष काढतात कीं, परमेश्वराची खुशामत करणारें दासत्व पत्करणारें, त्याची करुणा भाकणारें, तसेंच दुरून प्रेम-निवेदन करणारें, सौंदर्याचा दुरूनच आस्वाद घेणारें रवींद्रकाव्य आशयाच्या दृष्टीनें पौरुषहीन आहे, अभिव्यक्तीच्या दृष्टीनेंहि दुबळें आहे.

आशयाच्या दृष्टीनें पाहतां हा आक्षेप हास्यास्पद वाटतो. विश्वाची व्यापकता, सृष्टिलीलेची रहस्यमयता पाहून कोणाचें मन विस्मयित होणार नाहीं, विनम्र होणार नाहीं? ब्रह्मस्वरूपाची अनुभूति लाभलेला साधक विश्वनियंत्याच्या चरणीं भक्तीनें लीन झाला नाहीं, तरच नवल. या अफाट विश्वांत वाळूच्या कणाहूनहि तुच्छ असणाऱ्या मनुष्यप्राण्याच्या व्यक्ति-त्वाच्या अहंमन्य वल्गना हास्यास्पदच वाटतात. अहंकारी खुदीवाद रवींद्र-नाथांना मान्यच होऊं शकत नाहीं ' गीतांजली 'तील गीतांत त्यांनीं संकुचित-पणा निर्माण करणाऱ्या अहंकाराचा जागोजाग निषेध केला आहे. प्रेममय परमेश्वरस्वरूपाशीं एकरूप होण्याची तळमळ त्यांनीं व्यक्त केली आहे. ' पर्सनॅलिटी ' ग्रंथांत रवींद्रनाथ स्पष्टच म्हणतात :

" The whole object of man is to free his personality of self into the personality of soul, to turn his inward forces into the forward movement towards the infinite, from the contraction of self in desire into the expansion of soul in love. "

ईश्वरनिष्ठ भक्ताच्या दृढ श्रद्धेंत, तितीक्षेंत, त्यागी वृत्तींत, आत्मविलोपवृत्तींत बलाचा अभाव आहे, असें कोणता सुज्ञ म्हणेल? निव्वळ दैहिक बल पाशवी असल्यामुळें आत्मिक बलांतच सुसंस्कृतपणा व्यक्त होत असतो, आत्मिक

बळाच्या जोपासनेखातरच रवींद्रनाथ ' गीतांजली 'तील ' आत्मत्राण ' कवितेंत म्हणतात :

विपदे मोरे रक्खा करो
ए नहे मोर प्रार्थना
विपदे आमि ना जॅनो करि भय।

( परमेश्वरा, संकटकाळीं माझें रक्षण कर, अशी प्रार्थना मी करीत नाहीं. संकटें कोसळत असतांना माझें मन निर्भय असावें, एवढीच माझी इच्छा आहे. )

तसेंच पुढील ब्रह्मसंगीतांतील दृढता, तेजस्विता कोण नाकारूं शकेल ?

जदि दुःखे दहिते हय
तबु नाहि भय, नाहि भय।
जदि दैन्य वहिते हय,
तबु नाहि भय, नाहि भय।
जदि मृत्यु निकट हय
तबु नाहि भय, नाहि भय।
जय जय ब्रह्मेर जय।

( दुःखांत होरपळावें लागलें, दैन्य सोसावें लागलें, प्रत्यक्ष मृत्यु समोर उभा राहिला तरी भयभीत होण्याचें कांहींच कारण नाहीं. ब्रह्माचाच सर्वत्र विजय होतो. )

सौंदर्यास्वादाच्या व प्रेमनिवेदनाच्या बाबतींतहि सुसंस्कृत रसिकाची वागणूक संयम, तितिक्षा, त्याग यांनींच व्यक्त होत असते. आधुनिक काळांत प्रेमनिवेदनाच्या कामीं कोणी ' नाइट् एरान्ट्री 'चा उपयोग करील तर तो आडदांड, रानटीच ठरेल. एकंदरींत आशयाच्या दृष्टीनें पाहतां रवींद्रकाव्यावरील पौरुषहीनतेचा आक्षेप टिकूं शकत नाहीं.

अभिव्यक्तीच्या दुबळेपणाच्या आक्षेपाचा विचार करणें आवश्यक आहे. अभिव्यक्तीला पोषक अशी शब्दरचना व छंद योजण्यांत रवींद्रनाथांनीं नेहमींच असाधारण निपुणता दाखवली आहे. त्यांची भाषा जशी विरह-

व्यथेनें जागोजाग अश्रुकातर झालेली दिसते, विनयशीलतेनें लज्जानम्र नव-वधूप्रमाणें स्निग्ध, कोमल झालेली आढळते, तशी ती वारंवार महनीयतेनें उदात्त, श्लेष-उपहासानें तीक्ष्ण, कठोर, क्रोधानें, घृणेनें तीव्र खणखणीत बनलेली दिसते.

'गीतांजळीं'तील 'भारततीर्थ' कवितेंत—

हे मोर चित्त, पुण्यतीर्थे
जागोरे धीरे
एइ भारतेर महामानवेर
सागरतीरे।

(हे माझ्या मना, महान् भारताच्या मानवरूपी सागराच्या उदार तीरावरील या पवित्र तीर्थस्थानीं जागृत हो !)

या काव्यपंक्तींतील उदात्तता कोण नाकारूं शकेल? 'गीतांजलीं'तील 'अपमानित' कवितेंत—

हे मोर दुर्भागा देश
जादेर करेछो अपमान
अपमाने हते हबे
ताहादेर शबार समान।
मानुषेर अधिकारे
वंचित करेछो जारे
संमुखे दांडाये रेखे
तबु कोले दाओ नाहि स्थान,
अपमाने हते हबे
ताहादेर शबार समान।

(माझ्या दुर्दैवी देशा, ज्यांना तूं आजवर हीन लेखीत आलास, त्यांच्याच पंक्तींत तुला स्वतः अपमानित होऊन बसावें लागेल. मनुष्याच्या अधिकाराचा ज्यांना तूं लाभ घेऊं दिला नाहींस, ज्यांना नेहमीं तूं दूर तिष्ठत ठेवलेंस,

आपुलकीनें जवळ घेतलें नाहींस, त्यांच्याच पंक्तींत पुढें तुला स्वतः अपमानित होऊन बसावें लागेल. )

अन्यायाचें प्रायश्चित्त सांगणारी ही तेजस्विता कोणाला नाकारतां येईल ?

' दुरंत आशा ' कवितेंत—

अन्नपायी बंगवासी
स्तन्यपायी जीव
जनदशेके जटला करि
तक्तपोशे बशे ।
भद्र मोरा शांत बडो,
पोषमाना ए प्राण
बोताम-आँटा जामार नीचे
शांतिते शयान ।

( सामान्य जीवजंतूप्रमाणें अन्नावर आणि आईच्या दुधावर कसेबसे पोसलेले आम्ही बंगाली आठदहा जणांच्या टोळक्यांनीं लाकडी खाटांवर बसून रिकाम्या गप्पागोष्टी करतों. आम्ही अगदीं सभ्य, शांत स्वभावाचे असून आमचे पाळीव प्राण बटणबंद सदऱ्यांखालीं शांतपणें झोपी गेले आहेत !)

या ओळींतील तीक्ष्ण बोचकपणा कोणाला जाणवणार नाहीं ?

' एबार फिराओ मोरे ' कवितेंत—

स्फीत काय अपमान
अक्षमेर वक्ष हते रक्त
शुषि करितेछे पान
लक्ष मुख दिया,
वेदनारे करितेछे परिहास
स्वार्थोद्धत अविचार,
संकुचित भीत क्रीतदास
लुकाइछे छद्मवेशे ।

( व्यापक अपमान दुबळ्या लोकांच्या हृदयांतील रक्त अनेक मुखांनीं प्राशन करीत आहे. स्वार्थोन्मत्त अन्याय तर त्यांच्या दुःख-वेदनांची थट्टाच उडवीत आहे. भीतीनें संकोचलेले गुलाम वेषांतर करून लपूनछपून दिवस कंठीत आहेत. )

या काव्यपंक्तींत अन्याय—अत्याचारांबद्दलचा क्षोभ-संताप तर कोणालाहि जाणवेल.

एकंदरींत आपणांला असेंच दिसून येतें कीं, रवींद्रकाव्यांत आढळणारी दुर्बोधता अपरिहार्य गूढगुंजनामुळें, व्यापक प्रतिभाविलासामुळें आलेली आहे. आशयाच्या व अभिव्यक्तीच्या दृष्टीनें रवींद्रकाव्यांत तेजाची व बलाची कमतरता नाहीं. अंतर्बाह्य सौंदर्यामुळें, प्रसाद-माधुर्य-ओजादि काव्यगुणांच्या प्राचुर्यामुळें रवींद्रकाव्याला श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे.

* * *

## विश्वकवि रवीन्द्रनाथ : १५

आधुनिक विश्वसाहित्यांत कवींद्र रवींद्रनाथांच्या ‘ गीतांजली ’मुळें भारताला अढळपद लाभलें आहे. आपण रवींद्रनाथांचें समसामयिक आहोंत, जवळचे आहोंत. याचा परिणाम पुष्कळदां असा होतो कीं, पर्वताच्या पायथ्याशीं असणाऱ्या व्यक्तीला शिखराच्या उत्तुंगतेची यथार्थ कल्पना येत नाहीं. त्याप्रमाणें रवींद्रनाथांच्या विराट प्रतिभेचें आज आपण संपूर्ण मूल्यमापन करूं शकत नाहीं. कांहीं पिढ्यांनंतरच तें शक्य होईल. अकस्मात् महाप्रलय होऊन सारें गडप झालें आणि शेकडों वर्षांनंतर उत्खनन करतांना पुराणसंशोधकांच्या हातीं सध्यांचें वाङ्मय पडलें, तर रवींद्रप्रतिभेच्या विराटतेची त्यांना दखल घ्यावीच लागेल. असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

रवींद्रनाथांच्या प्रतिभेची व्यापकता प्रभावी आहे. त्यांच्या काव्यसृष्टींत आपणांला मानवाची महनीयता, विश्वमानवाचें प्रतिबिंब स्पष्टपणें पाहण्यास मिळतें. त्यांच्या सुमधुर संगीतांत—

कतो जे प्रातेर आशा ओ रातेर प्रीति
कतो जे सुखेर स्मृति ओ दुखेर गीति ।

—प्रभातकालीन आशांचें, स्नेहल रात्रीच्या प्रीतीचें, अनेक सुख-स्मृतींचें व वेदनागीतांचें प्राचुर्य जागोजागीं आढळतें. नवनवीन वैचित्र्यानें, विकासानें विश्वमानवाचें मन अधिक संपन्न झाल्याचें दिसून येतें. मानवी जीवनाला रवींद्रकाव्यांत नवी दृष्टि लाभली आहे. रवींद्रसंगीतांत अपूर्व गोडी प्राप्त झाली आहे.

रवींद्रनाथ उपनिषदांच्या शिकवणींत वाढले होते. ते निष्ठावंत अद्वैतवादी होते. पण त्यांचें वैशिष्ट्य असें कीं, त्यांनीं वैराग्याचा, संन्यस्त वृत्तीचा अवलंब केला नाहीं. ' वैधव्य ' काव्यग्रंथांतील ' मुक्ति ' कवितेंत ते म्हणतात :

वैराग्यसाधने मुक्ति शे आमार नय
असंख्य बंधन माझे महानंदमय
लभिवो मुक्तिर स्वाद ।...
इंद्रियेर द्वार
रुद्ध करि जोगासन, शे नहे आमार ।
जे किछु आनंद आछे दृश्ये गंधे गाने
तोमार आनंद रबे तार माझखाने ।

( वैराग्यसाधनेनें लाभणारी मुक्ति मला नको. मानवसमाजांतील सुख-दु:खादि बंधनांतच—मी महानंदमय मुक्तीचा आस्वाद मिळवीन. इंद्रिय-निग्रहपूर्वक योगासन करणें मला पसंत नाहीं. या सृष्टीला व्यापणाऱ्या रूप-गंध-गीतात्मक आनंदांतच, हे परमेश्वरा, तुझ्या अमृतानंदाचा आस्वाद मला घेतां येईल. )

अशा रीतीनें रवींद्रनाथ बंधनांतून मुक्तीचा व संग्रामांतून समन्वयाचा शोध घेतांना दिसतात. सुखदु:खमय मृत्युलोकच त्यांना काल्पनिक स्वर्गापेक्षां अधिक प्रिय वाटत असे. या विपुल, सुंदर धरणीबद्दल त्यांना वाटणारें उत्कट प्रेम ' पुरस्कार ' कवितेंत किती प्रभावीपणें व्यक्त झालें आहे !

क्रमांक ....9432.... नों: दि: 23/7/...

श्यामला विपुला ए धरार पाने
चेये देखि आभि मुग्ध नयाने,
समस्त प्राणे कॅनो जे के जाने
        भरे आशे आँखिजल–
बहु मानबेर प्रेम दिये ढाका,
बहु दिवसेर सुखेदुखे आँका,
लक्ष जुगेर संगीते माखा
        सुंदर धरातल ।

( या श्यामल, विपुल धरतीकडे मी मुग्ध दृष्टीनें पाहतों, तेव्हां कां कुणाला माहीत माझें सारें हृदय अश्रुधारांनीं भरून येतें. ही सुंदर धरती असंख्य माणसांच्या प्रेमानें आच्छादित झाली आहे. अनेक दिवसांच्या वैचित्र्यपूर्ण सुखदुःखांनीं ही पृथ्वी रंगीत, रेखांकित झाली आहे. लक्षावधि युगांच्या सरस संगीतानें ही धरती माखली आहे. )

या उत्कट प्रेमामुळेंच ह्या सुंदर पृथ्वीला अधिक सुंदर सजवावें, मानवाचें जीवन अधिक सरस, संपन्न बनवावें, अशी आकांक्षा तरुण कवीच्या मनांत जागृत झाली.

धरणीर तले गगनेर गाय,
सागरेर जले; अरण्य छाय
आरेकटुखानि नवीन आभाय
        रंगिन करिया दिबो ।...
ना पारे बुझाते, आपनि ना बुझे
मानुष फिरिछे कथा खुंजे खुंजे,
कोकिल जेमन पंचमे कूजे
        मागिछे तेमनि सुर–
किछु घुचाइबो शेइ व्याकुलता,
किछु मिटाइबो प्रकाशेर व्यथा,
बिदायेर आगे दुंचारिटा कथा
        रेखे जाबो सुमधुर ।

( या भूमीवर, आकाशफलकावर, सागराच्या जलपृष्ठावर व अरण्य-राजीवर मी आणखी थोड्या नव्या उज्ज्वलतेनें रंगांची बहार खुलवीन. दुसऱ्याला समजावतां येत नाहीं, स्वतःलाहि नीटसें समजत नाहीं, यामुळें मनुष्य योग्य शब्दांच्या शोधांत असतो. पंचमांत कूजन करणाऱ्या कोकिळा-प्रमाणें तो योग्य स्वर मागत असतो. मी त्याची व्याकुळता थोडी कमी करीन. त्याच्या अभिव्यक्तीची व्यथा थोडी दूर करीन. निरोप घेण्यापूर्वी मी दोन-चार सुमधुर वचनें मागें ठेवून जाईन. )

ही सर्वानुभूति रवींद्रकाव्याच्या ओळीओळींत व्यक्त झाली आहे. या साऱ्या विश्वाशीं आपलें निगूढ, आंतरिक नातें आहे, असें कवींद्रांना नेहमींच जाणवत असे. वैचित्र्यपूर्ण सान्तामध्येंच शिवसुंदराचें अनंत आनंदरूप व्यक्त होत असतें, अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळें निसर्ग-सौंदर्य व मानवी जीवन यांचा विविध रूप-रस-गंध-द्वारा आस्वाद घेण्यासाठीं ते धडपडत असलेले दिसतात. याच धडपडींतून त्यांचें निसर्गप्रेम व मानवप्रेम विकसित झालें आहे. म्हणूनच ते म्हणूं शकतात :

शब ठाँइ मोर घर आछे, आमि शेइ घर मरि खुँजिया,
देशे देशे मोर देश आछे, आमि शेइ देश लबो जुझिया।
परवासी आमि जे दुयारे चाइ
तारि माझे मोर आछे जॅनो ठाँइ,
कोथा दिया शेथा प्रवेशिते पाइ शंधान लबो बुझिया।
घरे घरे आछे परमात्मीय, तारे आमि फिरि खुँजिया॥

( सर्वच ठिकाणीं माझें घर आहे. तेंच घर शोधून काढण्यासाठीं मी धडपडतों. सर्व देशांत माझा देश आहे. तो माझा देश मी जिंकून घेईन. मी प्रवासी ज्या ज्या दाराकडे पाहतों, त्या प्रत्येकाच्या आंत मला स्थान आहे जणूं. कोणत्या बाजूनें मला आंत प्रवेश मिळेल, याचा मी शोध घेईन. घरोघरीं माझा निकट नातेवाईक आहे. त्यालाच मी शोधत फिरतों. )

अशा व्यापक प्रेमसाधनेमुळेंच ते जगाला विश्वप्रेमाचा उदार संदेश देऊं शकले. विश्वप्रेम हेंच त्यांच्या जीवनाचें पवित्र व्रत. जीवनदेवतेच्या प्रेरणेनें

९८३

त्यांनीं जीवनाच्या वैचित्र्यांत परिपूर्ण एकत्वाची साधना केली आहे. आपल्या वैचित्र्यपूर्ण संगीतांत त्यांनीं विश्वमानवाचें प्रेममय जीवनसंगीतच ऐकवलें आहे.

एइ गीतिपथप्रांते, हे मानव, तोमार मंदिरे
दिनान्ते एशेछि आमि निशीथेर नैशब्देर तीरे
आरतिर सांध्यक्षणे, अेकेर चरणे राखिलाम
विचित्रेर नर्म बाँशि—एइ मोर रइलो प्रणाम ।

( हे मानव, या गीतिपथाच्या शेवटीं सायंकाळीं रात्रीच्या निःशब्दतेच्या तीरावर आरतीच्या सांध्यक्षणीं मी तुझ्या मंदिरांत आलों आहें. एकत्वाच्या चरणीं मीं वैचित्र्याची कौतुकमय बांसरी अर्पण केली—हाच माझा प्रणाम. )

आपल्या व्यापक प्रेमसाधनेनें मानवाचें उदात्तीकरण करणारे रवींद्रनाथच खरे विश्वकवि. आपल्या विपुल लिखाणांतून त्यांनीं मानवतेचा प्रभावी पुरस्कार केला. रवींद्रनाथ अमीर होते, सारें जीवन त्यांनीं सुखासीनतेंत व काव्यकल्पनांच्या हस्तिदंती मिनारांत घालवलें, असा जो गैरसमज अजूनहि पसरलेला दिसतो, तो अगदीं निराधार आहे. सर्वसाधारण माणसाप्रमाणेंच त्यांनींहि संसारांतील अनेक दुःखें भोगलीं. महापुरुषाप्रमाणें मानवजातीच्या कल्याणाची त्यांनीं सतत चिंता वाहिली. तनमनधनानें विश्वभारतीचें महान् कार्य अविश्रांतपणें अखेरपर्यंत चालवलें. " Goethe's immortal words ' eternal urge and unceasing exertion ' have been actually realised in Rabindranath Tagore." असें डॉइश् ॲकॅडेमीच्या अध्यक्षांनीं जे उद्गार काढले, ते अक्षरशः खरे होते. आपल्या दीर्घ जीवनांत रवींद्रनाथांनीं सामाजिक अन्याय, अत्याचार व मूठभर लोकांनीं चालवलेलें असंख्य हतभाग्यांचें शोषण प्रत्यक्ष पाहिलें होतें. दोन्ही महायुद्धांची विदारकता त्यांनीं अनुभवली होती. पददलित मानवतेसाठीं त्यांचें मन किती वेदनाविद्ध होत असे, हें मृत्युशय्येवरून मिस् रॅथ् बोनला लिहिलेल्या उत्तरांत स्पष्ट दिसून येतें. 'सभ्यतेचें संकट' या सुप्रसिद्ध निबंधांत त्यांनीं बहुजनसमाजाचें शोषण करणाऱ्या साम्राज्यशाहीचा कडक शब्दांत निषेधच केला आहे. रवींद्रनाथांनीं आपल्या विपुल काव्यांत, नाटकांत, कथांत आणि कादंबऱ्यांत दलितांच्या ' मूढ, म्लान, मूक, ' मुखांतून निर्भय वाणी वदण्याचा, त्यांच्या ' श्रांत,

शुष्क, भग्न ’ हृदयांत आशादीप पेटवण्याचा सतत प्रयत्न केला. प्रथम महायुद्धाच्या काळीं रचलेल्या ‘ बलाका ’ काव्यग्रंथांत कवींद्रांनीं त्यांना हीन-दीनतेविरुद्ध, अन्याय-अत्याचारांविरुद्ध लढण्याचा तेजस्वी संदेश दिला आहे. ते आपल्या प्रभावी वाणीनें म्हणतात :

लडबि के आय ध्वजा बेये
गान आछे जार ओठ् ना गेये,
चलबि जारा चलरे धेये
आय नारे निःशंक।

( अन्याय-अत्याचारांविरुद्ध लढा देणाऱ्या सैनिकांनो ! या, तुमचा अजेय ध्वज मिरवीत या. गीत जाणणाऱ्या सैनिकांनो, तुम्ही स्फूर्तिदायक गीत गा. लढण्यास सिद्ध झालेल्या सैनिकांनो, तुम्ही निःशंक मनानें चला, निर्भयपणानें आगेकूच करा. )

मनुष्यत्वावरील आपला दृढ विश्वास रवींद्रनाथांनीं वारंवार व्यक्त केला आहे. मानवजातीच्या सुखदुःखांचा, आशाआकांक्षांचा व अंतिम कल्याणाचा व्यापक सहानुभूतीनें, उत्कट प्रेमानें पुरस्कार करणारे रवींद्रनाथच खरे विश्वकवि. ते जन्मानें भारतीय असले, तरी दीर्घ सौंदर्यसाधनेनें व व्यापक प्रेमसाधनेनें ते जगाचे नागरिक बनले. तरुणपणीं रचलेल्या ‘ पुरस्कार ’ कवितेंत रवींद्रनाथांनीं जी नम्र इच्छा व्यक्त केली होती, तिची पूर्ति त्यांच्या विपुल काव्यांत निश्चित झालेली दिसते. त्यांच्या काव्यालंकारांनीं ही वसुंधरा अधिक सुंदर झाली आहे. त्यांच्या काव्यरसानें मानवांतील प्रेम अधिक मधुर झालें आहे. तरुण वयांत त्यांनीं उत्कटतेनें म्हटलें होतें :

मरिते चाइ ना आमि सुंदर भुवने
मानबेर माझे आमि बाँचिबारे चाइ !

( या सुंदर जगांत मला मरावें, अगदीं निश्चिन्ह व्हावें असें वाटत नाहीं. नेहमीं मानवाच्या मधुर सहवासांत राहण्याची माझी उत्कट इच्छा आहे. )

विश्वकवि रवींद्रनाथांची ही उत्कट इच्छा संपूर्ण सफळ झाली आहे. विश्वकवि रवींद्रनाथ अमर झाले आहेत. विश्वमानवाच्या हृदयांत त्यांना अढळपद लाभलें आहे.

★ ★ ★

ग्रंथ
अनुक्रम ........ दि. ......
क्रमांक ........ नों. ......

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | १९ | घस्तुहीन | वस्तुहीन |
| १२ | १७ | कृत्रिमपणाचें असल्याचें लक्षण | कृत्रिमपणाचें लक्षण |
| १३ | २६ | व्यक्तीला महत्त्व आहे | व्यक्तीला महत्त्व नसून साधनेलाच महत्त्व असतें. |
| १४ | ६ | असतोच. | असतो. |
| १५ | ४ | रात्रीं | रात्री |
| २७ | २२ | निरहिणी | विरहिणी |
| २९ | ११ | वाढत | वाटत |
| ४२ | १० | वात्सल्यासाठीं | वात्सल्यरसाशीं |
| ४३ | ११ | बुझिरे | बुझिरे |
| ४४ | ३ | फोका | खोका |
| ४५ | २३ | भरिस | करिस |
| ४६ | ४ | नाइ | ताइ |
| ५४ | ४ | गंभीर | गर्भार |
| ५४ | ७ | नव | तव |
| ५८ | १७ | मन | मम |
| ६० | २१ | असतांना सान्त | असतांना अनंताला सान्त |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६३ | ३ | वथा | वृथा |
| ६५ | ६ | कैंद्रे | कैंदे |
| ६६ | १८ | रय | रय |
| ७३ | १६ | जातो | जतो |
| ८१ | २६ | प्रेमाच्या कार्यांच्या | प्रेमाच्या व कार्यांच्या |
| ८९ | २० | परेछे | पेरेछे |
| ९० | १ | पंचेचाळीस | अठेचाळीस |
| ९१ | ९ | ' गीतांजलींत ' पुरेसा | गीतांजलींत सर्वत्र आढळतो. नेमका हाच काव्यगुण इंग्रजी गीतांजलींत पुरेसा. |
| ९३ | ४ | रिजा | रजा |
| ९८ | १० | ' वैधव्य ' | ' नैवेद्य ' |
| ९९ | २७ | दुंचारिटा | दुचारिटा |

REFBK-0011983

नों: दि: 23/12/49

अनुक्रम ३२२५ वि: काव्य
क्रमांक २५३२ नों: दि: २३/१०/५